अकोला । रविवार
दि. १ जून २०२५
वर्ष : १९ अंक : ९१
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये




शिवम दुबे भारतीय संघासाठी ठरला 'लकी' चार्म!
(पान ७ वर..)

## थोडक्यात

### आदित्यनाथ शक्तिशाली, मेहनती मुख्यमंत्री: गवई



**प्रयागराज :** भारताचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची प्रशंसा करताना त्यांना देशातील ''सर्वात शक्तिशाली आणि मेहनती मुख्यमंत्री'' असल्याचे म्हटले. प्रयागराज येथील उच्च न्यायालयात ६८० कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या नवनिर्मित अधिवक्ता चेंबर इमारती व मल्टीलेव्हल पार्किंगच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. सरन्यायाधीश म्हणाले, योगीजी हे देशातील सर्वात शक्तिशाली मुख्यमंत्री आहेत, असं केंद्रीय कायदामंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी म्हटलं आणि मी हे देखील म्हणतो की अलाहाबाद ही शक्तिशाली व्यक्तींची भूमी आहे. बी. आर. गवई यांनी भारतीय संविधानाचे ७५ वर्षांचे महत्त्व अधोरेखित करताना म्हटले की, जेव्हा जेव्हा भारतावर संकट आले, तेव्हा संविधानाच्या जोरावर देश एकजूट आणि मजबूत राहिला.

### महिला आयोग अध्यक्षांनी राजीनामा द्यावा : रोहित पवार



**पुणे :** राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी राजकीय वलय असलेल्या व्यक्तीची नियुक्ती करणे चुकीचे आहे. गेल्या काही प्रकरणात आयोगाच्या अध्यक्षांची भुमिका योग्य दिसून आली नाही. पक्षाचा एक विभाग असल्यासारखे आयोगाचे काम कोणी चालवित असेल तर योग्य ठरणार नाही. लोकांच्या आग्रहास्त्व त्यांनी स्वतः हून राजीनामा द्यावा, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत केली. महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघटनेच्यावतीने आयोजित पत्रकार परिषदेनंतर ते बोलत होते. वैष्णवी कस्पटे - हगवणे यांच्या आत्महत्येनंतर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांबाबत अनेक टिका केल्या गेल्या. त्याबाबत रोहित पवार म्हणाले, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी राजकीय व्यक्तींची नियुक्ती करता कामा नये. या पदावर निवृत्त न्यायाधीश, निवृत्त पोलिस अधिकारीआदी क्षेत्रातील व्यक्तींची नियुक्ती झाली पाहीजे. विधानसभेच्या पुढील अधिवेशनात याबाबत विषय उपस्थित करणार आहोत.

# मोस्ट वॉन्टेड 'भिंडा' अखेर यवतमाळ पोलिसांच्या ताब्यात

## राजस्थान पोलिसांचे २५ हजारांचे बक्षीस, यवतमाळ येथे तीन वर्षांपासून वास्तव्य

। गणेश खडसे ।

**यवतमाळ, दि. ३१ : पंजाब व राजस्थान पोलिसांना हव्या असलेल्या लॉरेन्स बिश्नोई आणि बिन्नी गुर्जर टोळीतील कुख्यात गुंड भूपेंद्र सिंग उर्फ भिंडा याला यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी (एलसीबी) मोठ्या शिताफीने अटक केली. त्याच्यावर राजस्थान पोलिसांचे २५ हजार रुपयांचे बक्षीस होते. खुनाच्या गुन्ह्यात फरार असलेला भिंडा यवतमाळात ओळख लपवून राहत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांनी मिळाली होती. यावरून पोलिसांनी ही मोठी कारवाई केली.**



सदर प्रकरणातील आरोपी भूपेंद्र सिंग उर्फ भिंडा (वय ३५, रा. ग्राम अहारना खुर्द, पो.स्टे. मेहटीयाना, होशियारपूर, पंजाब) असून, फिर्यादी हे राजस्थान व पंजाब पोलिस दल आहे, ज्यांना गोपनीय माहिती मिळाली. पोलिस अधीक्षक, यवतमाळ कुमार चिंता यांच्या आदेशाने शहरात अमलीपदार्थ विरोधी मोहीम राबवीत असताना, होशियारपूर, पंजाब येथील रहिवासी असलेला भूपेंद्र सिंग उर्फ भिंडा हा खुनाच्या गुन्ह्यात फरार असून यवतमाळ शहरातील जांब रोड परिसरात स्वतःची ओळख लपवून राहत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्याआधारे, जांब रोड परिसरात दांडेकर ले-आउट येथील आरोपी भूपेंद्र सिंग उर्फ रघू भिंडा राहत असलेल्या घरावर पोलिसांनी छापा टाकला. घराभोवती घेराव घालण्यात आला. पोलिसांची चाहूल लागताच तो पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना, सोबत असलेल्या पोलिस स्टाफच्या मदतीने त्याला पकडले. त्याने पोलिसांशी झटापट करण्याचा प्रयत्न केला. त्याला ताब्यात घेऊन कठोर चौकशी केल्यानंतर, त्याने स्वतःची खरी ओळख भूपेंद्र सिंग उर्फ भिंडा जरनैल सिंग (वय ३५ वर्षे, रा. ग्राम अहारना खुर्द, पो.स्टे. मेहटीयाना, होशियारपूर, पंजाब) अशी सांगितली.

तो कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई आणि बिन्नी गुर्जर टोळीचा सदस्य असून, त्याच्यावर पंजाब आणि राजस्थान राज्यात खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी, आर्म्स ॲक्ट अशा प्रकारच्या अनेक गुन्ह्यांत सहभाग असल्याची त्याने कबुली दिली. सध्या बाडमेर येथील हरपालसिंग उर्फ रिंकू (रा. गंगानगर बाडमेर, जि. बाडमेर) याचा सन २०२३ मध्ये खून करून, तसेच पंजाब येथील खून आणि खुनाच्या प्रयत्नाच्या गंभीर गुन्ह्यांत फरार असल्याचे त्याने सांगितले. त्याला ताब्यात घेऊन पोलिस अधीक्षक, यवतमाळ यांच्या आदेशाने पंजाब व राजस्थान पोलिसांशी संपर्क साधून त्याच्यावर दाखल गुन्ह्यांची माहिती घेण्यात आली. बाडमेर, राजस्थान जिल्हा पोलिसांशी तत्काळ समन्वय साधून गुन्हेगाराविषयी तसेच टोळीविषयी संपूर्ण माहिती संकलित करण्यात आली. त्यांच्याकडून रघुवीर उर्फ रघू उर्फ भूपेंद्र सिंग उर्फ भिंडा जरनैल सिंग याच्या ओळखीची आणि गुन्हेगारी इतिहासाची पडताळणी करण्यात आली. (पान २ वर)



» लॉरेन्स बिश्नोई आणि बिन्नी गुर्जर टोळ्या या देशांत दहशत पसरविण्याचे काम करीत आहे. अमेरिकेत राहून भारताच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात स्लिपर सेल म्हणून या टोळ्या काम करीत असून यासाठी हवालामार्फत टोळ्यांना परदेशातील चलनाने मदत पुरविली जात असल्याची चौकशीत निःष्पन्न झाले आहे.

**- कुमार चिंता,** जिल्हा पोलिस अधीक्षक, यवतमाळ.

### अमेरिकेतून चालणारे गुन्हेगारीचे जाळे

» लॉरेन्स बिश्नोई आणि बिन्नी गुर्जर टोळ्या केवळ देशातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही सक्रिय आहेत. भिंडासारख्या गुन्हेगारांना अमेरिकेतून सौरभ गुर्जर (गँगस्टर बिल्लू गुर्जर याचा भाऊ व गोल्डी ब्रारचा मित्र) याच्यामार्फत डॉलर्समध्ये नियमित अर्थपुरवठा होत होता. हे नेटवर्क फरार गुंडांना आश्रय देऊन त्यांना महिन्याला २० ते २५ हजार रुपये पुरवत होते, जेणेकरून ते पुढील गुन्ह्यांसाठी तयार राहतील, हे धक्कादायक वास्तव या कारवाईतून समोर आले आहे.

# अरुणाचल, आसाममध्ये मुसळधार!

## भूस्खलनात ९ जण ठार





**कामेंग, दि. ३१** वृत्तसंस्था

अरुणाचल प्रदेशात मुसळधार पावसामुळे हाहाकार उडाला आहे. येथे पूर आणि भूस्खलनाशी संबंधित घटनांमध्ये ९ जणांचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पूर्व कामेंग जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग १३ च्या बाना-सेप्पा भागात शुक्रवारी रात्री उशिरा भूस्खलन झाले. यात दोन कुटुंबातील सात जणांचा मृत्यू झाला, असे पोलिसांनी सांगितले.

पूर्व कामेंग जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक कामदाम सिकोम यांनी सांगितले की, बिचोम डिस्ट्रिक्टच्या बाना येथून सेप्पाच्या दिशेने वाहन जात असताना अचानक भूस्खलन झाले. यामुळे वाहन खोल दरीत कोसळले. या घटनेची माहिती मिळताच तत्काळ बचावकार्य सुरू करण्यात आले. पण मुसळधार पाऊस, पुन्हा झालेले भूस्खलन आणि रात्रीच्या अंधारामुळे बचावकार्यात अडथळे आले. तरीही पोलिस आणि बचाव पथकांनी त्यांचे प्रयत्न सुरू ठेवले. शनिवारी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने बचावकार्य पुन्हा सुरू करण्यात आले. अनेक तासांच्या अथक शोधकार्यानंतर, महामार्गापासून सुमारे १५० मीटर खोल दरीत सर्व सातही जणांचे मृतदेह सापडले. हे सर्वजण बाना येथील किचांग गावातील रहिवासी होते, असे सिकोम यांनी सांगितले. अप्पर सुबानसिरी जिल्ह्यात झालेल्या दुसऱ्या एका वेगळ्या घटनेत, झिरो-कामले (पान २ वर)

### आसाममधील सहा जिल्ह्यांत पूर, ५ जणांचा मृत्यू

» आसाममध्येही मुसळधार पावसामुळे पूर आला आहे. येथे गेल्या २४ तासांत भूस्खलनात पाच जणांचा मृत्यू झाला. येथील सहा जिल्ह्यांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे १० हजार लोक प्रभावित झाले आहेत, असे शनिवारी जारी करण्यात आलेल्या एका अधिकृत बुलेटिनमधून सांगण्यात आले आहे. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून सांगण्यात आले आहे की, कामरूप जिल्ह्यात पाच जणांच्या मृत्यूची नोंद झाली आहे.



# पाकिस्तानच्या सीमेवरील राज्यांमध्ये झाले मॉक ड्रिल

**नवी दिल्ली, दि. ३१** वृत्तसंस्था

पाकिस्तानच्या सीमेवरील राज्यांमध्ये शनिवारी मॉक ड्रिल पार पडले. ऑपरेशन शील्ड अंतर्गत जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थान आणि गुजरातसह पाकिस्तानच्या सीमेवरील सर्व पश्चिमेकडील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये हे मॉक ड्रिल करण्यात आले.

मॉक ड्रिल दरम्यान, लोकांना युद्धादरम्यान कसे टिकून राहायचे हे शिकवले गेले. विविध ठिकाणी रात्री ८ वाजता १५ मिनिटांसाठी ब्लॅकआउट करण्यात आले होते. रुग्णालये, अग्निशमन केंद्रे आणि पोलिस स्टेशन यासारख्या अत्यावश्यक आपत्कालीन सेवा वगळता महत्त्वाच्या क्षेत्रांजवळ हे नियंत्रित ब्लॅकआउट केले गेले. हल्ल्याच्या दरम्यान वाजतात तसे सायरन वाजवले गेले.

भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी असूनही दोन्ही देशांमध्ये तणाव कायम आहे. भारताने पाकिस्तानविरुद्ध ऑपरेशन सिंदूर सुरू केल्यानंतर काही आठवड्यांनंतरच दुसरे नागरी संरक्षण मॉक ड्रिल पार पडले.

# मुख्तार अन्सारीच्या आमदार पुत्रास दोन वर्षांची शिक्षा

**लखनौ, दि. ३१** वृत्तसंस्था



उत्तर प्रदेशमधील कुख्यात गुंड मुख्तार अन्सारीचा मुलगा, मऊ सदर मतदारसंघाचे आमदार अब्बास अन्सारी यांना द्वेषपूर्ण भाषण प्रकरणी उत्तर प्रदेशमधील न्यायालयाने दोषी ठरवले. त्यांना दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या निकालामुळे विधानसभेचे सदस्यत्व गमावण्याची टांगती तलवार त्यांच्यावर आहे. उत्तर प्रदेशमध्ये ३ मार्च २०२२ रोजी विधानसभा निवडणुकीदरम्यान सुभास्पा उमेदवार म्हणून निवडणूक लढवणारे अब्बास अन्सारी यांनी द्वेषपूर्ण भाषण दिले.

शहरातील पहाडपूर मैदानात झालेल्या जाहीर सभेत मऊ प्रशासनाला निवडणुकीनंतर हिशेब चुकता करण्याची आणि त्यांना धडा शिकवण्याची धमकी दिली होती. मी सपा प्रमुख अखिलेश यादव यांना सांगितले आहे की सरकार स्थापन झाल्यानंतर सहा महिने कोणाचीही बदली किंवा नियुक्ती केली जाणार नाही. जो कोणी जिथे असेल तिथेच राहील. प्रथम हिशेब चुकता केले जातील. नंतर बदल्या होतील, अशी धमकी अब्बास यांनी दिल्याची पोलीस अधिकारी (पान २ वर)

# आधार, यूपीआय, पीएफ, एलपीजी संदर्भात ८ महत्त्वाचे नियम बदलणार!

**नवी दिल्ली, दि. ३१** वृत्तसंस्था




प्रत्येक महिन्याप्रमाणे जून महिन्यातही मोठे बदल होणार आहेत, ज्याचा तुमच्या खिशावर ताण पडणार आहे. यूपीआय, पीएफ पासून ते एलपीजी सिलेंडरच्या किमतीपर्यंत उद्या १ जूनपासून नियम बदलणार आहेत. यामुळे तुमचे महिन्याचे अर्थचक्र बिघडू शकते. यासोबतच तुम्हाला काही फायदे आणि सुविधा देखील मिळू शकतात.

सरकार कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनाचं ३.० चे नवीन व्हर्जन लाँच करणार आहे. जे जुन महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे. यानंतर तुमचा पीएफ क्लेम खूप सोपा होईल. तुम्ही आणि यूपीआयद्वारे पैसे काढू शकता. जूनमध्ये ने दिलेली मोफत आधार कार्ड अपडेट सुविधा संपणार आहे. त्याची अंतिम मुदत १४ जून आहे. तोपर्यंत तुम्ही आधार अपडेट केले नाही तर तुम्हाला या कामासाठी ५० रुपये शुल्क भरावे लागेल. जर तुम्ही कोटक महिंद्रा बँक क्रेडिट कार्ड वापरत असाल तर तुम्हाला १ जूनपासून मोठा झटका बसू शकतो. जर या बँकेच्या क्रेडिट कार्ड वापरकर्त्यांचे ऑटो डेबिट व्यवहार अयशस्वी झाले तर (पान २ वर)

# तंबाखू-सिगारेट खरेदीसाठी कायदेशीर वय २१ वर्षे!

- कर्नाटक सरकार: हुक्का बारवरही बंदी
- सार्वजनिक आरोग्याहितासाठी मोठा निर्णय



**बेंगळूरू, दि. ३१** वृत्तसंस्था

कर्नाटक सरकारने सार्वजनिक आरोग्याहितासाठी मोठा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने हुक्का बारवर बंदी घालणारा नवीन तंबाखूविरोधी कायदा लागू केला आहे. आता तंबाखूजन्य उत्पादनांच्या खरेदीसाठी किमान कायदेशीर वय १८ वरून २१ वर्षे केले आहे. याचे उल्लंघन केल्यास कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २३ मे रोजी सिगारेट्स आणि इतर तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरातींवर बंदी आणि व्यापार आणि वाणिज्य, उत्पादन, पुरवठा आणि वितरण नियमन) (कर्नाटक सुधारणा) विधेयक, २०२४ ला मंजुरी दिली. त्यानंतर कर्नाटक सरकारने हा नवीन तंबाखूविरोधी कायदा लागू केला आहे. या सुधारित कायद्यानुसार, सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान आणि थुंकण्यास बंदी असेल. यातून सुमारे ३० खोल्या असलेले हॉटेल्स, ३० पेक्षा जास्त आसन क्षमता असलेली रेस्टॉरंट्स आणि विमानतळांवर निश्चित केलेल्या धूम्रपान क्षेत्रांना सूट दिली जाईल. पण सामान्य सार्वजनिक ठिकाणी कडक निर्बंध लागू करण्यात आले आहे.



### ...तर ३ वर्षांपर्यंत तुरुंगवास

**या कायद्यातील दुरुस्तीतील सर्वात उल्लेखनीय गोष्ट म्हणजे हुक्का बारवर पूर्णपणे बंदी घालणे होय. या कायद्याचे उल्लंघन केल्यास एक ते तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि त्यासोबत ५० हजार ते १ लाख रुपयांपर्यंत दंड भरावा लागू शकतो. सुधारित कायद्यानुसार २१ वर्षांखालील कोणालाही तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास प्रतिबंध असेल. तसेच शैक्षणिक संस्थांपासून १०० मीटर अंतरावर तंबाखू विक्री करण्यास बंदी घालण्यात आली आहे.**

# खाद्यतेल स्वस्त होणार!

## महागाई कमी करण्यासाठी सरकारचा निर्णय

**नवी दिल्ली, दि. ३१** वृत्तसंस्था



केंद्र सरकारने देशांतर्गत बाजारातील खाद्यतेलांचे दर कमी करण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. केंद्राने कच्च्या खाद्यतेलांवरील मूलभूत आयात शुल्कात १० टक्क्यांची कपात केली, असे सरकारने जारी केलेल्या एका अधिसूचनेत म्हटले आहे.

भारतात देशांतर्गत एकूण वनस्पती तेलाच्या मागणीपैकी ७० टक्क्यांहून अधिक तेल आयात केले जाते. भारत प्रामुख्याने इंडोनेशिया, मलेशिया आणि थायलंडमधून पाम तेल खरेदी करतो. तर अर्जेंटिना, ब्राझील, रशिया आणि युक्रेन येथून सोयाबीन आणि सूर्यफूल तेलाची आयात करण्यात येते. जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढतात तेव्हा त्याचा थेट परिणाम भारतातील देशांतर्गत बाजारावर होतो. परिणामी तेलाचे दर वाढतात. हे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि सर्वसामान्य ग्राहकांना दिलासा देण्यासाठी खाद्यतेलांवरील मूलभूत आयात शुल्क कमी करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. सरकारच्या या निर्णयामुळे खाद्यतेलाच्या किमती कमी होतील. तसेच मागणी वाढू शकतो. यामुळे पाम तेल, सोया तेल आणि सूर्यफूल तेलाची परदेशातून खरेदी वाढणार आहे. याआधी, सरकारने कच्चे पाम तेल, सोयाबीन तेल आणि सूर्यफूल तेलावरील मूलभूत सीमा शुल्क २० टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत खाली आणले होते. (पान २ वर)

# पान 1 वरून...

## मोस्ट वॉन्टेड 'भिंडा' अखेर...

आरोपीला यापूर्वी खुनाच्या गुन्ह्यात २० वर्षे व खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात १० वर्षे अशी शिक्षा झालेली आहे. या दोन्ही गुन्ह्यांत तो फरार असतानाच त्याने बाडमेर येथे सुपारी घेऊन हरपालसिंग उर्फ रिंकू याचा खून केल्याची माहिती पंजाब व राजस्थान पोलिसांकडून मिळाली आहे. या यशस्वी कारवाईमुळे पुढील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न राखण्यास व मोठा अनर्थ टाळण्यास यवतमाळ पोलिसांना यश आले. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता (भापोसे) आणि अपर पोलिस अधीक्षक पियुष जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संतोष मनवर, सफौ योगेश गटलेवार, पोहवा विनोद राठोड, पोहवा नीलेश राठोड, पोशि आकाश सहारे, मपोना ममता देवतळे (सर्व स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ) यांनी केली.

## अरुणाचल, आसाममध्ये मुसळधार...

रस्त्यालगतच्या शेतात भूस्खलन झाल्याने दोन कामगारांचा मृत्यू झाला. तर इतर दोघांना वाचवण्यात आले, असे पोलिसांनी सांगितले.

मंगळूर जिल्ह्यात भूस्खलन

कर्नाटकच्या बंगळूरमध्ये अधूनमधून होणाऱ्या पावसामुळे नद्या, नाले तुडुंब भरून वाहत असून जलाशयांच्या साठा मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पावसामुळे मंगळूर जिल्ह्यात भूस्खलन होत आहे. मंगळूरजवळील मोंटेपद गावात भूस्खलन होऊन घरावर मातीचा ढिगारा पहाटे ४ च्या सुमारास कोसळला. तसेच दोन मोठी झाडेही घरावर कोसळली. दुसऱ्या घटनेत डेरालकट्टे येथील कनाकेरे येथे घरावर मातीचा ढिगारा कोसळला.

## खाद्यतेल स्वस्त होणार...

आता नवीन निर्णयामुळे तिन्ही प्रकारच्या तेलांवरील एकूण आयात शुल्क २७.५ टक्क्यांवरून १६.५ टक्के होईल. कारण त्यावर भारताच्या कृषी पायाभूत सुविधा आणि विकास सेस आणि समाज कल्याण अधिभारदेखील आकारला जातो. सप्टेंबर २०२४ मध्ये केंद्राने कच्च्या आणि रिफाईंड केलेल्या वनस्पती तेलांवर २० टक्के मूलभूत सीमाशुल्क लागू केले होते. यानंतर, कच्चे पाम तेल, सोया तेल आणि सूर्यफूल तेलावर २७.५ टक्के आयात शुल्क लागू करण्यात आले. जे त्यापूर्वी ५.५ टक्के होते. तर तिन्ही तेलांच्या रिफाईंड ग्रेडवर आता ३५.७५ टक्के आयात कर आकारला जातो.

## आधार, यूपीआय, पीएफ, एलपीजी...

बँकेकडून २ टक्के बाउन्स शुल्क आकारले जाऊ शकते. हे किमान ४५० रुपये आणि जास्तीत जास्त ५००० रुपये असू शकते. बँकेच्या वेबसाइटनुसार, बँकेच्या क्रेडिट कार्डवरील मासिक वित्त शुल्क वाढू शकतो. सध्या लागू असलेल्या ३.५० टक्के (४२ टक्के वार्षिक) वरून ३.७५ टक्के (४५ टक्के वार्षिक) पर्यंत वाढेल. १ जून रोजी होणारा सर्वात मोठा बदल म्हणजे सीएनजी-पीएनजी आणि एटीएफचे दर बदलणार आहेत. तेल विपणन कंपन्या दर महिन्याच्या पहिल्या तारखेला एलपीजी सिलिंडरच्या किमती तसेच एअर टर्बाइन इंधनाच्या किमतीमध्ये बदल करतात. मे महिन्यात त्यांच्या किमती कमी करण्यात आल्या होत्या. उद्या त्यात बदल होऊ शकतो. एलपीजी सिलिंडरच्या किमती दर महिन्याच्या १ तारखेला बदलतात. उद्या त्यात बदल होऊ शकतो. मे महिन्याच्या सुरुवातीला, तेल विपणन कंपन्यांनी १४ किलो घरगुती गॅस सिलिंडरच्या किमती बदलल्या नव्हत्या, मात्र १९ किलो व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमती प्रति सिलिंडर १७ रुपयांनी स्वस्त झाला होता. जूनमध्ये बँका मुदत ठेवी आणि कर्जाच्या व्याजदरात बदल करू शकतात. कारण रिझर्व्ह बँकेने रेपो दरात कपात केली आहे. सूर्योदय स्मॉल फायनान्स बँकेने ५ वर्षांच्या एफडीवरील व्याजदर ८.६ टक्के वरून ८ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. सेबीने ओव्हरनाईट म्युच्युअल फंड योजनांसाठी नवीन कट-ऑफ वेळ लागू केली आहे. हा नियम १ जूनपासून ऑफलाइन व्यवहारांसाठी दुपारी ३ वाजेपर्यंत आणि ऑनलाइन व्यवहारांसाठी संध्याकाळी ७ वाजेपर्यंत असेल. त्यानंतर दिलेल्या ऑर्डर पुढील कामकाजाच्या दिवशी ग्राह्य धरल्या जातील. एनपीसीआयने यूपीआय संदर्भात एक नवीन नियम लागू केला आहे. यूपीआय पेमेंट करताना वापरकर्त्याला फक्त प्राप्तकर्त्याचं बँकिंग नाव दिसेल. क्यूआर कोड किंवा एडिट केलेले नाव यापुढे दिसणार नाही. हा नियम ३० जूनपर्यंत सर्व यूपीआय ॲप्सना लागू होऊ शकतो.

## मुख्तार अन्सारीच्या आमदार...

गंगाराम बिंद यांनी दिली होती. या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. आमदार अब्बास अन्सारी आणि इतरांना आरोपी करण्यात आले होते. न्यायालयाने अब्बास अन्सारी यांना आचारसंहिता उल्लंघनाच्या प्रकरणात दोषी ठरवले आणि त्यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावली. कलम १२० ब, आयपीसी अंतर्गत त्याला सहा महिने तुरुंगवास आणि एक हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. आमची बाजू पूर्णपणे विचारात घेतली नाही. त्यामुळे आम्हाला या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागावी लागणार असल्याचेही अन्सारी यांनी म्हटलं आहे.

# अकोला नाक्यावरील रेल्वे पुलावर पथदिवे लागणार

## वंचित बहुजन आघाडीने केलेला पाठपुरावा व आमरण उपोषणाला यश;श्रेय लाटण्यासाठी अनेक संघटना समोर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोट, दि. ३१ :** शहराल अकोला नाका ब्रिजवर पथदिवे लावणे संदर्भात ६ नोव्हेंबर २०२३ रोजी वंचित बहुजन आघाडीचे विशाल आग्रे व अक्षय तेलगोटे यांनी आमरण उपोषण सुरू केले होते.

सायंकाळच्या वेळेस ब्रिजवर अंधार असल्याने अपघाताचे प्रमाण फार जास्त प्रमाणात वाढले होते. म्हणून वंचित बहुजन आघाडीचे नेते दिपक रामदास बोडखे यांच्या मार्गदर्शनामध्ये अकोला नाका ब्रिजवर विशाल आग्रे व अक्षय तेलगोटे यांनी आमरण उपोषण सुरू केले आले होते.

रात्रीच्या वेळेस संपूर्ण ब्रिजवर अंधार पसरत असल्यामुळे अपघात वाढले होते.

या गंभीर बाबीकडे वंचित बहुजन आघाडीचे दिपक बोडखे,विशाल आग्रे व अक्षय तेलगोटे यांनी ब्रिजवर पथदिवे लावणे संदर्भात संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला.

रात्रीच्या समयी रेल्वे ब्रिजवर पूर्णतः अंधार पसरल्यामुळे वाहनधारकांना अनेकदा अपघाताला सामोरे जावे लागते. यामध्ये गंभीर दुखापती सुद्धा अनेकांना झाल्या तसेच कित्येकांना आपला जीव गमावा लागला.

या प्रकारामुळे अकोट शहरात स्थानिक नागरिकांच्या वतीने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली होती.

वंचित बहुजन आघाडीचे नेते दिपक रामदास बोडखे यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनात ६ नोव्हेंबर २०२३ रोजी विशाल आग्रे व अक्षय तेलगोटे यांनी आमरण घोषणास सुरुवात केली होती. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी अकोट नगर परिषदेने उपोषणाची दखल घेत, अकोट शहरातील रेल्वे ब्रिजवर पथदिवे लावणे संदर्भात मागणी मंजूर केली व लेखी आश्वासन दिले. यावेळी दीपक बोडखे , नगरपालिका अधीक्षक सागर पहुरकर, चिपडे,,ऋषिकेश तायडे, यांनी मागणी मंजूर करीत लेखी आश्वासन दिले. नगरपालिकेने दिलेल्या आश्वासनानंतर ७ नोव्हेंबर २०२३ रोजी आमरण उपोषण मागे घेण्यात आले.

उपोषण संपल्यानंतरही विशाल आग्रे व अक्षय तेलगोटे यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. अवघ्या दीड वर्षाच्या कालावधीनंतर अकोट नगरपरिषदे द्वारा अकोला नाका येथील रेल्वे ब्रिजवर पथदिवे लावण्याची प्रक्रिया सुरू झाली. लवकरच ब्रिज सहित अन्य ठिकाणी पथदिव्यांचा झगमगाट पहावयास दिसणार आहे. या सर्व प्रकारामुळे अकोट शहरातील नागरिकांमधे आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

## राजकमल उपहारगृहात चोरी; मुद्देमाल लंपास



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**आडगाव खुर्द, दि. ३१ :** अकोट तालुक्यातील आडगाव खुर्द परिसरातील राजकमल उपहारगृह गृहात २७ मे रोजी रात्री चोरट्यांनी चोरी करून ३० ते ४० हजार रुपयाचा पेक्षा अधिक किमतीचा मुद्देमाल लंपास केला चोरीस गेलेल्या वस्तूमध्ये उपहारगृहातील किराणामाल पान टपरी वरील विविध साहित्य गॅस सिलेंडर यांचा समावेश आहे संबंधित उपहारगृह व पान टपरी चे मालक यांनी आकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात यासंदर्भात तक्रार दाखल केली आहे.

## सर्वांगीण विकास बाल संस्कार शिबिराचा समारोप

### शिबिरासारखे उपक्रम महत्त्वपूर्ण- ॲड. आकाश फुंडकर



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. ३१ :** मोबाईल आणि नवमाध्यमांच्या या युगात नवी पिढी अध्ययन, जीवनमूल्ये व संस्कार यापासून दुरावता कामा नये. मुलांना ही शिकवण व संस्कार देण्यासाठी सर्वांगीण विकास शिबिरासारखे उपक्रम महत्त्वपूर्ण आहेत, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी केले.अकोट येथील श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सर्वांगीण विकास बाल संस्कार शिबिराचा समारोप पालकमंत्री श्री.फुंडकर यांच्या उपस्थितीत झाला. श्री क्षेत्र आळंदी (देवाची) येथील वारकरी शिक्षण संस्थेच्या उपशाखेचे उद्घाटनही यावेळी झाले. आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार अमोल मिटकरी, वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संदिपान महाराज शिंदे, ज्ञानपीठ संस्थेचे अध्यक्ष वासुदेवराव महाराज महल्ले, प्रकाश महाराज जवंजाळ, उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर आदी यावेळी उपस्थित होते.पालकमंत्री श्री.फुंडकर म्हणाले की,पाठांतर,ओव्या,अध्याय,बालमनावर सुसंस्कार करणाऱ्या पारंपरिक अध्ययन पद्धती यांची जपणूक संस्थेतर्फे बाल संस्कार शिबिराच्या माध्यमातून होत आहे.

## ४२ रक्तदात्यांनी केले राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मूर्तिजापूर , दि. ३१ :** स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित राजमाता पुण्यश्लोक अहिल्या होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या शुभ पर्वावर ३० मे २०२५ रोजी आयोजित रक्तदान शिबीर यशस्वी करण्यात आले .सर्वप्रथम राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्प माला अर्पण करून अभिवादन करण्यात आले . कार्यक्रमाचे उद्घाटक माजी आमदार हरिदास भदे तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून आमदार हरीश पिंपळे ,कार्यक्रमाचे अध्यक्ष विठ्ठलराव पातोंड तर प्रमुख उपस्थितीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दिनकरराव नागे , महादेवराव साबे, विष्णुपंत चुडे , काशीराम भाऊ साबळे, विनोद भाऊ नांदुरकर ,प्रा संजय गाडगे व तसेच अरविंदराव गाडवे, डॉ. वसंतराव मुरळ ,डॉ सुरेश बचे ,विनायकराव गुल्हाने ,कमलाकर गावंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत रक्तदान शिबिराचे उद्घाटन करून प्रथम पंकज महल्ले यांनी रक्तदान करून सुरुवात करण्यात आली व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करण्यात आले .यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आमदार हरीश पिंपळे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन कार्यावर यथोचित मार्गदर्शन केले, काशीराम साबळे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची प्रशंसा करीत मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे उद्घाटक माजी आमदार हरीदास भदे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या राज्यकारभाराच्या पद्धती त्यांची शासन व्यवस्था न्यायदानाची व्यवस्था व लोककल्याणकारी योजना व त्यांचे दानदातृत्व याविषयी माहिती देऊन रक्तदान चळवळीचे महत्व सांगितले ,यावेळी पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक प्रा. एल.डी .सरोदे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू भाऊ लोडम यांनी केले यावेळी शहरातील व तालुक्यातील ४२ रक्तदात्यांनी रक्तदान करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन केले व रक्तदान शिबिरास अनेक मान्यवरांनी भेटी टी दिल्या, प्रा. बाळासाहेब सरोदे , भास्कर पातुर्डे शिक्षक,राहुल रोकडे शिक्षक,गजानन गाढवे, डॉ हरीश पातोंड,सुनील सरोदे, सचिन दिवनाले ,शाम अवघड ,पंकज पाटील कांबे ,सचिन देशमुख, सुरेंद्र भेलोंडे ,गिरीश अवघड, मंगेश तांबडे ,राहुल तिडके, नितीन भागवत ,अभिजीत भागवत, डॉ. महेंद्र नवघरे ,विष्णू भाऊ लोडम, सुनील शितोळे, विनोद कडू ,विलास अवघाते ,राम खंडारे, किशोर ठाकूर , मोहम्मद इम्रान मोहम्मद युनूस,निलेश सरोदे,मोहण सरोदे इत्यादी मान्यवरांनी रक्तदान शिबिरास भेटी देऊन शुभेच्छा दिल्या. मुर्तिजापूर तालुका धनगर समाज संघटना व कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी प्रा.एल डी सरोदे, सुनील पंडित शिक्षक, अभिषेक गाडवे ,अनील लाखे, निखिल गाडवे ,रविभाऊ माडकर ,आशीष कोल्हे, वैभव काळे ,अक्षय भागवत, चेतन तांबडे,श्रीकृष्ण गाडवे ,वैभव पिंगळे, तनय शितोळे यांनी रक्तदान शिबिरासाठी अथक परिश्रम घेऊन रक्तदान शिबिर यशस्वी केले.

## गावरान आंब्याची चव लय न्यारी; पातूर नंदापूरचा आंबा लय भारी...

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**पातूर नंदापूर , दि. ३१ :** फळांचा राजा आंबा म्हटलं की तोंडाला पाणी सुटते उन्हाळ्याची चाहूल लागतात ग्रामीण भागामध्ये आंबे खाण्याची वेगळीच मजा यायची आंब्याच्या सीजन ला वडीलाकडे आपली लेक नवऱ्याच्या घरून पहिल्यांदा रसाईला आणण्याची पद्धत होती ग्रामीण भागामध्ये आजही आहे.

परंतु आता आंब्याचे झाडे कमी झाल्यामुळे गावरान आंब्याची चव फार कमी झाली. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये फार मोठे आंब्याची झाडे पाहायला मिळायचे परंतु आता झाडाची वय झाल्यामुळे शेतकऱ्याच्या आमराया संपुष्टात आल्या आहेत. तरी या धकाधकीच्या जीवनामध्ये पातुर नंदापूरच्या आंब्याची चव मात्र वेगळीच आहे. जवळच ५२ खेड्यामध्ये पातुर नंदापूर चा आंबा प्रसिद्ध आहे. आणि याच गावचा आंबा सदा गुलाब गावची ओळख करून गेला आहे. आता ही प्रसिद्ध नावाने ओळखल्या जाणारे आंबे आजही लोकांना चाखायला मिळत आहेत. गुलाब, अमलापुरम, कालीचा बाड, खोबऱ्या, मिरची गोटी, झागुं चा भांड, नाकु, वारूया, सीताफळ, आग्या, श्रावण या, या नावाने प्रसिद्ध आंबे आजही खायला मिळत आहेत. चार महिने शेतकरी या आंब्याची रखवाली करत असतात. परंतु निसर्गाच्या लहरीपणामुळे अवकाळी वारा,पाऊस, माकडांचा नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे फार अतोनात नुकसान होत असते शेतकऱ्याचा उन्हाळ्यामध्ये या आंब्यामुळे आर्थिक उत्पन्नात खूप साथ मिळते जेव्हा शेतीचे उत्पन्न नसते तेव्हा आंब्यामुळे आपल्या संसाराचा उदरनिर्वाह चालत असतो.शहरांमध्ये नावाजलेले आंब्याच्या भावामध्ये आजही त्याच भावात ग्रामीण भागात गावरान आंबा चाखायला मिळत आहे. आजही जुन्या पद्धत च्या नुसार शेतकरी आंबा उतरून आणणे आणि नंतर त्याला गवता मध्ये पिकण्यासाठी ठेवला जातो. आजही कोणत्याच केमिकलचा वापर होत नाही. आणि त्यामुळे या गावरान आंब्याला खूप मोठ्या प्रमाणात मागणी आहे. सदा गुलाब नावाच्या आंब्याने एका आरोपीची फाशी सोडण्यात आली होती अशी कहाणी आहे. मार्केटमध्ये सदा गुलाब नावाचा आंबा विकायला आला होता आरोपीला फाशी होताना विचारण्यात आले तुझी शेवटची इच्छा काय आरोपीने सांगितले माझ्या गावचा सदा गुलाब आंबा मार्केटमध्ये आलेला आहे. त्याचा सुगंध मला आला तो आंबा मला खायची इच्छा आहे. आणि खरंच आंबा मार्केटमध्ये विकायला

## विद्यार्थ्यांनी वाचन- संस्कृती जोपासावी- गजानन नारे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला , दि. ३१ :** आजच्या युगात मोबाईल चा वापर चुकीच्या पद्धतीने होत असल्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची दिशा वाचन संस्कृतीने प्रभावी स्वरूपात प्राप्त होवू शकते असे प्रतिपादन प्रभातकिड स्कुलचे संस्थापक गजानन नारे यानी शैक्षणिक मार्गदर्शनात व्यक्त केली .

मांडेकर परिवारा तर्फे आयोजित पारिवारीक कौतूक सोहळा मध्ये कु . मधुरा सोहळे (नात ) , चि . केदार मांडेकर (नातू ) यांनी ८६% असे भरीव यश संपादन केल्याबद्दल त्यांच्या शैक्षणिक प्रोत्साहनार्थ कार्यक्रमाचे आयोजन जयहिंद चौकात करण्यात आले होते. यावेळी व्यासपिठावरून डॉ . गजानन नारे यांनी विद्यार्थीच्या प्रगती मध्ये पारिवारीक प्रोत्साहन करीता मांडेकर परिवाराच्या शैक्षणिक कार्यक्रमाचे कौतूक करीत विद्यार्थाना घरातील प्रोत्साहन अत्यंत गरजचे व महत्वाचे असल्याचे मत व्यक्त केले . तर न्यु इंग्लिश हायस्कूल चे प्राचार्य माधवजी मुंशी यांनी विद्यार्थ्यांना पारिवारिक संस्कार - त्याचे उत्तम चारित्र घडवितात . परिवार हा दिशादर्शक कार्य करीत असतो असे अनुभवी विचार ठेवून कार्यक्रम उंचस्तरीय असल्याने विद्यार्थाना शैक्षणिक दिशा प्राप्त होते असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी केंद्रप्रमुख ज्ञानेश्वर मांडेकर यांनी करताना विदयार्थ्याच्या भविष्यातील दिशाक्रमणात पारिवारीक योगदान महत्वपुर्ण असल्याने मुलांचा आत्मविश्वास वाढावा याकरीता पारिवारीक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले ,असे स्पष्ट करीत कार्यक्रमाची रुपरेषा विशद केली . कार्यक्रमाचे संचलन जिल्हा परिषद शाळा कुंभारीचे मुख्याध्यापक संतोषजी देशमुख यांनी रंगतदार स्वरुपात शैक्षणिक बाबीस उजाळा देत अभ्यासूपणे केले. कार्यक्रमात पत्रकार विजय केंदरकर, माजी केंद्रप्रमुख सैय्यदरब्बानी , सेवानिवृत्त सुधीर महाजन, यांनी अनमोल विचार व्यक्त केले .आभार प्रदर्शन गोपाल मांडेकर अध्यक्ष सेवा सहकारी संस्था यांनी केले .कार्यक्रमाला गजानन पायदल वारीप्रमुख निलेश कपले, जेष्ठ महादेवराव मांडेकर सेवा सहकारी संस्थाचे उपाध्यक्ष नरेंन्द्रजी भिरड, पुरुषोत्तम मांडेकर, मनोहर कथले , श्रीपाद सोहळे , गजानन कथले, गजानन लोळ, गणेश वानखडे, राहूल वाळेकर , अजय अहिर यांच्या बराच महिला वर्ग उपस्थित होता .

## सुजाण नागरिकांनी निर्भयपणे बोलावे - डॉ.बाबा आढाव



पुणे, दि. ३१ वृत्तसंस्था

'सध्याच्या संधीसाधू राजकारणाला तत्त्वज्ञानाचे सोयरसूतक राहिलेले नाही. आवाज दाबला जात असताना गप्प बसून राहिलो, तर सध्या जे घडत आहे ते सदैव सहन करावे लागेल. ही परिस्थिती बदलण्यासाठी सुजाण नागरिकांनी निर्भयपणे बोलावे,' असे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांनी शुक्रवारी केले.

डॉ. आढाव रविवारी (१ जून) वयाची ९५ वर्षे पूर्ण करत आहेत. हे औचित्य साधून हमाल पंचायत, महात्मा फुले समता प्रतिष्ठान, एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशन आणि विविध समविचारी संस्थांच्या वतीने डॉ. बाबा आढाव यांच्या कार्याचा वेध घेणारा 'सत्यशोधक समाजवादी' हा माहितीपट दाखविण्यात आला. 'लोकशाही समाजवादापुढील आव्हाने आणि दिशा' या विषयावरील परिसंवादाचा समारोप करताना आढाव यांनी संवाद साधला. सुभाष वारे, संजय आवटे, अश्विनी सातव-डोके, डॉ. शमसुद्दीन तांबोळी आणि सुभाष लोमटे यांनी परिसंवादात सहभाग घेतला.'एक-एक करून नागरिकांचे सर्व अधिकार काढून घेण्याचे काम सध्याचे सत्ताधारी करत आहेत. आम्ही सांगू ती दिशा असे स्वरूप असलेल्या कालखंडामध्ये सामान्यांचे जगणे मर्यादित झाले आहे', याकडे लक्ष वेधून आढाव म्हणाले, 'आजही आपले प्रश्न सुटलेले नाहीत. असे असेल तर लोकशाही कशी टिकणार? तरुणांचा आवाजही दाबला जात आहे. त्यामुळे तरुणांनो फक्त बोलून चालणार नाही, कृती करण्याची गरज आहे.'

## मुंबई-नाशिक मार्गावरील कामे पावसाळ्यापूर्वी मार्गी लावा!

मुंबई , दि. ३१ वृत्तसंस्था

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सुरू असलेल्या विविध रस्ते विकास कामांचा वेग वाढवा, तसेच मुंबई-नाशिक महामार्गावरील शक्य तेवढी कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. तसेच नाशिक महामार्गावरील वाहतूक सुरळीत व्हायला हवी, असेही शिंदे यांनी अधिकाऱ्यांना बजावले.राज्य रस्ते विकास मंडळाच्या वतीने राज्यात सुरू असलेल्या विविध विकास प्रकल्पांचा आढावा शिंदे यांनी घेतला. यावेळी त्यांनी ही सर्व कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावीत अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड आणि सर्व अधिकारी उपस्थित होते.मुंबई नाशिक महामार्गाचा आढावा घेऊन महामार्गावरील रखडलेल्या कामांना गती देण्याचे निर्देश दिले. मान्सूनपूर्वी ज्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण पूर्ण होणार नाही त्याचे डांबरीकरण करून रस्ता वाहतूक करण्यास योग्य बनवावा, या मार्गावरील ३१ किलोमीटरचे कॉंक्रीटीकरण होणे अद्यापही बाकी आहे, तसेच पिंपळास चारोटी, रेल्वे ओव्हर ब्रिज येथील काम रखडले आहे या कामांना तत्काळ गती द्यावी, कंत्राटदार ही कामे वेळेत पूर्ण करण्यास हयगय करत असल्यास त्यालाही नोटीस पाठवून ताकीद द्यावी असेही सांगितले.

## पोलिसांनी घेतले बालकांच्या कायद्याचे धडे!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला , दि. ३१ :** अकोला: दिनांक ३० मे २०२५ रोजी महिला व बालविकास विभागांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,पोलीस विभाग व होप फॉर द चिल्डेन पुणे यांच्या संयुक्त विदयमाने पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ अकोला येथील कृषक भवन मध्ये अकोला जिल्हयातील पोलीस स्टेशन मधील बाल कल्याण पोलीस अधिकारी व त्यांना असणारे सहायक यांच्या करीता बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनीयम २०१५ व बालकांचे लैंगीक अपराधा पासुन बालकांचे संरक्षण अधिनीयम २०१२ व इतर बालकांचे महत्वपुर्ण कायदे या बाबत प्रशिक्षणाचेआयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण कार्यशाळेचे उदघाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अकोलाचे प्रभारी सचिव भेंडवले बाल न्याय मंडळाचे अध्यक्ष कुळकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी सतिश कुळकर्णी, पोलीस निरीक्षक सातव बाल न्याय मंडळाच्या सदस्य ॲड.सारीका घिरणीकर, बाल कल्याण समिती अध्यक्ष एडवोकेट अनिता गोरवे, एडवोकेट लीला तोष्णीवाल, राजेश देशमुख, डॉ विनय दांदळे, प्रांजली जयस्वाल यांचे हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणुन परम आनंद, सचिन करंजुले, वसिम शेख लाभले होते. कार्यशाळेचे प्रास्तावीक . गिरीश पुसदकर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्तावीकामध्ये कार्यशाळा घेण्या मागचा उदेश व हेतु सांगीतले. कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक श्री. परम आनंद यांनी बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनीयम २०१५ या वर विस्तृत आणी प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात मार्गदर्शन केले. श्री.वसीम शेख यांनी विधी संघर्ष ग्रस्त बालकांना बाल न्याय मंडळा पुढे सादर करतांनाअनुसरावयाची कार्यपध्दती आवश्यक कागदपत्रे, या बाबत माहीती दिली. तसेच श्री. सचिन करंजुले यांनी बालकांचे लैंगीक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधिनीयम २०१२ या कायदयामध्ये असणारी कलमे व त्या नुसार होणार शिक्षा, पोलीसांनी या कायदयांतर्गत कोणती कलमे लावावी तसेच तपासाची दिशा याबाबत मार्गदर्शन करून प्रशिक्षणार्थीच्या मनात असणारे प्रश्नांची उत्तरे देवुन त्यांच्या शंकाचे निरसन केले.

पोलीसांना बालकांच्या कायदया बाबत तपासाकरीता आवश्यक असणारे कायदया मध्ये नमुद केलेले विवीध अर्जांचे नमुने, साहीत्य, प्रमाणपत्र देण्यात आले या प्रशिक्षण कार्यशाळेचे सुत्रसंचालन जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे श्री.नितीन अहीर यांनी केले तर आभार प्रदर्शन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजु लाडुलकर यांनी केले. सदर प्रशिक्षण कार्यशाळेला जिल्हयातील २३ पोलीस स्टेशनचे बाल कल्याण पोलीस अधिकारी व बालकांच्या गुन्हांचे तपास करणारे अधिकारी व कर्मचारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष कर्मचारी,चाईल्ड हेल्पलाईन, रेल्व चाईल्ड हेल्प लाईन, एन्करेज एज्युकेशनल फाउंडेशन, ॲसीस टु जस्टीस प्रकल्पाचे समन्वयक, सर्व बालगृहांचे समुपदेशक उपस्थीत होते.

## थोडक्यात

### स्टील आयातीवरील टेरिफ केला दुप्पट, ४ जूनपासून नियम लागू होणार

**वाशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी ३० मे परदेशी स्टील आयातीवरील शुल्क २५ टक्क्यांवरून थेट ५० टक्क्यांपर्यंत दुप्पट करण्याची घोषणा केली आहे. हा निर्णय ४ जून २०२५ पासून लागू होईल, अशी माहिती त्यांनी दिली. पेनसिल्व्हेनियातील यूएस स्टीलच्या मोन व्हॅली वर्क्स-इर्विन प्लांटमध्ये बोलताना ट्रम्प यांनी सांगितले की, या शुल्कवाढीमुळे अमेरिकन स्टील उद्योगाला संरक्षण मिळेल आणि देशांतर्गत उत्पादन बळकट होईल. ट्रम्प यांनी कामगारांना संबोधित करताना म्हटले, आता कोणीही यातून सुटू शकणार नाही. चीनवर निशाणा साधत त्यांनी पुढे म्हटले, अमेरिकेचे भविष्य शांघायच्या स्वस्त पोलादावर नव्हे, तर पिट्सबर्गच्या ताकदीवर आणि अभिमानावर घडवले जाईल, सरकारच्या आकडेवारीनुसार, ट्रम्प यांच्या अध्यक्षपदापासून स्टील उत्पादनांच्या किंमतीत १६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. याशिवाय, ट्रम्प यांनी जपानच्या निप्पॉन स्टीलसोबतच्या नवीन कराराची घोषणा केली. ज्याअंतर्गत यूएस स्टील ही अमेरिकन कंपनी राहील. या करारानुसार, निप्पॉन स्टील पेनसिल्व्हेनिया, इंडियाना, अलाबामा, अर्कांसस आणि मिनेसोटा येथील यूएस स्टीलच्या कामकाजात अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करेल, तरीही कंपनी अमेरिकन नियंत्रणाखाली राहील. पिट्सबर्गजवळील यूएस स्टीलच्या गोदामात आयोजित कार्यक्रमात ट्रम्प म्हणाले, हा करार यूएस स्टीलला अमेरिकन कंपनी म्हणून कायम ठेवेल. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत सांगितले की, स्टील आणि ॲल्युमिनियमवरील शुल्क ४ जूनपासून ५० टक्क्यांपर्यंत वाढवले जाईल. आमचे स्टील आणि ॲल्युमिनियम उद्योग पूर्वीपेक्षा अधिक मजबूत होत आहेत.

### काँग्रेस आमदाराच्या पुतण्याचे आजोबांनीच केले अपहरण

**बेगमगंज :** मध्य प्रदेश काँग्रेसचे आमदार देवेंद्र पटेल यांच्या दोन वर्षांच्या पुतण्याचे अपहरण करून दीड किलो सोन्याची खंडणी मागितल्याप्रकरणी तीन जणांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या तीन जणांमध्ये पीडित मुलाच्या आजोबाचाही समावेश आहे. याबाबत पोलिसांनी माहिती दिली आहे.या प्रकरणातील पीडित मुलगा आमदार देवेंद्र पटेल यांचे बंधू योगेंद्र पटेल यांचा मुलगा आहे. गुरुवारी सकाळी रायसेन जिल्ह्यातील बेगमगंज तालुक्यातील पलोहा गावातून त्याचे अपहरण करण्यात आले होते. मात्र, त्याच रात्री उशिरा पलोहापासून सुमारे २०० किमी दूर असलेल्या छिंदवाडा जिल्ह्यातील तामिया शहरातून मुलाची सुटका करण्यात आली. रायसेनचे पोलीस अधीक्षक पंकज पांडे यांनी सांगितले की, मुख्य आरोपी अरविंद पटेल हा मुलाचा आजोबा आहे.''आम्ही मुलाचा शोध घेण्यासाठी ११ पोलीस पथके तयार केली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे, आम्ही त्याचा तामियापर्यंत शोध घेतला. तेव्हा पीडित मुलगा अरविंद पटेल याच्या मित्राच्या घरात सापडला'', असे पोलीस अधिक्षक पंकज पांडे यांनी सांगितले.नवरा काय करतो हे विचारलं अन् जवळ येऊन किस; बॉलीवूड अभिनेत्रीने सांगितला धक्कादायक प्रसंग, म्हणाली, ''त्याने मला''पोलिसांच्या म्हणण्यानुसार, अरविंद पटेलने त्याचा नातेवाईक राकेश पटेल आणि तिसऱ्या साथीदारासह अपहरणाचा कट रचला आणि खंडणी म्हणून १.५ किलो सोने मागितले.

### पंडित अजित कडकडे यांना 'गोमंत विभूषण' जाहीर



**पणजी :** राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान अशी ख्याती असलेला 'गोमंत विभूषण' पुरस्कार यंदा नामवंत शास्त्रीय गायक पंडित अजित कडकडे यांना जाहीर झाला आहे. शुक्रवारी घटकराज्य दिन सोहळ्यात मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी त्या पुरस्काराची घोषणा केली. गोमंतकीय सुपूत्र पं. कडकडे यांनी आपली सुमधुर गायकी, भक्तिरसपूर्ण अभंग व भजन याद्वारे गोवा तसेच राष्ट्रीय स्तरावर संगीत क्षेत्रात बहुमोल योगदान दिले आहे. पंडितजी सध्या मुंबईत स्थायिक असले तरी, आपण गोमंतकीय असल्याचे ते अभिमानाने सांगतात, याचाही मुख्यमंत्र्यांनी उल्लेख केला. अशा या महान कलाकाराच्या योगदानाचा गौरव म्हणून त्यांना गोमंत विभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. लवकरच एका औपचारिक समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

# आंतरराष्ट्रीय मध्यस्थ संघटना स्थापन ; चीनचा पुढाकार

## पाकिस्तानसह तीसहून अधिक देश सदस्य

**हाँगकाँग , दि.३१** वृत्तसंस्था



अमेरिकेचा प्रभाव असलेल्या संस्था-संघटनांचे वर्चस्व नाकारणाऱ्या चीनने इतर तीस देशांना बरोबर घेत आंतरराष्ट्रीय मध्यस्थ संघटनेची (आयओएम) स्थापना केली आहे. वाद असलेल्या देशांमध्ये मध्यस्थी करत सामोपचाराने तोडगा काढण्याचा या संघटनेचा उद्देश असल्याचे चीनच्या अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. चीनसह पाकिस्तान, इंडोनेशिया, बेलारूस आणि क्युबासह तीसहून अधिक देशांनी याबाबतच्या करारावर आज सही केली.
चीनचे पंतप्रधान वँग यी यांच्या अध्यक्षतेखाली आज या संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनेत अनेक विकसनशील देश सहभागी झाले असल्याने दक्षिण जगात चीनचा प्रभाव वाढत असल्याचे हे चित्र आहे, असे तज्ज्ञांनी सांगितले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयातशुल्क धोरणामुळे जगभरात तणाव वाढला असल्याच्या पार्श्वभूमीवर या संघटनेची स्थापना झाली आहे.
या कार्यक्रमावेळी वँग यी म्हणाले,''परस्पर सामंजस्यानेच आणि विश्वासाची भावना निर्माण करूनच वादांवर तोडगा काढला जावा, हीच चीनची प्रथमपासून भूमिका आहे. दोन देशांमधील वाद मिटविण्यासाठी चिनी संस्कृतीतील शिकवणीचाही वापर केला जाणार आहे. एकाचा विजय आणि एकाचा पराभव या मानसिकतेच्या पुढील टप्पा या संघटनेच्या मदतीने गाठण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.''
'आयओएम'चे मुख्य कार्यालय हाँगकाँग येथे असेल. विविध आंतरराष्ट्रीय वाद मिटविण्यासाठी आणि जगभरात सौहार्दपूर्ण वातावरणनिर्मितीसाठी प्रयत्न करणे, हे या संघटनेचे उद्दिष्ट आहे. मध्यस्थीच्या माध्यमातून वाद मिटविण्यासाठी कायदेशीररीत्या स्थापन झालेली ही जगातील पहिलीच आंतरसरकार पातळीवरील संघटना असल्याचा दावा चीनने केला आहे. या संघटनेमुळे संयुक्त राष्ट्रांच्या नियमांचे संरक्षण करण्यासही मदत होणार असल्याचे चीनने म्हटले आहे.
'आयओएम'च्या स्थापनेच्या कार्यक्रमाला पन्नास देशांचे आणि संयुक्त राष्ट्रांसह वीस संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. ही संघटना आंतरराष्ट्रीय न्यायालय, आंतरराष्ट्रीय लवाद यांसारख्या संस्थांना पूरक ठरणारे काम करणार आहे. या दोन्ही संस्था वादांवर निकाल देणाऱ्या आहेत, तर 'आयओएम'द्वारे मध्यस्थीच्या साह्याने वाद मिटविण्याचा पर्याय उपलब्ध करून देणार आहे, असे चीनच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. या संघटनेचे नियम, अटी आणि इतर उद्देश अद्याप जाहीर करण्यात आलेले नाहीत.

## पुण्यातील तरुणीला कोलकाता पोलिसांकडून अटक

### 'ऑपरेशन सिंदूर'नंतर आक्षेपार्ह व्हिडिओ पोस्ट केल्याचा आरोप

**पुणे, दि.३१** वृत्तसंस्था



पुण्यात कायद्याचे शिक्षण घेत असलेल्या शर्मिष्ठा पानोली नावाच्या विद्यार्थिनीला शुक्रवारी रात्री कोलकाता पोलिसांनी गुरुग्राम येथून अटक केली. या विद्यार्थीनीवर ऑपरेशन सिंदूरवरील पोस्टला उत्तर देताना आक्षेपार्ह टिप्पणी केल्याचा आरोप आहे.
पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार या विद्यार्थीनीने इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ अपलोड केला होता, ज्यामध्ये एका विशिष्ट धर्माला लक्ष्य करून ''अपमानजनक आणि अपमानजनक टिप्पणी'' होती.
दरम्यान या विद्यार्थीनीने हा व्हिडिओ नंतर डिलीट केला होता. या प्रकरणी कोलकाता येथील पोलीस स्टेशनमध्ये पोलिस तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर, कोलकाता पोलिसांनी तिच्याविरुद्ध एफआयआर दाखल केला होता.''हे प्रकरण शर्मिष्ठा पानोली नावाच्या तरुणीच्या इन्स्टाग्राम व्हिडिओशी संबंधित आहे. तरुणीच्या व्हिडिओमुळे एका विशिष्ट समुदायाच्या सदस्यांच्या धार्मिक भावना दुखावलेल्या आहेत'', असे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

## हिमकडा कोसळला, अख्खे गाव मलब्यात बुडाले

### तरीही बचावले गावकरी

**स्वित्झर्लंड , दि.३१** वृत्तसंस्था



स्वित्झर्लंडच्या आल्प्स पर्वतरांगांतील एका सुंदर गावावर निसर्ग कोपला. बिर्च हिमनदीतील कडा या गावावर कोसळला. लाखो घनमीटर बर्फ, दगड व गाळ एक क्षणात डोंगरावरून खाली आला आणि संपूर्ण ब्लाटेन गाव बघता बघता मलब्यात गायब झालं. २९ मे रोजी स्वित्झर्लंडमधील व्हिलरनजीक ही दुर्घटना घडली. दृश्य इतकं भयावह होतं की गावातील उरलेली काही घरे देखील नंतर पुरात वाहून गेली. शास्त्रज्ञांनी यामागे हवामान बदलाचे दुष्परिणाम असल्याचे संकेत दिले आहेत.
या घटनेमुळे संपूर्ण गावाचा नकाशाच बदलून गेला आहे. सुदैवाने, भूस्खलनाची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने मे महिन्याच्या सुरुवातीलाच ३०० रहिवाशांना सुरक्षितस्थळी हलवले होते. मात्र, ६४ वर्षीय एक व्यक्ती अद्याप बेपत्ता असून मोठ्या प्रमाणात गाळ असल्यामुळे शोधमोहिमेला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.गंभीर बाब म्हणजे गाळ व दगडांचे मोठे ढीग जवळपास दोन किलोमीटर अंतरापर्यंत नदीच्या प्रवाहात अडथळा निर्माण करत आहेत. यामुळे लोंजा नदीचा प्रवाह थांबून मोठे जलाशय तयार झाले असून, पाण्याची पातळी ताशी ८० सेंटीमीटरने वाढत आहे.

## अमेरिकेतून आता ५ लाख स्थलांतरित हद्दपार होणार?

### सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर ट्रम्प सरकारचा मार्ग मोकळा

**वाशिंग्टन , दि.३१** वृत्तसंस्था



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मागील काही दिवसांपासून अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांमध्ये टॅरिफ धोरण आणि बेकायदेशीर स्थलांतरिताचा मुद्दा प्रामुख्याने चर्चेत आहे. ट्रम्प यांनी अमेरिकेची सूत्रे हाती घेतल्यापासूनच बेकायदेशीर स्थलांतरितांविरुद्ध कारवाईला सुरु करण्यात आली होती. या कारवाईच्या माध्यमातून बेकायदेशीर स्थलांतरितांना अमेरिकेतून हद्दपार करण्यात आल्याचंही पाहायला मिळालं. यानंतर आता ट्रम्प यांच्या स्थलांतरिताविरोधातील मोहिमेला बळ देणारा निर्णय अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.
अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने अमेरिकेत राहणाऱ्या लाखो स्थलांतरितांना मिळालेला तात्पुरता कायदेशीर दर्जा संपुष्टात आणण्याची परवानगी ट्रम्प प्रशासनाला दिली आहे. हे स्थलांतरित व्हेनेझुएला, क्युबा, हैती आणि निकाराग्वा या सारख्या देशातील असल्याचं सांगितलं जात आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता जवळपास ५ लाख स्थलांतरितांवर अमेरिकेतून हद्दपारीची टांगती तलवार असल्याचं बोललं जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.
अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या कार्यकाळात ५,३२,००० स्थलांतरित नागरिकांना तात्पुरता कायदेशीर दर्जा देणारा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, ट्रम्प सत्तेत आल्यानंतर त्यांनी विविध देशांतून अमेरिकेत आलेल्या पाच लाखांहून अधिक निर्वासितांचे कायदेशीर संरक्षण रद्द करण्याच्या संदर्भातील निर्णय घेतला होता. पण जो बायडेन यांनी घेतलेला 'इमिग्रेशन पॅरोल'चा निर्णय रद्द करण्याच्या ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयाला अमेरिकेतील बोस्टनस्थित एका यूएस जिल्हा न्यायाधीशांनी स्थगिती दिली होती.
यानंतर आता अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाला या निर्वासितांना दिलेला तात्पुरता कायदेशीर दर्जा रद्द करण्याची परवानगी देत जिल्हा न्यायालयाने दिलेली स्थगिती उठवली. त्यामुळे आता तब्बल ५ लाखांपेक्षा जास्त निर्वासितांच्या हद्दपारीवर टांगती तलवार असून या निर्णयामुळे ट्रम्प प्रशासनाच्या स्थलांतरितांबाबतच्या धोरणाला आणखी बळ मिळण्याची शक्यता आहे.
इमिग्रेशन पॅरोल हा अमेरिकन कायद्यानुसार तातडीच्या कारणांसाठी देशात राहण्यासाठी तात्पुरत्या परवानगीचा एक प्रकार आहे.

## अकरा वर्षांत कोट्यवधींचा गैरव्यवहार; मल्लिकार्जुन खर्गे यांचा मोदी सरकारवर आरोप

**नवी दिल्ली , दि.३१** वृत्तसंस्था



मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात देशभरात तब्बल ६.३६ लाख कोटी रुपयांचे बँक गैरव्यवहार झाल्याचा हल्लाबोल काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज केला. सरकारच्या नसानसांमध्ये भ्रष्टाचार भिनला असल्याचा टोलाही खर्गे यांनी लगावला.
नरेंद्र मोदी यांनी २६ मे २०१४ रोजी पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर भाजप सरकार अस्तित्वात आले होते. मोदी सरकारचा हा तिसरा कार्यकाळ असून २६ मे रोजी सरकारला ११ वर्षे पूर्ण झाले आहेत. त्यापार्श्वभूमीवर खर्गे यांनी सरकारवर कोरडे ओढले. खर्गे यांनी सोशल मीडिया 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले, मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात ६,३६,९९२ कोटी रुपयांचे बँक गैरव्यवहार झाले. ही वाढ तब्बल ४१६ टक्क्यांची आहे. नोटाबंदीनंतरही मागील वर्षांमध्ये ५०० रुपयांच्या बनावट नोटांची संख्या देखील २९१ टक्क्यांनी वाढली आहे.पंतप्रधान मोदींच्या धमन्यांमध्ये, नसांमध्ये काय आहे हे ठाऊक नाही.

## अहिल्यादेवी जयंतीनिमित्त राहुल गांधी, शरद पवार, अखिलेश यादव एकत्र

**नवी दिल्ली, दि.३१** वृत्तसंस्था



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त उद्या (ता. ३१) राष्ट्रीय समाज पक्षातर्फे दिल्लीत होणाऱ्या कार्यक्रमामध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी, ज्येष्ठ नेते शरद पवार आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव एकाच व्यासपीठावर येणार आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी आज ही माहिती दिली.
अहिल्यादेवी होळकर जयंतीबद्दल महादेव जानकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले, की दिल्लीच्या तालकटोरा स्टेडियममध्ये जयंती सोहळा होणार आहे. दिल्लीत अहिल्यादेवींची जयंती साजरी करण्याचे हे पाचवे वर्ष आहे.
यासाठी अहिल्यादेवी होळकरांचे जन्मस्थान असलेल्या चौंडी (जि. अहिल्यानगर) येथून तसेच वाराणसी, गुजरात अशा सहा ठिकाणाहून निघालेल्या रथयात्रा दिल्लीत पोचल्या आहेत. जयंती सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितीसाठी विरोधी पक्षनेते राहुल गांधी, ज्येष्ठ नेते शरद पवार तसेच समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांना निमंत्रण दिले होते.त्यांनी उपस्थित राहण्यासाठी होकार दर्शविला आहे, अशी माहिती जानकर यांनी दिली. तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन, राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष तेजस्वी यादव यांनाही निमंत्रण पाठविल्याचे त्यांनी सांगितले.

## सिंधू जल करार आमच्यासाठी लक्ष्मणरेषा -असीम मुनीर

**इस्लामाबाद , दि.३१** वृत्तसंस्था



सिंधू पाणी करार स्थगित करण्याच्या भारताने घेतलेल्या निर्णयावर पाकिस्तानचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी यास लक्ष्मण रेखा म्हटले असून पाण्याशी संबंधित बाबींवर इस्लामाबाद कधीही झुकणार नाही, असे म्हटले आहे.
तसेच सिंधू पाणी कराराच्या मुद्द्यावर पाकिस्तान कधीही तडजोड करणार नाही, कारण तो देशाच्या २४ कोटी नागरिकांच्या मूलभूत हक्कांशी थेट जोडलेला आहे, असे विधान मार्शल यांनी पाकिस्तानी लष्कराची मीडिया विंग इंटर सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्सनुसार, विविध विद्यापीठांचे कुलगुरू, प्राचार्य, वरिष्ठ शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांशी झालेल्या चर्चेदरम्यान केले आहे.
भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदी करार झाल्यानंतर काही आठवड्यांनंतर, पाकिस्तानचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर यांनी म्हटले आहे की, इस्लामाबाद दक्षिण आशियाई प्रदेशात भारताचे वर्चस्व कधीही स्वीकारणार नाही. पाणी ही पाकिस्तानची लाल रेषा आहे आणि आम्ही २४ कोटी पाकिस्तानी लोकांच्या या मूलभूत अधिकाराशी कोणतीही तडजोड करू देणार नाही.
२२ एप्रिल या दिवशी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २६ भारतीय पर्यटकांची गोळ्या झाडून निर्घृणपणे हत्या केली. या भ्याड हल्ल्यानंतर भारतवासीयांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळून आली होती. दुसऱ्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीने (सीसीएस) बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत १९६० चा सिंधू पाणी करार स्थगित करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला होता.
भारताने राजनैतिक मुत्सद्देगिरीसाठी आणि सिंधू पाणी करार रद्द करण्यासाठी आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी जगातील विविध देशांमध्ये सात सर्वपक्षीय शिष्टमंडळे पाठवली आहेत. सिंधू पाणी करार हा भारत आणि पाकिस्तानमधील सिंधू, झेलम, चिनाब, रावी, बियास आणि सतलज या सहा नद्यांच्या पाण्याच्या वाटप आणि व्यवस्थापनावर आधारित आहे.

# पाकिस्तानची हवाई सुरक्षा प्रणाली, लढाऊ विमान क्षणार्धात होणार नष्ट

## रशियाकडून आर-३७ एम क्षेपणास्त्राची ऑफर

**मॉस्को, दि.३१** वृत्तसंस्था




भारत-पाकिस्तान दरम्यान तणाव असताना रशियाने भारताला आर-३७एम क्षेपणास्त्राची ऑफर दिली आहे. ही ऑफर सू-३०एमकेआय लढाऊ विमानांच्या ताफ्याला या क्षेपणास्त्रांनी युक्त करण्यासाठी आहे. आर-३७एम एक हायपरसोनिक दीर्घ पल्ल्याचे हवेतून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र आहे.
एए-१३ एक्सहेड नावाने ओळखल्या जाणाऱ्या आर-३७एमचा मारक पल्ला ३००-४०० किलोमीटर इतका आहे. तर याचा कमाल वेग मॅक ६ इतका आहे. या अत्याधिक वेगामुळेच हे जगातील सर्वात घातक बियॉन्ड-व्हिज्युअल-रेंज (बीव्हीआर) क्षेपणास्त्रांपैकी एक ठरले आहे. हे आकाशात लक्ष्याला ट्रॅक न करता त्याच्यावर हल्ला करण्याची क्षमता बाळगून आहे. पाकिस्तान आणि चीनसोबत क्षेत्रीय तणावादरम्यान भारत स्वत:चे हवाईसामर्थ्य वाढवू इच्छित असल्याने ही ऑफर महत्त्वपूर्ण ठरत आहे.

**आर-३७एम क्षेपणास्त्राची वैशिष्ट्ये**

या क्षेपणास्त्राला रशियाच्या विम्पेल डिझाइन ब्युरोने विकसित केले असून एअरबोर्न वॉर्निंग अँड कंट्रोल सिस्टीम, टँकर विमान, लढाऊ विमानांसारख्या हायव्हॅल्यू एअर टार्गेट्सना निष्प्रभ करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे.
जेटिसनबल रॉकेट बूस्टर क्षेपणास्त्राला ३००-४०० किमीची विस्तारित कक्षा प्राप्त करण्यास सक्षम करतो. भारताच्या वर्तमान आर-७७ क्षेपणास्त्रांपेक्षा ही कक्षा अधिक आहे, आर-७७ ची मारककक्षा जवळपास १०० किमी आहे. क्षेपणास्त्राचा मॅक ६ (जवळपास ७४०० किमी/प्रतितास)पर्यंतचा हायपरसोनिक वेग लक्ष्यांवर वेगाने हल्ला करते, ज्यामुळे शत्रूला वाचण्याची संधीच मिळत नाही.
या क्षेपणास्त्राचे वजन जवळपास ५१० किलो असून सोफिस्टिकेडेड गायडेन्स सिस्टिमने युक्त असून तो याला मिड-कोर्ट अपडेट्स, ॲक्टिव्ह रडार होमिंग आणि टर्मिनल फेससाठी नेव्हिगेशनशी जोडतो.
आर-३७ एम अनेक विमानांमध्ये जोडले जाऊ शकते, ज्यात एसयू-३०, एसयू-३५, एसयू-५७, मिग-३१बीएम आणि मिग-३५ सामील आहे. रशियाने एसयू-३० साठी ऑफर केले.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

# हुंड्याला करू या हद्दपार!



विचारमंथन
सौ.प्रांजल रायपुरे
9028825708

स्त्रीचे आयुष्य वर्तुळासारखं असतं त्याचा कधीच शेवट नसतो. वेळ, सत्ता, संपत्ती, शरीर साथ सोडणारी असते. बालपण सरले की चाहुल तारुण्याची बेभान वेळेचा अपव्य करीत पुढे चालत राहते. पौगंडावस्थेत उत्साह, ऊर्जा, मस्ती, आली की हांजीहांजी न करता आविर्भावात वागू लागते.. वेळ निघून जाते जबाबदारी आली की मग ती भानावर येते. हळूहळू हुरहूर चिंतेने गोंधळून जाते. वेळीच भानावर आल्याने वैगुण्यांना तिलांजली देते.. चारित्र्यसंपन्न जीवन जगून कुटुंब आणि समाजहितासाठी आपलं जीवन सार्थकी लावते. स्त्रीच आयुष्य नाती जपण्यासाठीच असते. आयुष्यभर कोणत्या ना कोणत्या नात्यात जगते बालपणी आई बाबात गुंतते, लग्नानंतर सासरमाहेरात गुंतते. नवरा, दिराणी, सासू असे अनगिनत नाते जिवापाड जपते. सर्वांना आपलेसे करते.. संवेदनशीलता हा स्त्रीचा स्वभावगुणच सहनशीलतेने भरलेला समुद्रच असतो. मनाविरुद्ध घडूनही ती नात्यातील जिव्हाळा, जोपासते जीवन जगणे म्हणजे तारेवरची कसरतच !...आयुष्यात प्रत्येक वाटेला सहज मिळत नाही रक्ताची नाती, हृदयाला जोडणारी, काही क्षणापुरतीची काहीकाही नाती मुळासारखे घट्ट वृक्षासमान बनलेली ..तर काही अलगद फांदीसारखी काम झाले की ती आपोआप तुटलेली ..काही नाती न जुळताही टिकून राहतात...

स्त्री जीवन रहस्यमय आहे. कितीही दुःख यातना असल्या तरी तिला जगासमोर हसावेच लागते.. दुःखाचे पाणी पापण्यात लपवून चेहऱ्यावर हसू आणते. नशिबाने नाते जुळले असे मानून आयुष्यभर टिकवते. प्रत्येक स्त्रीने भान ठेवून जगावे लागेल सहानुभूतीत जगावे!.. पण मनात आदर आपुलकी असावी.. नाहीतर स्वतःची फसगत करून घ्यावी असेही वागू नये. अन्यायाला प्रत्युत्तर प्रत्येक वेळेस द्यावे.. माणसाची माणुसकी आज पशुवत वागत आहे. आत्मकेंद्रीत जगत आहे. संस्काराचे धडे तूच का मिरवावे या जगासाठी जीवनाचा आनंद लुटावा तरच जीवन सार्थकी लागेल. ईश्वराची निर्मिती तूच आहे संस्कार, संस्कृतीचे भान ठेवणारी कीर्तीचा सुगंध पसरवणारी तू जननी



तुझे कार्य तू विसरू नकोस.. लहानपणापासूनच आई-वडील मुलीला फुलपाखरा सम जपतात.. पहिली बेटी धनाची पेटी, सुख शांती लक्ष्मी मानतात शिक्षण, संस्कार देऊन २५ वर्षे सांभाळतात. क्षणात परक्याचं धन होते. मुलगी सुखात राहावी म्हणून कर्ज काढून लग्न करून देतात.. समाजाला दाखवण्यासाठी सुख पैशाच्या स्वरूपात वाटतात. जे सुख क्षणीक आहे!.. तरीही आजही मुलींची बोली हुंडा स्वरूपात लावतात मुलगी जर स्वावलंबी आहे तर कशाला हवा हुंडा?..या पद्धतीसाठी महान महात्म्यांनी विरोध करून स्त्रीला गुलामगिरीतून मुक्त केले. पण आज वैष्णवी हगवनेची घटना हृदयाला पीळ देऊन अनगिनत प्रश्न करवते?..सुंदर, सुशिक्षित असूनही टोकाचा निर्णय का?कोवळ्या निष्पाप मुलाचे विचार मनात आले नाही. श्रीमंतीचा थाट समाजात गाजवला म्हणूनच या गोष्टीला स्टेटस इन्स्टा, व्हाट्सअप ग्रुप अनेक वाहिन्यांवर न्यूज म्हणून गाजवली. पण शेवटी देह जरी गेला सोडून वैष्णवीचा पण समाजाला प्रश्न करून गेली! कुठेतरी व्यक्त होणारे व्यक्तीला जर सांत्वना मिळाली, निगेटिव्हिटीची ऊर्जा निघून गेली.. तर परिस्थितीला सामना करू शकते. जेवढे डोक्याला शांत ठेवणार तेवढी बुद्धी तल्लकतेने वाटचाल करते. शेवटी काय सोडावे काय नाही ज्याचे त्यांनीच ठरवावे.. आजची स्त्री अबला नाही!.. पैशासाठी का तिने छळ सहन करावा. मानसिक त्रासात जर तिचाच प्रियकर वैरी झाला तर आत्महत्येला बळी पडतात..*हुंडासाठी कधीच खुडू नये कुणाची कळी* आजच्या परिस्थितीत प्रत्येक मुलगी लाडाची आहे. इच्छा पंख बाप पुरवितो दुःख यातना पतीच्या घरी काय अर्थ प्रेम विवाहात?.. जर स्त्री सुरक्षित नाही केवळ पैशासाठीच वैष्णवीच्या जीवाची राख चहू दिशेने न्याय मागते.. आजची नवी पिढी आईवडिलांचे मुळीच ऐकत नाही. चांगली दिशा, मार्गदर्शन रोक, टोका सम.. बापाचे मन जाणले नाही केवळ वैष्णवीच्या हट्टापायी उभे आयुष्य खणवले.

मी ही आत्महत्या मानत नाही!... समाजाला दंडीत करून गेली.. प्रतिष्ठित श्रीमंतीत लोळणाऱ्या समाजातील घटनेने जबर न्यूज बनली. पण रोज एक वैष्णवी अत्याचाराच्या कोंडीत जगत आहे तिचा उहापोहही नाही...

दैवी गुणांची खाण प्रत्येक स्त्री आहे. मग का हा? विचारांचा व्यभिचार... मध्यंतरी अशी न्यूज खूप फोफावली अवकाळी पावसाने जलमय मंगल कार्यालय झाले. मराठी समाजाचा विवाह सोहळा चक्क मुस्लिम बांधवांनी बाजूच्याच मंगल कार्यालयात पार पडला.. एक नवा संदेश समाजाला दिला हीच आहे खरी मानवतेची सेवा कुठल्याच जाती पंथाला न जुमानता केवळ माणुसकीचा विचार जोपासला.. ऐकून समाजात असेही लोक आहेत मदतगार मनातील भिन्न भिन्न विचारांना शांती मिळाली.. खरंच गुन्हा होण्याआधी स्वतःला सावरा.. कायदेकानून खूप कडक आहेत त्याचा उपयोग करा.. न रडावे, न रुसावे जीवनाचा आनंद गुलकंदा परीस जगावे. देहरुपी नौकेत अनेक प्रश्न आहे?.. हर सवाल का जवाब तूही है अशा विश्वासावरच जीवन जगायचे. शांत विचारांची जोपासना असेल तर वैतागून आत्महत्या करणारी वैष्णवी जन्माला पुन्हा येणार नाही.. तरच लग्नाच्या नावाखाली दिखाऊ सोंगटं बंद होईल. हुंड्यासाठी मुलींचा बळी पडणार नाही*...

# संकटांनो मी अजूनी मानलेली हार नाही!



गजलायन
गिरीष खोब्रागडे
मो. 8263912741

एकटा पडलो तरीही घेतली माघार नाही
संकटांनो मी अजूनी मानलेली हार नाही
काय मग कळणार किंमत रोषणाईची अशांना
जन्मल्यापासून ज्यांनी पाहिला अंधार नाही

काट्याकुट्यांचा रस्ता अनवाणी तुडवत निघालेल्या पावलांना, सोसण्या-भोगण्याची ठणक समजून सांगावी लागत नाही. व्यथा-वेदनांचे निखारे पायाला बांधलेली अस्वस्थ वाटचाल ज्यांच्या हिश्श्याला आली, त्यांना वेदनेचे सौंदर्यशास्त्र वेगळे उलगडून दाखवावे लागत नाही. ते त्यांना आपसूक कळते, मात्र जन्मतःच ज्यांच्या दृष्टीला अंधार पडला नाही, त्यांना उजेडाची किंमत कळावी तरी कशी ? ज्या उपेक्षितांना इथल्या प्रस्थापित उजेडवाटांनी कायम नाकारले, अशांना उजेडाच्या एकेका कवडशाची मोजलेली किंमत नेमकी कळते. गावकुसाबाहेरच्या अभावग्रस्त जगण्या-मरण्याचे सगळे अस्सल संदर्भ घेऊन दमदार वाटचाल करणारी गिरीश खोब्रागडे या प्रतिभासंपन्न युवा गज़लकाराची गज़लप्रतिभा म्हणूनच आवर्जून दखल घेण्यास भाग पाडते. बुद्धिभेदाचे शास्त्र वापरून मुठभरांनी प्रगतीच्या सगळ्या पायवाटा व्यापून टाकल्या, परंतु या शर्यतीत मागे पडलो तरी माघार घ्यायची नाही असा उत्तुंग आशावाद गिरीश आपल्या गज़लेतून पेरतो. धर्म आणि जातीपातीच्या कपोलकल्पित मान्यता उभ्या करून येथल्या चाणाक्ष वर्णवाद्यांनी बहुसंख्य लोकांचा घात केला. या परक्यांनी तर फसवणूक केलीच, परंतु जवळच्या माणसांनीही पायवाटेवर सुरुंग पेरले. निधड्या छातीने युद्धाला सामोरे जाताना पाठीमागून आपलेच दगा फटका करत असतील तर काय करायचे ?

पराभव अटळ आज युद्धात माझा
जवळचाच व्यक्ती करे घात माझा

गिरीशची गज़ल अशी कुठलाही आडपडदा न ठेवता सरळ मुद्द्याला भिडते. त्याच्या गज़लेचा रोखठोक स्वभाव वाचकांना अंतर्मुख केल्याशिवाय राहत नाही. कागदावरच्या लोकशाहीने बेमालूमपणे लोकांची फसवणूक केली. न्यायव्यवस्था धनदांडग्यांची बटीक झाली. मूकबधिर व्यवस्थेपर्यंत अन्यायग्रस्तांचा टाहो पोहोचत नाही. न्यायासाठी रस्त्यावर



गजानन वाघमारे

उतरलेल्यांचे क्षीण आवाज बंदुकीच्या धाकावर दाबले जात असतील तर ही कुठली लोकशाही ? सत्ताधीशांच्या जुलमी धोरणांची लक्तरे वेशीवर टांगण्याची जबाबदारी गिरीशची गज़ल निसंकोचपणे पार पाडते आहे.

बस दाखवून आम्हा तलवार, बंदुका
म्हणती खऱ्यास सोडा, खोट्यापुढे झुका
सगळीकडे अताशा बघ चालले असे
भोगावयास सत्ता चाटायचा थुका

सत्तेसाठी थुंकी चाटणाऱ्या दळभद्री लोकनेत्यांची देशात जणू साथ आली आहे. निष्ठा विकून सत्तासिंहासनासमोर लांगुलचालन करणाऱ्या राजकीय वर्तमानाचा पंचनामा करताना गिरीशची गज़ल कोणतीही भीडमुर्वत बाळगत नाही. बुद्धीप्रामाण्यवादाचा अंगिकार करून ढोंगांचे बुरूज उध्वस्त करत निघालेली गिरीशची गज़ल आजच्या पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. सत्याच्या बेगडी वेष्टणात दांभिक जगण्याची भूल देणाऱ्या व्यवस्थेचा पर्दाफाश करताना, चुकीला चूक म्हणण्याची हिंमत गिरीशची गज़ल दाखविते.

मोकळे होऊन जगता येत नाही
जर चुकीला चूक म्हणता येत नाही
आंधळेपण मान्य आहे फक्त त्यांना
डोळसांचे बोट धरता येत नाही

डोळ्यावर गतानुगतिकतेची झापडे लावून चालताना पराभवाशिवाय दुसरे काय हाती येणार ? चळवळीच्या नेतृत्वाचा पलिता हाती धरणारे आमचे नेतेही क्षुल्लक स्वार्थासाठी स्वतःहून आंधळेपण मान्य करतात याची गिरीशच्या गज़लेला प्रचंड चीड येते. प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा डोळस वारसा असताना, उजेडाचे बोट धरण्याऐवजी अंधाराच्या पखाली वाहणाऱ्या वेठबिगार नेतृत्वावर गिरीशची गज़ल हल्ला चढविते. आपल्यातच एकवाक्यता नाही, त्याचा फायदा विरोधकांना न झाला तरच नवल. शोषणवादी व्यवस्थेविरोधात आपला शब्द अंगार झाला पाहिजे. त्यासाठी मौन सोडावेच लागेल. अंधाराची उगमस्थाने जाळायला हाती मशाली धरून चळवळीसाठी सिद्ध होण्याची प्रेरणा गिरीश आपल्या परिवर्तनवादी गजलेतून देतो.

मौन राहू नका शोषणाच्या पुढे
पेटवा ह्या मशाली, करा चळवळी

यवतमाळ जिल्ह्याने मराठी गज़लप्रांताला अनेक हरहुन्नरी गज़लकार दिलेत. गिरीश संतोष खोब्रागडे हा नेर तालुक्यातील ब्राह्मणवाडा (पूर्व) येथे राहतो. नेर येथील नेहरू विद्यालयात तो मराठी साहित्यात एम.ए. करतोय. सुप्रसिद्ध साहित्यिक शांतरक्षित गावंडे यांचे मराठी विषयाचे अध्यापन कौशल्य गिरीशला खूप भावले. त्यांनीच गिरीशवर काव्यसंस्कार केलेत. सुरेश भटांची गज़ल वाचून गिरीश मराठी गज़लेच्या प्रेमात पडला. रोशन गजभिये यांच्या मार्गदर्शनात तो गज़लेची पायवाट चालतो आहे. प्रा.डॉ.सिद्धार्थ भगत, रमेश बुरबुरे,आनंद देवगडे, वृषाली मरतोडे हे गिरीशचे आवडते गज़लकार. अ.भा. मराठी साहित्य संमेलन, अ.भा.एल्गार गज़ल संमेलन आणि अनेक मुशायऱ्यांतून गिरीशने गज़ल सादर केल्या आहेत. मुशायरा हमखास खिशात घालणारा गज़लकार अशी त्याची ख्याती आहे. गिरीशच्या एका सुंदर गज़लेचा आपण आज आस्वाद घेऊ या.




**(दि.१ ते ७ जून २०२५)**

रात्रीच्या प्रारंभी पश्चिम आकाशात गुरु व जरा वर मंगळ ग्रह, पहाटे पूर्वेस शूक्र व शनी ग्रह बघता येतील.
दि.१. चंद्र-आश्लेषा नक्षत्रात मंगळ ग्रहा जवळ.
शूक्र ग्रह सूर्यापासून परम इनांतर स्थितीत.इंटरनॅशनल स्पेस स्टेशन(आय.एस.एस) दर्शन.. रात्री..८-२७ ते ८-३०. वायव्ये कडून दक्षिणेस.
दि.२.चंद्र मघा युती. आय.एस.एस.दर्शन.
रात्री ७-३८ ते ७-४४.दिशा..वायव्य ते आग्नेय.डोक्यावरुन जाईल
दि.३.चंद्र पूर्वा फाल्गुनीत,
दि.४.चंद्र उत्तरा फाल्गुनीत,
आय.एस.एस.दर्शन..रात्री७-३९ ते ७-४४.पश्चिम ते दक्षिण.गुरु ग्रहा जवळुन.
दि.५.चंद्र हस्त नक्षत्रात.
दि.६.बुध ग्रहाचा मिथुन व मंगळ ग्रह सिंह राशीत प्रवेश
दि.७.चंद्र स्वाती जवळ आणि पृथ्वी पासून दूर. अंतर ४,०५,६०० कि.मी.



कथा
प्रा. मोहन काळे
मो. ७०३८२७६५५८




उठल्यापासूनच अशोकरावांना काहीतरी वेगळंच जाणवत होतं. सहसा त्यांची रविवारची सकाळ प्रसन्न असायची. परंतु मे महिना असूनही व सकाळचे नऊ वाजले तरी सूर्यदर्शन झालं नव्हतं. त्यांनी अंगणात येऊन पाहिलं तर आकाशात काळ्याकुट्ट ढगांनी गर्दी केली होती. धो धो पाऊस पडणार असं चिन्ह दिसत होतं. का कोण जाणे त्यांना हे चिन्ह काही चांगलं दिसलं नाही. आजपर्यंत स्वच्छ निरभ्र आकाशाप्रमाणे आपलं जीवनही आनंदी आहे. ते काळे ढग आपल्या जीवनात अंधार घेऊन येतात काय? असा विचार त्यांच्या मनात आला अन् त्यांच्या अंगावर सर्रकन काटा उभा राहिला. एरवी वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगणाऱ्या अशोकरावांना ती काहीतरी वाईट घडण्याची चाहूल वाटत होती. त्यांना एका वर्षापूर्वीचा प्रसंग आठवला.

“हे गरमागरम पोहे व भजी खा. मग मी मस्तपैकी कडक कॉफी करते.” सुनंदाबाई म्हणाल्या. हा त्यांना आश्चर्याचा धक्काच होता.

“सकाळी सकाळी गरमागरम भजी? कडक कॉफी? तीही न मागता? काही पाहिजे आहे वाटते तुला?”

“काही नाही. तुम्ही खा अगोदर. कोमलविषयी तुमच्याशी थोडं बोलायचं आहे.” सुनंदाबाई गंभीरपणे म्हणाल्या.

अशोकराव सावध झाले. त्यांनी घाईघाईने भजी, पोहे संपवले. कॉफी घेतली व सुनंदाबाईंना म्हणाले,

“काय बोलायचं आहे कोमलबद्दल?”

सुनंदाबाई सोफ्यासमोरच्या खुर्चीवर बसल्या. त्यांनी हळू आवाजात म्हटलं, “कोमलचं एका मुलावर प्रेम आहे. त्या दोघांनी लग्न करायचं ठरवलं आहे.”

अशोकराव एकदम गंभीर झाले. ते चिडले नाहीत की रागावले नाहीत. आदर्श पालकाने अशावेळी कोणती भूमिका घ्यावी हे त्यांना चांगलेच माहीत होते. ते डोळे मिटून विचारमग्न झाले. तीन चार मिनिटांनंतर त्यांनी शांतपणे विचारलं, “कोण आहे तो मुलगा? आणि काय करतो?” “ व्यवसायी आहे. चांगले श्रीमंत आहेत. राजकारणात सुद्धा आहेत. मुलगा देखणा आहे.”

“तुला याची कल्पना होती काय?”

“हो. त्यांची मैत्री होती. आजकाल मुलामुलींचे मित्र असतातच.”

“तू त्याला पाहिलं आहेस का?”

“हो, एकदा घरी आला होता. तुम्ही घरी नसताना.”

“मला याआधी का सांगितले नाही?”

“सांगणार होती. पण सांगायचं राहून गेलं.”

“ठीक आहे. मला मुलाचे नाव व पत्ता सांग. मी चौकशी करतो. योग्य वाटलं तर मुलाच्या वडिलांशी बोलतो.”

अशोकरावांनी मुलाबद्दल व कुटुंबाबद्दल बरीच चौकशी केली.

“कोमल, सुनंदा, बसा. मी मुलाची चौकशी केली. मुलगा थोडा दादागिरी करणारा आहे. त्याचे वडील अहंकारी आहेत. त्यांना पैशाचा, पदाचा माज आहे. त्यांचे संबंधही तसेच आहेत. आपली व त्यांची बरोबरी होऊ शकत नाही. मुलगा जास्त श्रीमंत नसता तरी चालला असता. कोमल तिथे सुखी राहील असे मला वाटत नाही. कोमल, तू हा विचार मनातून काढून टाक. तू सुंदर आहेस, चांगली शिकलेली आहेस. तुला आम्ही चांगला नोकरीवाला मुलगा पाहतो.” “पप्पा, माझा निर्णय झालेला आहे. मी लग्न करीन तर फक्त विशालशीच.” “बरीच जादू केलेली दिसते त्याने तुझ्यावर.”

“बेटा, वडील म्हणून, पालक म्हणून मला तुझी काळजी आहे. तू आनंदात राहावी हीच आमची इच्छा आहे. मी तुझ्यापेक्षा जास्त उन्हाळे पावसाळे पाहिलेले आहेत. मला माणसं ओळखता येतात. ते घर तुझ्यायोग्य नाही असं माझं स्पष्ट मत झालेलं आहे. तुला तिथं सुख मिळणार नाही. ”

“विशाल चांगला आहे. मी त्याच्या आईवडिलांशी बोलली नाही. पण विशाल माझ्याबद्दल बोलला आहे. तो म्हणाला, की त्याचे आईवडील राजी नाहीत. त्यांना श्रीमंत सोयरा हवा आहे. पण विशाल त्यांना समजावून सांगणार आहे.”

“बेटा, लग्नाच्या आधीच त्यांना तू नको आहेस. मग लग्न झाल्यावर ते तुझ्याशी चांगलं वागतील का? कशावरून ते तुला त्रास देणार नाहीत? कमी श्रीमंत म्हणून सतत तुला टोमणे खावे लागतील. माणसानं जिथं आपला सन्मान होईल, जिथं आपलं आनंदानं स्वागत होईल, जिथं आपल्याला समजून घेतलं जाईल, जिथं आपल्या माहेरच्या मंडळींना सुद्धा आदर मिळेल अशा ठिकाणी संबंध जोडला पाहिजे. तराजूची दोन्ही तागडी सारख्या पातळीवर असावीत. एक वर, एक खाली असलं तर योग्य वजन होत नाही. तसंच नातेसंबंधाचं आहे. माणसानं फक्त रूपाला, बडेजावाला, श्रीमंतीला भुलून निर्णय घेऊ नये. आपलं भलं, आपलं सुख, आपला आनंद कशात आहे याचा सारासार विचार करावा. नंतर पश्चात्ताप करण्यापेक्षा आधीच विचारपूर्वक निर्णय घेतलेला बरा. मी तुझा बाप आहे. मुलीच्या भल्याचा विचार बापापेक्षा दुसरा व्यक्ती करू शकत नाही. तुझा आनंद माझ्यासाठी सर्वांत महत्त्वाचा आहे. त्यामुळे माझं अंतर्मन मला सांगते, हे स्थळ तुझ्यासाठी योग्य नाही.”

“पप्पा, वडील म्हणून तुमचं म्हणणं बरोबर असलं तरी मला विशालशीच लग्न करायचं आहे. तो तयार आहे ना लग्नाला. मग बाकीच्या शंका कशाला? तुम्ही त्याच्या वडिलांना भेटून लग्नाबद्दल बोलावं अशी माझी व आईची इच्छा आहे.” अशोकरावांनी चमकून सुनंदाबाईंकडे पाहिलं. त्यांनीही मान हलवत कोमलच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

अशोकरावांची बिलकुल इच्छा नव्हती परंतु मुलीच्या व पत्नीच्या आग्रहामुळे त्यांनी विशालच्या वडिलांची भेट घेतली. विशालच्या वडिलांनी आधीतर नाहीच म्हटले. परंतु अशोकरावांच्या बऱ्याच विणवणीनंतर ते मान्य झाले. परंतु त्यांनी बऱ्याच अटी टाकल्या. पन्नास तोळे सोनं, एक किलो चांदी, फॉर्च्युनर कार व खूप मोठ्या थाटामाटात लग्न. या अटी ऐकून अशोकरावांना घाम फुटला. त्यांची सांपत्तिक स्थिती एवढी चांगली नव्हती की या सर्व अटींची पूर्तता करू शकतील. पण मरता क्या न करता? मुलीच्या आनंदासाठी त्यांनी इकडून तिकडून रक्कम गोळा केली. कर्ज काढलं व मोठ्या थाटामाटात लग्न लावून दिलं. आजकालची मुलं मुली प्रेमप्रकरण करतात. आईवडिलांनी त्यांना चांगले संस्कार देण्याचा प्रयत्न केलेला असतो परंतु बाहेरचं वातावरण, त्यांची संगत, त्यांचं आकर्षण या सर्व गोष्टींत ते आईवडिलांना हिशोबातच धरत नाहीत. पालकांइतकी समज त्यांना नसली तरी ते स्वप्नांच्या जगातच राहू इच्छितात. वास्तवाची ओळख करून घेत नाहीत. अशोकरावांना असेही वाटले की पालक म्हणून मुलीकडे पुरेसे लक्ष द्यायला आपणच कमी पडलो. नाहीतर मुलीने प्रेमप्रकरणाच्या भानगडीत न पडता शिक्षण, करिअर यांच्याकडे जास्त लक्ष दिलं नसतं.

सुनंदाबाईंच्या आवाजाने अशोकराव तंद्रीतून बाहेर आले.

“अहो, ऐकता का? कोमलचा फोन आला होता. फोनवर खूप रडत होती ती. तिला सासू,सासरे, नणंद खूप त्रास देत आहेत. सासऱ्याने तर तिच्या अंगावर हात टाकला म्हणे ती. तिचा लग्नाचा निर्णय चुकला असं म्हणत होती ती. सासरकडची मंडळी चांगली नाहीत असंही म्हणत होती. आता तर सासरच्यांनी पन्नास लाख रुपयांची मागणी केलेली आहे. आपल्याला तेवढी व्यवस्था करावी लागते.”

“तू काय वेडी झाली आहेस का? मागच्याच महिन्यात एक लाख घेऊन गेली ना ती? पन्नास लाख म्हणजे पाच दहा हजार वाटले का तुला? लग्नाला एकही वर्ष पूर्ण झालं नाही अन् पन्नास लाखांची मागणी? मागणाऱ्याने तरी विचार करायला पाहिजे. लग्नासाठी काढलेले कर्जच तर दहा वर्षे फिटणार नाही. आणि नवीन पन्नास लाख कुठून आणू? कोमलनं सांगायला नाही पाहिजे का तिच्या सासरच्यांना? तिला आपली परिस्थिती माहीत नाही काय? ”

“अहो, तिनं रडून रडून सांगितलं की पप्पा एवढी मोठी रक्कम नाही देऊ शकत. पण तिची सासू आणि सासरा म्हणे की तू माहेरी जा अन् पैशाची व्यवस्था झाल्यावरच परत ये. नाहीतर येऊच नको.”

“माणसं आहेत की राक्षस? त्यांना थोडीतरी माणुसकी आहे की नाही? घरच्या लक्ष्मीला पैशासाठी त्रास देतात. विशालराव काही बोलले की नाही? ”

“विशालरावही त्यांचे आई, बाबा, बहिणीचंच ऐकतात. त्यांचं खरं रूप आता आता कळालं आहे. आधी वाटलं होतं की सासरा, सासूच लालची आहेत म्हणून. विशालराव त्यांच्या दहा पावलं पुढे आहेत. कोमलची नणंद आगीत तेल टाकायचं काम करते. कोमलच्या जीवनाचं वाटोळं झालं. श्रीमंत, देखणे, तालेवार म्हणून आपण लग्न लावून दिलं. आता पश्चात्ताप होत आहे. पण आता काय फायदा?”

“मी तुम्हां दोघींना आधीच सांगितलं होतं, की ते लोक चांगले नाहीत म्हणून. पण तुम्ही मायलेकी ऐकता कुणाचं? मुलीला पालक मूर्ख वाटतात. पत्नीलाही आपला नवरा अव्यवहारी वाटतो. भोगा आता आपल्या कर्माची फळं!” अशोकराव मटकन सोफ्यावर बसत म्हणाले. त्यांच्या आवाजातील वेदना स्पष्टपणे जाणवत होती. एका वर्षाआधी आपण थोडी कठोर भूमिका घेतली असती तर आज ही पश्चात्ताप करण्याची वेळ आली नसती. परंतु मुलीने काही बरेवाईट करून घेऊ नये म्हणून त्यांनी अनिच्छेने कोमलच्या प्रेमविवाहाला संमती दिली होती.

“आता काय करायचं ? कुठून आणणार तुम्ही एवढी मोठी रक्कम?” सुनंदाबाई काळजीच्या सुरात म्हणाल्या.

“मी त्यांना एकही रूपया देणार नाही. या एका वर्षातच त्यांनी या ना त्या कार्यक्रमासाठी आणि आपणही मोठेपणासाठी कर्तव्य म्हणून सात ते आठ लाख रूपये त्यांना दिलेले आहेत. त्यांची हाव वाढतच चाललेली आहे. ते लोभी आहेत आणि त्यांना पन्नास लाख दिले तरीही ते यापुढे काही मागणारच नाहीत हे सांगता येत नाही. कुत्र्याचे शेपूट कधीच सरळ होत नसते. त्यांचे विचार बदलतील व ते आपल्या कोमलशी चांगले वागतील असा विचार करणे शुद्ध मूर्खपणा आहे.”

“मग आता काय करायचं आपण? ते कोमलला जास्त त्रास देतील.”

“ते इतके राक्षसी व नीच आहेत की ते कोमलचा जीव घ्यायला सुद्धा मागेपुढे पाहणार नाहीत. त्यांना माणसाची किंमत नाही. त्यांना फक्त पैसा हवा. मी आजच कोमलच्या घरी जातो व तिला घेऊन येतो.”

“अहो, अशी एकदम टोकाची भूमिका घेऊ नका. तिचा संसार उध्वस्त होईल. मधला काही मार्ग निघते का पहा.”

“मी एक वडील व पालक आहे. मला माझ्या मुलीचा संसार उद्धवस्त व्हावा असे वाटेल का? आपण तिच्या संसारात कधी लुडबुड वा हस्तक्षेप केला नाही. परंतु तिच्यावर अन्याय होत असेल तर आपण चूप राहू शकत नाही. तिच्यासाठी आपण सर्व काही केलं. आताही करू. यापुढेही करू. तिला योग्य समज नसल्यामुळे तिने चूक केली. आपण समजदार असूनही लग्नाला होकार देऊन आपणही अप्रत्यक्षपणे चूकच केलेली आहे. मी जातो व तिला घेऊन येतो. ” “मी पण सोबत येते. ” “नको. मी एकटाच जातो.”

“तुम्ही तिच्या सासरकडच्या लोकांशी काय बोलणार आहात? वाद वगैरे नका घालू. सामोपचाराने तोडगा निघते का पहा.”

“आधी मी सामोपचारानेच काही तोडगा निघतो का ते पाहणार आहे. तसं झालं तर आनंदच आहे. परंतु तरीही त्यांनी ऐकले नाही तर मी त्यांना स्पष्ट सांगणार आहे, की माझ्या मुलीवरचा अन्याय मी खपवून घेऊ शकत नाही, सहन करू शकत नाही. मी तिला परत घेऊन येणार आहे. त्यांनी काही आडकाठी आणली किंवा धमकी वगैरे दिली तर मी सरळ पोलीसात तक्रार करणार आहे. आपण पालक म्हणून नमती घेतली किंवा घाबरलो तर त्यांना आणखी जोर येईल व ते आणखी क्रूरपणे वागतील. पालकांनी अशा वेळी कच खाऊ नये तर कडक भूमिका घ्यावी तरच ठीक आहे. संसार वाचवण्याच्या फंदात मुलगीच जर जीवंत नाही राहिली तर त्या समजदारीचा किंवा माणुसकीचा काही उपयोग नाही. मुलीच्या पाठीमागे आपण पालक म्हणून खंबीरपणे उभं राहणं आवश्यक आहे. ती एकटी नाही तर तिचे पालक तिच्यासोबत आहेत ही भावना तिच्या मनात निर्माण करणं आवश्यक आहे. नाहीतर सासरकडचे आपले नाहीत आणि माहेरकडचेही आपले नाहीत या वैफल्यग्रस्त विचारातून मुली आत्महत्या करतात. आपल्याला मुलीला त्या वाईट विचारांपासून वाचवायचे आहे. येतो मी.” सुनंदाबाईंच्या खांद्यावर हात ठेवून, त्यांना विश्वास देऊन अशोकराव घराबाहेर पडले.

**लोकरंग**

## काश्मीरचे 'चटपाल गाव'



असे म्हटले जाते की, जर पृथ्वीवर स्वर्ग असेल तर ते काश्मीरमध्ये आहे. जर तुम्ही पृथ्वीवरील या स्वर्गात सहलीचे नियोजन करत असाल तर या आश्चर्यकारक ठिकाणांना नक्की भेट द्या. श्रीनगर, पहलगाम, गुलमर्ग किंवा युसमर्गच्या सुंदर दृश्यांविषयी तुम्हाला माहिती असेल पण काश्मीरमधील चटपाल गावाच्या सौंदर्याचे वर्णन कोणीही केले नसेल. हे काश्मीरमधील सर्वात सुंदर ऑफबीट पर्यटन स्थळांपैकी एक आहे. हे जम्मू आणि काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यात आहे. शहरी जीवनातील धकाधकीच्या जीवनापासून दूर निसर्गाच्या कुशीत कुटुंब आणि मित्रांसोबत काही महत्वाचा वेळ घालवण्यासाठी हे सर्वोत्तम ठिकाण आहे. तसेच, चटपालच्या सभोवतालच्या जंगलात एक छोटा ट्रेक आहे, जो साहसी प्रेमींसाठी एक सुखद अनुभव असेल.काश्मीरमधील प्रत्येक हंगामाचे स्वतःचे आकर्षण असते. चटपालला भेट देण्यासाठी उन्हाळा हा सर्वोत्तम काळ आहे. हिवाळ्याच्या हंगामत तुमच्या सहलीत अडचणी येऊ शकतील. पण जर तुम्हाला हिमवर्षावाचा आनंद घ्यायचा असेल तर इथे येणे हा एक चांगला पर्याय असू शकतो. श्रीनगर विमानतळ हे पोहोचण्यासाठी सर्वात जवळचे विमानतळ आहे. येथून प्रवास करण्यासाठी तुम्ही टॅक्सी भाड्याने घेऊ शकता..जर तुम्ही इथे राहण्याचा विचार करत असाल, तर तुम्ही जम्मू -काश्मीरवर असलेला बंगला निवडू शकता. येथे तुम्हाला सर्व मूलभूत सुविधा मिळतील.

## भारताचा पहिला बायोपॉलिमर ब्रॅण्ड 'बळरामपूर बायोयुग' लाँच

**दखल**

महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भारताचा पहिला पॉली लॅक्टिक ॲसिड ब्रँड 'बलरामपूर बायोयुग' याचे औपचारिक शुभारंभ करण्यात आला. हा ब्रँड बलरामपूर साखर कारखाना लिमिटेड तयार करणार असून, हा देशाच्या शाश्वत नवप्रवर्तनाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. मुंबईमधील जियो वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित या कार्यक्रमाने संपूर्ण मूल्य साखळीतील विविध भागधारकांना एकत्र आणत, बायोपॉलिमर उत्पादन व शाश्वत औद्योगिक प्रक्रियेतल्या एक ऐतिहासिक प्रगतीचा उत्सव साजरा केला. दीपप्रज्वलन समारंभाला महाराष्ट्राचे मा. श्री. शरद पवार, खासदार; कु. अवंतिका सराओगी, कार्यकारी संचालक, बलरामपूर चीनी मिल्स लिमिटेड; श्री. विवेक सराओगी, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,




बलरामपूर चीनी मिल्स लिमिटेड; आदींचा मानाचा सहभाग लाभला.उत्तर प्रदेशातील कुंभीतच्या विद्यमान साखर कारखान्याजवळ या पॉली लॅक्टिक ॲसिड प्लांटचे धोरणात्मक स्थान असून, हा प्लांट संसाधनांच्या कार्यक्षम वापरासाठी आणि पुरवठा साखळी व्यवस्थापनासाठी ऑपरेशनल समन्वय साधतो. २,८५० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीने हा प्लांट जागतिक तंत्रज्ञान प्रदात्यांकडून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून भारतातील पहिला औद्योगिक स्तरावरील बायोपॉलिमर प्लांट होईल तसेच जागतिक स्तरावर नवीन मानदंड स्थापित करील.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -susheelkuma80@yahoo.com

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 58



### हे कोडे कसे सोडवाल

मित्रांनो

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः–**

**दोन अक्षरी**
- अर्क
- अग्नि
- अक्ष
- कसा
- कळ
- काथ
- गडी
- गुप्त
- चाप
- जप
- जीग
- ढग
- तरु
- ताट
- दंश
- धोका
- नट
- नवा
- पद
- पल
- भार्या
- मन
- रम
- राव
- लक
- वाल

**तीन अक्षरी**
- शाल
- अलिप्त
- आगरा
- आजोळ
- आरुढ
- आश्रित
- कनक
- कर्कश
- कातडी
- गमन
- गोदान
- जनक
- दमन
- धोतर
- पगडी
- पगार
- पाडवा
- बालिश
- भावार्थ
- मलम
- मलिदा
- महान
- रजक
- रवंथ
- लटक
- वंचित
- वजीर
- वरण
- वऱ्हाड
- वादंग
- वानर
- विनाश
- वंचित
- शासक
- सभ्यता
- हासरा

**चार अक्षरी**
- अमर्याद
- अवसान
- अनामिका
- अनुवाद
- आकलन
- कलाटणी
- कसरत
- काकलक
- डमडम
- नरवर
- शालजोडी
- श्रीगणेशा
- सरगम

**पाच अक्षरी**
- अग्निशामक
- अलभ्य लाभ
- आडपडदा
- बागुलबुवा
- बुजगावणे
- विचारवंत

**सहा अक्षरी**
- साम दाम दंड

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 438



**—: आडवे संकेत :—**

1) हाताची नाडी बघून रोग ओळखणे
4) महानगर पालिकेच्या नगर सेवकांद्वारा निर्वाचित अध्यक्ष
6) विश्वासाचा घात करणे
9) भांडण सोडविण्यासाठी उभय पक्षांनी मान्य केलेले लोक
11) धैर्य देणारे भाषण
12) अनेक लोकांनी मिळून केलेला कट
13) महाभारतातील राधेय, एक कुंतीपुत्र
14) देव
16) चाकरी, शुश्रुषा
18) लायकी, योग्यता
20) जोराचा आवाज
21) घटना प्रत्यक्ष बघितल्याची ग्वाही देणारा
23) एक चर्मवाद्य
25) उत्कंठा, मस्ती
26) पोलिसांनी एखाद्याला नजरेखाली ठेवणे
28) पू 29) भूतकाळात दडलेले
30) लाकूड, सरपण
31) दुसऱ्याच्या इशाऱ्यावर नाचणारा इसम
34) मनुष्य
35) भुजा, दंड
36) एक श्वासरोग
37) लग्नात वरातीपूर्वी सासूने आरशात सुनेचा चेहरा बघण्याचा एक विधी
39) उजळणी, आवृत्ती
41) आश्रय, प्रमाण
42) नम्र, वाकलेला
44) रोजचा अभ्यास, सवय
45) सार्वजनिक सुटीचा दिवस
47) ताबडतोब
48) खाण्याची इच्छा, क्षुधा
49) आवेदन 50) धैर्य, अवसान
52) नांगर
54) मानवाच्या तीनपैकी दोन मुलभूत गरजा
55) एखाद्या गोष्टीची प्रसिद्धी
57) वारा भरण्याची कातड्याची पिशवी, बाणांची पिशवी
60) माफी
63) तिरकस, आडवा
64) लग्न लावतेसमयी म्हणण्यात येणारी आठ मंगल पदे
67) तारका, चांदणी
68) कृष्णसखी
69) व्रात्य, मोकळा सुटलेला
71) एकीकडचा उणेपणा दुसरीकडे भरून काढणे
72) शय्यागार, निद्रागृह, घराच्या आजूबाजूला राहणारे लोक
73) पृष्ठभागावरून हळूहळू घसरत चालणे
74) लोणी

**—: उभी विधाने :—**

1) येशू ख्रिस्ताचा जन्मदिनोत्सव
2) एकाच विषयाच्या अनेक मुद्यांवर अनेकांनी विचार मांडणे
3) धुणे
4) सहाय्य
5) सकस, शरीराराला पोषक असे खाद्य
6) पौराणिक कालीन सप्तर्षीपैकी एक ब्रह्मर्षी
7) श्वसन
8) मंगलप्रसंगी वाजविण्यात येणारे एक वाद्य
10) दुपारच्या भोजनानंतर घेतलेली अल्पनिद्रा
15) सासू (सं.)
16) सैन्यावरचा मुख्य अधिकारी
17) सायंकाळचा मुहूर्त
18) पायी चालणारी फौज
19) रोगण लावलेले जाड कापड
21) कर्जाऊ रकमा देणारा
22) मुक्त हस्ताने दिलेली देणगी
24) ग्लुकोज बिस्कीटांचे उत्पादन करणारी एक प्रसिद्ध उत्पादक कंपनी
27) रामायणात ... हिच्या हट्टाने श्रीरामचंद्रास वनवास भोगावा लागला
28) आदर, मानपान
29) जातीची स्वतंत्र वर्गवारी केलेले
32) नाटकाची माहिती करून देणारे मुख्य पात्र
33) काढून टाकलेला
34) चित्ताकर्षणासाठी केलेला खोटा हावभाव
35) अतिशय शुद्ध व उत्तम सोने
38) अतिशय जोराचा पाऊस
40) श्रीविष्णूच्या दहा अवतारांपैकी चौथा अवतार
41) राजकपूर, नर्गिसचा एक अत्यंत सफल जुना हिंदी चित्रपट
43) बारा वर्षांचा कालावधी
46) विनवणी, याचना
49) धर्मार्थ जेवण मिळण्याची जागा
51) सभाकीर्तनासाठी देवळापुढे बांधलेले सभागृह
53) शंभर हजार ही संख्या एका शब्दात
55) पंधरवड्यातील पहिली तिथी
56) एक संख्या
58) अंबाडीसारख्या झाडाचा वाख
59) काहीही लपवून न ठेवता, उघडपणे
61) आदरसत्कार
62) महाभारतातील गांधारीचे माहेर असलेला देश
65) शरमणे 66) चिलखत
68) नृप, नृपति 70) नारी, स्त्री
72) धान्य वगैरेचे पीक काढण्यासाठी तयार केलेली जमीन (उत्तर पुढील अंकी) ●

**मागील महाशब्दकोड्याचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** आज का दिन तुमच्यासाठी बहुत अच्छे हैं। बौद्धिक कार्य या लेखन साहित्य प्रकारांसाठी आज अनुकूल दिवस आहे.

**वृषभः** आजचा दिवस तुमच्यासाठी प्रतिकूलता। आपण आज निषेधात्मक कार्य आणि नकारात्मक विचार दूर रहना होगा.

**मिथून :** चित्रपट, नाटक या बाहेर भोजन करणार कार्यक्रम तुम्हाला आनंदित करेल. कलाकार आणि कारीगरांना आपल्या कला प्रदर्शित करण्यासाठी संधी.

**कर्क :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला आहे. सत्कार्य करणे फलस्वरूप शारीरिक आणि मानसिक रूप से स्फूर्ति का अनुभव करेल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे.

**सिंह :** विद्यार्थ्यांच्या वाचन-लेखनात अभिरुचि वाढणे त्यांच्यासाठी आज चांगला दिवस आहे. परिश्रम की अपेक्षा कम प्राप्त होणार आहे.

**कन्या :** आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतात. मज़ेदार बातम्यांसाठी येथे क्लिक करा कौटुंबिक गुणांची चर्चा या वाद-विवादापासून दूर रहा

**तुळ :** आज तुमच्यासाठी चांगला दिवस आहे. आज तुम्हाला आनंदी वाटेल. आज तुम्ही नवीन काम सुरू करू शकता.

**वृश्चिक :** आज तुमच्यासाठी खूप शुभ दिवस आहे. आज आर्थिक लाभाचे संकेत आहेत. तुम्ही कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवू शकाल.

**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. तुमच्या वक्तृत्वाने तुम्ही गोड संबंध निर्माण करू शकाल. जे भविष्यात तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्रित असेल. काही कामांमध्ये तुम्हाला यश मिळेल, परंतु ते काळजीपूर्वक सुरू करावे लागतील. आज तुमचे आरोग्य बिघडू शकते.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी शुभ आहे. नफा होण्याची शक्यता आहे. तुम्ही मित्रांना भेटाल आणि त्यांच्यासोबत फिरण्यात आणि मजा करण्यात पैसे खर्च कराल.

**मीन :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला असेल. आज तुमची कीर्ती, प्रतिष्ठा आणि प्रतिष्ठा वाढेल. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### क्रिकेट शिबिराचा समारोप



**अकोला :** अकोला जिमखाना क्रिकेट क्लब येथे आयोजित उन्हाळी क्रिकेट शिबिराचा ३० मे रोजी समारोप झाला . १५ मे ते ३० मे पर्यंत आयोजित या शिबिरात १४ वर्षाखालील , १६ वर्षाखालील व १९ वर्षाखालील खेळाडूंना क्रिकेट खेळाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात आले . निखिलेश दिवेकर यांच्या अध्यक्षतेमध्ये चालणाऱ्या अकोला जिमखाना क्रिकेट क्लब च्या राष्ट्रीय शाळेजवळील मैदानात हे शिबिर पार पडले . व्यवस्थापकीय प्रमुख गब्बर शर्मा यांचे सहकार्याने बीसीसीआय लेव्हल १ व विदर्भ क्रिकेट एसोसिएशन चे लेवल - ओ , प्रशिक्षक मंगेश कुळकर्णी माजी रणजी पटू ( विजय हजारे ट्रॉफी ) सहाय्यक प्रशिक्षक अक्षय शर्मा यांनी खेळाडूंना शास्त्रशुद्ध पद्धतीने क्रिकेट खेळाचे दर्जेदार प्रशिक्षण दिले. खेळाडूंनी व पालकांनी याविषयी समाधान व्यक्त केले.

### राष्ट्रसंतांचे विचार अंगीकारल्यास राष्ट्रविकासासाठी कार्य करणारी पिढी घडेल – पालकमंत्री



**अकोला :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजविल्यास राष्ट्रविकासासाठी कार्य करणारी नवी पिढी निर्माण होईल, असा विश्वास राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी व्यक्त केला. पातसूल रेल्वे येथील श्री गुरुदेव सेवाश्रम येथे सर्वांगीण सुसंस्कार वर्गाचा समारोप आज पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते. सेवाश्रमाचे संचालक शुकदास गाडेकर, राजेंद्र वैद्य, शिवम सेवाने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांची पताका खांद्यावर घेऊन सेवाश्रम कार्य करीत आहे. राष्ट्रसंतांचे विचार हे विद्यार्थ्यांना देशकार्यासाठी प्रेरणा देतात. अशा विचारांनी ही पिढी घडली तर देशाचा आणि समाजाचा विकास होईल. त्यादृष्टीने सेवाश्रम विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य करत आहे. विद्यार्थ्यांनीही सुसंस्कार वर्गातून मिळालेल्या शिकवणीचा मित्रांमध्ये, आप्तस्वकीयांमध्ये प्रसार करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी पालकमंत्र्यांनी पू. संत महादेवराव गाडेकर साधुबुवा, तसेच संत डॉ. उद्धवराव गाडेकर यांच्या स्मृतिस्थळाचे दर्शन घेतले. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाचा समारोप झाला. कार्यक्रमाला अनेक मान्यवर, गुरूदेवभक्त उपस्थित होते.

### मुख्याध्यापक आर.एस. राठोड यांचा सेवानिवृत्ती निमित्ताने कार्यगौरव



**तेल्हारा:** श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथील मुख्याध्यापक आर एस राठोड वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत या निमित्ताने त्यांचा शैक्षणिक कार्यासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांचा कार्यगौरव करण्यात आला होता.

या वेळी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे कार्यकारिणी सदस्य सुरेश खोटरे यांच्या हस्ते मुख्याध्यापक आर एस राठोड व सौ गिताताई राठोड यांना शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले आहे तसेच सुधीर बापू देशमुख शाळा समिती सदस्य यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार केला आहे उपस्थित सर्व आजिव सदस्य दादासाहेब पाटील, बाळासाहेब पाटील, रमेश कोकाटे,साहेबराव सोनमाळे, ॲड विश्वासराव नेरकर, माधवराव खोटरे, नारायणराव देवतळे तसेच, गजानन पाटील,प्रा उदय देशमुख , सुभाष ढोले माजी प्राचार्य, यु पी विखे शाळा तपासणी अधिकारी, सुहासराव कराळे, डॉ गोपाल ढोले प्राचार्य, जितेन्द्र देशमुख माजी प्राचार्य,प्रा राजेश देशमुख, अनिल तायडे, निलेश तायडे सौ प्रेणताई कराळे शिक्षक प्रतिनिधी मुख्याध्यापिका सौ विद्या देशमुख , गजानन गावंडे शिक्षकेतर कर्मचारी वर्ग प्रतिनिधी,शांतीकुमार सावरकर जेष्ठ शिक्षक सुनिल वंजारी , बी जी पवार, तुषार जाधव,भारत भोयर, अंकेश भांबुरकर धनंजय भंगाळे तेजराव कडू विजय दहे सौ कविता सोनमाळे,कु जामोद मॅडम,कु प्रिती नेमाडे,कु अंकिता देशमुख, श्रीमती भटकर ताई सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी वर्ग श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा व श्रीमती पार्वतीदेवी तापडिया कॉन्हेंट तेल्हारा शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते कार्यक्रमचे सुत्रसंचालन सुनिल वंजारी यांनी केले तर आभार प्रदर्शन अंकेश भांबुरकर यांनी केले आहे

# जि.प.मध्ये सुरू असलेल्या मनमानी कारभाराची वंचित बहुजन युवा आघाडीकडून झाडाझडती

## बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना धरले धारेवर

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. ३१:** जिल्हा परिषद मध्ये सुरू असलेल्या प्रशासक राजवटीत मनमानी कारभार सुरू असून विकास कामे, पाणी पुरवठा आणि जनतेच्या कामासाठी वंचित बहुजन युवा आघाडी कडून झाडाझडती जिल्हा परिषद अधिकाऱ्यांची शनिवारी (ता. ३१) झाडाझडती घेण्यात आली.अकोला जिल्हा परिषद मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत विविध गावात मोठ्या प्रमाणावर खोदकाम करून गावातील रस्ते आणि पाणी पुरवठा योजनेची दुर्दशा करण्यात आली आहे. मात्र वर्षभर उलटून देखील त्याची दुरुस्ती नाही आणि गावात पाणी देखील मिळत नाही. अनेक गावे तहानलेली आहेत. त्याची झाडा झडती आज अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ह्यांचे कार्यालयात जाऊन वंचित बहुजन युवा आघाडीचे वतीने घेण्यात आला. जिल्हा परिषद टेंडर प्रक्रिया आणि काम वाटप करण्यात सुरू असलेला सावळा गोंधळ तसेच विशिष्ट ठेकदारांची मक्तेदारी यावर कार्यकारी अभियंता तसेच इतर अधिकाऱ्यांना धारेवर धरण्यात आले. मॅनेज पद्धतीने सुरू असलेली साखळी बंद करा अन्यथा वठणीवर आणण्याचा इशारा देण्यात आला. जनतेच्या कामासाठी अधिकारी कर्मचारी ह्यांनी दक्ष राहून काम करावे कुठल्याही जनप्रतिनिधी अथवा पक्षाचे दबावात काम करू नये ही समज देण्यात आली. यावेळी वंचितचे प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे, युवा जिल्हाध्यक्ष श्रीकांत घोगरे, महासचिव राजकुमार दामोदर, नितीन वानखडे, महानगर अध्यक्ष वैभव खडसे, सचिन शिराळे, मिलींद दामोदर ,सुगत डोंगरे, नागेश उमाळे,जय तायडे,सुरज दामोदर,आशिष सोनोने, राजेश बोदडे, आकाश जंजाळ,विकास सदाशिव,साहिल बोदडे,आनंद खंडारे, अनंता इंगळे,निखी डोंगरे,अमरदिप तायडे,युवा आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

# कंटेनर अनियंत्रित होत थेट घरावर आदळला!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर : दि. ३१:** अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापूर शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत ३० मे रोजी मध्यरात्री दीडच्या सुमारास एक थरारक आणि जीवघेणी घटना घडली. ११० ते १२० किलोमीटर प्रतितास वेगाने धावणारा एमएच १४ एचयू ९५९८ क्रमांकाचा कंटेनर भीमनगर परिसरात अनियंत्रित होत थेट घरांवर आदळला आणि पलटी झाला. या जोरदार धडकेत दोन-तीन घरांचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने जीवितहानी टळली, मात्र नागरिक भयभीत झाले.झोपेत असलेल्या लहानग्या लेकरांना, महिलांना व वृद्धांना या जोरदार आवाजाने जाग आली. धडकेनंतर वीजपुरवठा खंडित झाला आणि संपूर्ण परिसरात एकच गोंधळ उडाला. "देवा, थोडक्यात बचावलो... रात्रच उलटली असती!" अशी प्रतिक्रिया अनेकांनी दिली. गोरक्षकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अमरावतीहून कामरगाव मार्गे जात असलेल्या चार संशयित कंटेनर्सचा पाठलाग सुरू होता. त्यातील एका कंटेनरमध्ये मृत म्हैस व गाय आढळून आल्या. तो कंटेनर कारंजा ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. उर्वरित दोन कंटेनर पसार झाले, तर चौथा कंटेनर एमएच १४ एचयू ९५९८ भरधाव वेगाने मुर्तीजापूरच्या दिशेने पळत होता. शिवाजीनगर रस्त्यावरून भीमनगरच्या वळणावर आल्यावर चालकाने चालू वाहनातून उडी मारून पळ काढला. त्यानंतर कंटेनर थेट घरांवर आदळून पलटी झाला. भिंती कोसळल्या, पोल मोडले, घरातील वस्तूंचा चक्काचूर झाला. घरातील लोक अक्षरशः थरथर कापत घराबाहेर पडले.सदर कंटेनरमध्ये हार्डवेअर व वेल्डिंग साहित्य आढळून आले आहे. वाहन चालक फरार असून, शहर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला आहे. घटनेमागे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

# अकोल्यात गांजाचा साठा जप्त; तरुण अटकेत



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१:** अकोल्याच्या जुन्या शहरातील हरिहर पेठ परिसरात गांजाच्या विक्रीसाठी आलेल्या तरुणाला पोलिसांनी रंगेहात पकडले. सनी उर्फ सुनील त्र्यंबक गवई असे आरोपीचे नाव असून त्याच्याकडून २ किलो ५ ग्रॅम गांजा सापडला, ज्याची अंदाजे किंमत ४२,००० रुपये आहे. ही कारवाई जुने शहर पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक नितीन लेवरकर, यांच्या नेतृत्वात पोउनि रवींद्र करणकार, पंकज उपाध्याय, शेख असलम, छोटू पवार, सागर शिरसाट, पवन डांबलकर योगेश करणकार यांनी केली.

# मूर्तिजापुरात १६ लाखांचे प्रतिबंधित कापसाचे बियाणे पकडले!

## पोलीस आणि कृषी विभागाची कारवाई

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** मूर्तिजापूर तालुक्यातील सोनोरी ते मूर्तिजापूर सर्व्हिस रोडवर शुक्रवारी (ता.३०) मे रोजी रात्री १६ लाख रुपयाचे ९ क्विंटल प्रतिबंधित कपाशी बियाणे पोलिसांनी पकडले. पोलिसांनी ही माहिती कृषी विभागाला दिल्यानंतर कृषी अधिकाऱ्यांनी याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. सोनोरी ते मूर्तिजापूर सर्व्हिस रोडवर शुक्रवारी (ता.३०) मे रोजी रात्री काळ्या रंगाच्या व्हॅगनारमधून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी ही बियाणे वाहनात भरायला सांगितले. मात्र, पोलिसांनी तपासणी सुरू करताच ती व्हॅगनार घटनास्थळावरून फरार झाली. कृषी अधिकाऱ्यांनी एमएच-२०-एटी-८०४८ क्रमांकाच्या एका ट्रॅव्हल्स मधून हे बियाणे आणण्यात आल्याचा संशय व्यक्त केला. राष्ट्रीय महामार्गावर एका हॉटेलजवळ ट्रॅव्हल्समधून हे बियाणे खाली उतरविण्यात आले. यानंतर ट्रॅव्हल्सचा पाठलाग करण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यांचा ... कारने संबंधित चालकाला कॉल केला. चालक खाली उतरविलेले बियाणे घेण्यासाठी घटनास्थळी आला. ट्रॅव्हल्समधून उतरविलेले बियाणे मालवाहू वाहनात भरताना त्या ठिकाणी पेट्रोलिंगला असलेल्या पोलिसांना संशय आल्यानंतर त्यांनी कट्ट्यांची तपासणी केली असता, त्यामध्ये हे बियाणे आढळून आले. यानंतर संबंधित चालकाला बियाण्यांसह पोलिस ठाण्यात आणण्यात आले. दरम्यान, या सर्व घडामोडींत वाहनावर पाळत ठेवत असलेला तो अज्ञात मनुष्य पसार झाला. दरम्यान, अंदाजे ९ क्विंटल हे बियाणे जप्त करण्यात आले असून, त्याची किंमत १६ लाख रुपये आहे. हे प्रतिबंधित बियाणे कोणत्या कृषी सेवा केंद्राची आहे, याबाबत अद्याप अधिकृत माहिती मिळाली नसुन पोलिस तपास सुरू आहे.

### बियाणे तपासणीसाठी पाठविले – डॉ. जाधव

प्रतिबंधित कापसाचे ८ क्विंटल बियाणे जप्त करण्यात आले आहे. सदर बियाणे तपासणीसाठी नागपूर येथे पाठविण्यात येत आहे. याप्रकरणी संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी दिली.

### भरारी पथकांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

अकोला शहरासह ग्रामीण भागातील काही कृषी सेवा केंद्राकडून छुप्या पद्धतीने शेतकऱ्यांना प्रतिबंधीत बियाण्यांची विक्री करण्यात येत आहे. जिल्हात प्रतिबंधीत बियाण्यांची मोठ्या प्रमाणात विक्री करणारे रॅकेट कार्यरत असून कृषी विभागाच्या भरारी पथकांचे याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याची जोरदार चर्चा रंगली आहे.

# गतिमंद मुलीच्या मृत्यूप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल

## काजळेश्वर येथील घटना



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

घटनेच्या एक दिवस आधी म्हणजे २९ तारखेला रात्री ८ वाजता सदर मुलगी धनज रस्त्यावर पायी जात असताना पत्रकार बंडू इंगोले यांनी तिला विचारपूस केल्यावर मुलगी मतीमंद असल्यामुळे ती व्यवस्थित बोलत नव्हती त्यामुळे बंडू इंगोले यांनी पोलिसांना संपर्क साधून मुलीला कारंजा पोलिस स्टेशन येथे त्यांचा नातेवाइकाच्या स्वाधीन केले होते.

### मृतदेह ताब्यात घेण्यास नकार

उपजिल्हा रुग्णाल्यात शवविच्छेदन केल्या नंतर मृतक मुलीच्या परिवारानी आरोपीला अटक केल्या शिवाय मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला म्हणून काही वेळ तनाव निर्माण झाला होता

**कारंजा : दि. ३१:** तालुक्यातील खेर्डा बु.ते काजळेश्वर उपाध्ये यादरम्यानच्या पुलाखाली ३० मे रोजी एका मुलीचा मृतदेह निर्वस्त्र अवस्थेत आढळून आला होता. याप्रकरणी कारंजा ग्रामीण पोलिसांनी ३० मे च्या मध्यरात्रीनंतर अज्ञात मारेकऱ्याविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. कारंजा ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शारदा शंकर धुर्वे वय ३५, रा. काजळेश्वर, ता. कारंजा यांनी फिर्यादीत नमूद केले की, त्यांना माया अनेस कोडापे नावाची अंदाजे १८ वर्षीय अविवाहित बहीण असून ती जन्मापासून मतिमंद होती. ती ३० मे रोजी सकाळी १० वाजता घेऊन भिक्षा मागण्यासाठी खेर्डा बु. येथे पायदळ निघाली होती. आणी मि देखील मूर्तिजापूर येथे जडीबुटी विकण्यासाठी गेली होती. मी दुपारी ५ वाजता परत घरी आली असता गावातील चर्चेतून माझी बहीण माया कोडापे हिचा मृतदेह काजळेश्वर ते खेर्डा रस्त्यावरील पुलाच्या खाली पडलेला असल्याचे समजले. त्यावरून मी तेथे गेली असता माझी बहीण माया ही मृत अवस्थेत निर्वस्त्र दिसून आली. तिची ओळख पटू नये म्हणून तिचे डोके दगडाने ठेचण्यात आले होते. डोके आणि चेहऱ्यावर वार करून तिची हत्या करण्यात आली. अशा आशयाच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध कलम १०३(१), २३८ (बी) बीएनएस नुसार गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक प्रवीण खंडारे करीत असुन पोलिसांकडून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे.

# प्रहार मोहिमेंतर्गत वरली मटक्यावर कारवाई

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट, दि. ३१:** आज दि ३१/०५/२०२५ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक अकोला यांचे प्रहार मोहीमे अंतर्गत अकोट शहर पोलीसांची वरली मटक्यावर कार्यवाही केली आहे.

अकोट शहर पो. स्टे च्या हद्दीतील पोष्ट ऑफिस समोर आठवडी बाजार येथे काही इसम वरली मटक्याचे आकड्यावर पैशाचे हारजीतवर जुगार खेळत असल्याच्या माहितीच्या आधारे आठवडी बाजार परीसरात जावुन जुगार खेळत असलेल्या इसमावर जुगार कारवाई करून आरोपी संजय विश्वनाथ घावट वय ६१ वर्षे रा.नरहरीनगर अकोट,सुनिल रामनारायण मंत्री वय ४२ वर्षे रा.गांधी मैदान अकोट,) गजानन गणपत नेवारे वय ५३ वर्षे रा.सुकळी ता.अकोट, राहुल बबनराव नवलकार वय ४२ वर्षे रा.साईनगर दर्यापूर जि अमरावती, तेजराव कासिराम नेवारे हिराळे वय ५० वर्षे रा. आदर्शनगर अकोट,हफीजउद्दीन कदीरोद्दीन वय ७० वर्षे रा. टेकडीपुरा अकोट,विजय फत्तेलाल मुतडा वय ५३ वर्षे रा.जिजामाता नगर अकोट,नंदू भाउजी डोंगरे वय ५४ वर्षे रा.खाणापुर वेस अकोट,किशोर रणविर डोंगरे वय ४० वर्षे रा.फ ले आंबेडकर नगर अकोट यांचे जवळुन ९ वरली मटक्यावर आकडे लिहलेल्या कागदी चिठ्ठया,कार्बन तुकडा,तिन बॉल पेन,एक लावा कंपनीचा कि पॅड असलेला काळया रंगाचा मोबाईल कि अं १५००/-रू व नगदी ३६००/- रू असा एकुन ५१००/- रू.चा मुद्देमाल दोन पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे.ही कार्यवाही उपविभागिय पोलिस अधिकारी मनोहर दाभाडे यांचे मार्गदर्शनात पो. नि. किशोर जुनघरे, नंदकिशोर कुलट, गणेश सोळंके, प्रदिप राउत, विपुल सोळंके, कपिल राठोड,पोका नितेश सोळंके, गणेश कवडे, शिवा गावंडे यांनी केली.

# अग्रसेन चौकातील 'त्या' अपघात स्थळाची आ. पठाण यांनी केली पाहणी

## नाल्यातील कचरा आणि गतिरोधक अपघाताला जबाबदार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. ३१:** अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातील अग्रसेन चौकात झालेल्या दुर्दैवी अपघातात रोहित संदलकर यांचा मृत्यू झाला. रस्त्यावर जमा झालेल्या पाण्यात लपलेल्या गड्ढ्यात पडून त्यांचा मृत्यू झाला होता. गुरुवारी अकोला पश्चिमचे आमदार साजिद पठाण यांनी स्वतः घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यांनी तेथे उपस्थित असलेल्या वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांशी संवाद साधून संपूर्ण घटनेची माहिती घेतली आणि वेळेवर मदत पोहोचवल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

निरीक्षणादरम्यान असे निदर्शनास आले की, ज्या ठिकाणी अपघात झाला त्या ठिकाणचा नाला पूर्णपणे कचऱ्याने भरलेला होता. त्यामुळे पाण्याचा निचरा होऊ शकला नाही आणि रस्त्यावर मोठ्या प्रमाणात जलतरण झाले होते. यामुळेच स्पीड ब्रेकर आणि गड्ढा पाण्याखाली गेला व हा अपघात घडला. आमदार पठाण यांनी या दुर्दैवी घटनेसाठी महापालिकेच्या हलगर्जीपणाला जबाबदार धरले. वेळेवर नाल्याची सफाई व रस्त्यांची दुरुस्ती झाली असती तर हा अपघात टळू शकला असता, असे ते म्हणाले. त्यांनी महापालिका अधिकाऱ्यांच्या कार्यशैलीवर थेट सवाल उपस्थित केले आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. याआधी आमदार पठाण यांनी रोहित संदलकर यांच्या माळीपुरा चौक येथील राहत्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली आणि सांत्वन व्यक्त केले. त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे मृतकाच्या कुटुंबाला तात्काळ आर्थिक मदत देण्याची विनंतीही केली. या प्रकरणात निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई केली जाईल आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे आमदार पठाण यांनी सांगितले.

# शासकीय कार्यालयात गुंडगिरीचा थरार!

## परिवहन कार्यालयातील कर्मचाऱ्याला मारहाण

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१:** गुरुवारी प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकोला येथे चक्क कार्यालयीन वेळेत एका खाजगी व्यक्तीकडून सरकारी कर्मचाऱ्याला मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण कार्यालयात एकच खळबळ उडाली असून, संबंधित इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरत आहे. या संदर्भात खदान पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. करणारी पदाधिकारी या घटनेमुळे कार्यालयातील अधिकारी कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये दहशत पसरली होती. रामकृष्ण मोतीराम खंडारे (४९), कनिष्ठ लिपिक प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकोला यांनी दिलेल्या जबानी तक्रारीनुसार, आरोपी शेख रेहान शेख गफ्फार, रा. गंगानगर, अकोला हा एका अर्जासह कार्यालयात आला होता. अर्ज आणि त्याने सांगितलेले नाव विसंगत असल्याने खंडारे यांनी वरिष्ठांची स्वाक्षरी घेण्यास सांगितले. मात्र, यामुळे चिडून गेलेल्या आरोपीने खंडारे यांना अश्लील शिवीगाळ करत कॉलर पकडून जबर मारहाण केली. त्यानंतर बेल्टनेही हल्ला करत सरकारी अभिलेखांचे नुकसान केले. इतकेच नव्हे तर, कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांसमोरही अश्लील भाषेत शिवीगाळ करत उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. अचानक झालेल्या या हल्ल्याने कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, अनेक कर्मचारी साक्षीदार या घटनेचे साक्षीदार आहेत.

# करुण नायरचे इंग्लंडमध्ये द्विशतक!

**नवी दिल्ली, दि. ३१ प्रतिनिधी**

क्रिकेटकडे एक संधी मागणाऱ्या करूण नायरने इंग्लंडच्या भूमीवर द्विशतक झळकावलं आहे. भारताच्या सिनियर संघाच्या इंग्लंड दौऱ्यापूर्वी भारताचा अं संघ इंग्लंडमध्ये पोहोचला आहे. ज्याचे नेतृत्त्व अभिमन्यू ईश्वरन करत आहे. भारत अ संघ ४ दिवसीय दोन सामने खेळणार आहे. यातील पहिला सामना ३० जूनपासून सुरू झाला आहे. सुरूवातीचे २ विकेट्स गमावल्यानंतर भारताच्या अं संघाने कमालीचं प्रत्युत्तर देत फलंदाजी केली आहे.

करूण नायर इंग्लंड लायन्सविरूद्ध पहिल्याच सामन्यात पहिल्या दिवशी आपलं शानदार शतक पूर्ण केलं आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशी दणदणीत चौकारासह द्विशतक झकळकावलं. करूण नायरने २७२ चेंडूत तब्बल २६ चौकार आणि एका षटकारासह २०३ धावांचा टप्पा गाठला. करूण नायरने आपली तंत्रशुद्ध फलंदाजी आणि एका टोकाला घट्ट पाय रोवून उभा राहत भारताच्या धावांमध्ये मोठी भर घातली. करूणच्या शतकासह भारताने आतापर्यंत १०१ षटकांत ५ बाद ४५४ धावा केल्या आहेत. भारताच्या सिनियर संघाच्या इंग्लंड दौऱ्यापूर्वी करूण नायरचं शतक हे टीम इंडियासाठी चांगली गोष्ट असेल. रोहित-विराटच्या निवृत्तीवर संघात अनुभवी खेळाडू म्हणून करूण नायरची निवड करण्यात आली आहे.इंग्लंड लायन्स संघाने सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. भारत अ संघाने पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ३ बाद ४०९ धावा फलकावर जोडल्या



होत्या. यशस्वी जैस्वाल आणि कर्णधार अभिमन्यू ईश्वरन यांची जोडी सलामीला उतरली. अभिमन्यू २ चौकारांसह ८ धावा करत बाद झाला. तर यशस्वी जैस्वाल ३ चौकार आणि एका षटकारासह २४ धावा करत माघारी परतला. यानंतर भारताच्या सिनियर संघात निवड न झाल्याने चर्चेत असलेल्या सर्फराझ खानने आपल्या बॅटने निवडकर्त्यांना उत्तर दिलं.सर्फराझने ११९ चेंडूत १३ चौकारांसह ९२ धावांची उत्कृष्ट खेळी केली आणि करूण नायरबरोबर महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. यानंतर ध्रुव जुरेलने १२० चेंडूत ११ चौकार आणि एका षटकारासह ९४ धावा केल्या. या दोन्ही खेळाडूंचं शतक अवघ्या काही धावांच्या फरकामुळे हुकलं. तर नितीश रेड्डी ७ धावा करत बाद झाला. करूण नायरच्या शतकामुळे आता भारताच्या सिनियर संघात विराट कोहलीच्या जागी तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीकरता त्याचीच निवड होईल, अशी खेळी त्याने केली आहे.जवळजवळ ८ वर्षांपासून टीम इंडियाबाहेर असलेला अनुभवी फलंदाज करुण नायर गेल्या एका वर्षात खोऱ्याने धावा केल्या आहेत. रणजी ट्रॉफीपासून विजय हजारे आणि सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीपर्यंत, त्याच्या बॅटमधून धावांचा पाऊस पाहायला मिळाला. यादरम्यान करुण नायरने एकूण ९ शतकं झळकावली. करूणच्या शतकांचा सिलसिला भारतीय संघ कसोटीमध्ये झगडताना सुरू होता. तेव्हा भारताने न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरूद्ध कसोटी मालिका गमावली होती आणि त्याला संघात घेण्याची मागणी होत होती.

अखेर, २०१७ नंतर पहिल्यांदाच करुण नायरची कसोटी संघात निवड झाली. पण कसोटी मालिकेपूर्वी, इंडिया अ आणि इंग्लंड लायन्स यांच्यातील सामन्याच्या पहिल्या दिवशी करुण नायरने एक संस्मरणीय शतक झळकावले. करुणने तिसऱ्या क्रमांकावर खेळताना एक उत्कृष्ट खेळी केली, ज्याने खराब सुरुवातीनंतर इंडिया-अ संघाचा डाव सावरला.

## सातत्याने तीनही प्रारूपांत खेळणे अवघड -बुमरा



**नवी दिल्ली, दि. ३१ प्रतिनिधी**

एकदिवसीय आणि ट्वेन्टी-२० या तीनही प्रारूपांत सातत्याने खेळत राहणे अवघड आहे. सततच्या क्रिकेटमुळे शरीरावर ताण पडतो. त्यामुळे कारकीर्दीत एक टप्पा असा येतो, जेव्हा तुम्हाला निवडक सामने आणि स्पर्धांना प्राधान्य द्यावे लागते, असे मत भारताचा तारांकित वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराने व्यक्त केले. बुमराला गेल्या काही काळात विविध दुखापतींचा सामना करावा लागला आहे. या वर्षाच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलियात खेळत असताना बुमराला पाठदुखीने सतावले. त्यामुळे त्याला तीन महिने स्पर्धात्मक क्रिकेटपासून दूर राहावे लागले. तसेच गोलंदाज म्हणून बुमराचे महत्त्व लक्षात घेता, भारतीय संघाला त्याच्या कार्यभार व्यवस्थापनावर विशेष लक्ष द्यावे लागत आहे. याच कारणास्तव त्याला कसोटी संघाचे कर्णधारपद देणेही निवड समितीने टाळले.क्रिकेटच्या तीनही प्रारूपांत दीर्घकाळ खेळणे कोणत्याही खेळाडूला अवघडच जाते. मी बऱ्याच वर्षांपासून तिन्ही प्रारूपांत खेळत आहे. मात्र, काही काळाने आव्हाने वाढत जातात. तुमचे शरीर कोणत्या स्थितीत आहे आणि कोणत्या स्पर्धा सर्वांत महत्त्वाच्या आहेत, याचा तुम्हाला विचार करावा लागतो,'' असे बुमरा म्हणाला. ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार मायकल क्लार्कला दिलेल्या 'पॉडकास्ट' मुलाखतीत बुमराने विविध विषयांवर चर्चा केली. बुमराने आतापर्यंत ४५ कसोटी, ८९ एकदिवसीय आणि ७० ट्वेन्टी-२० सामन्यांत भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. तसेच त्याने १४० हून अधिक 'आयपीएल' सामनेही खेळले आहेत.'कारकीर्दीत तुम्ही जसे पुढे जाता, तसे तुम्हाला निवडक स्पर्धा आणि सामन्यांना प्राधान्य द्यावे लागते. तुम्हाला शरीराची विशेष काळजी घ्यावी लागते. मैदानावर असताना मला १०० टक्के देऊन खेळायला आवडते. आता शारीरिकदृष्ट्या मी तंदुरुस्त आहे. मात्र, मी कोणतेही लक्ष्य समोर ठेवलेले नाही,'' असे बुमराने सांगितले. २०२८ च्या ऑलिम्पिक स्पर्धेत देशाकडून खेळायला आवडेल असेही बुमरा म्हणाला.

भारतीय संघ २० जूनपासून इंग्लंडमध्ये पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. यात भारताच्या गोलंदाजीची भिस्त बुमरावरच असेल. ''इंग्लंडमध्ये खेळणे नेहमीच आव्हानात्मक असते. मला 'ड्युक्स'च्या चेंडूने गोलंदाजी करायला आवडते.

## शिवम दुबे भारतीय संघासाठी ठरला 'लकी' चार्म!



**नवी दिल्ली, दि. ३१ प्रतिनिधी**

भारताच्या संघाने २०२४ चा विश्वचषक जिंकला आणि भारतीय क्रिकेट चाहत्याचा दुष्काळ संपवला. भारताच्या संघाने मागील काही वर्षामध्ये कमालीची कामगिरी केली आहे. त्याचा परिणाम देखील जगाला पाहायला मिळाला आहे. भारताच्या संघाने २०२४ मध्ये विश्वचषक जिंकला आणि उत्साह संपुर्ण देशाने साजरा केला. २०२५ मध्ये भारताच्या संघाने दुबईमध्ये चॅम्पियन ट्रॉफी जिंकली आणि भारताला आणखी एक आनंद साजरा करण्याची संधी दिली. आता भारतीय विश्वचषक २०२४ च्या संघामध्ये सामील झालेल्या खेळाडूची आकडेवारी समोर आली आहे. भारताच्या संघामधील शिवम दुबे हा त्याच्या स्फोटक फलंदाजीमुळे देखील ओळखला जातो. त्याने भारतासाठी मोठी खेळी फार कमी खेळल्या असतील पण तो भारतासाठी कठीण काळामध्ये महत्वाच्या धावा करण्यासाठी ओळखला जातो. पण आता शिवम दुबे याने त्याच्या नावावर आणखी एक पराक्रम केला आहे आणि ते पाहुन तुम्हाही धक्का बसेल याचे कारण काय यासंदर्भात सविस्तर सांगणार आहोत. शिवम दुबे हा आता जगामध्ये ३० सामने खेळुन एकही सामना न गमावलेला खेळाडू ठरला आहे. शिवम दुबे हा भारतीय टी-२० संघासाठी खेळतो त्याला मागील बऱ्यालाही धक्का बसेल. शिवम दुबेला भारतीय संघाचा लकी चार्म म्हटले जात आहे भारतीय संघामध्ये त्याच्या स्फोटक फलंदाजीमुळे भारतीय संघामध्ये स्थान मिळाले आहे. डिसेंबर २०१९ पासुन भारतीय संघासाठी तो अष्टपैलुची भुमिका साकारत आहे. त्याने आतापर्यत ३० सामने खेळले आहेत. ३० सामन्यामध्ये त्याचा एकही सामन्यात पराभव झाला नाही. सलग ३० सामन्यामध्ये विजय मिळवणार तो आता जगातला पहिला क्रिकेट खेळाडू ठरला आहे. शिवम दुबेच्या २० आकडेवारी बद्दल सांगायचे झाले तर त्याने आत्तापर्यंत ३५ सामने खेळले आहेत यामध्ये त्याने ५३१ धावा केल्या आहेत. यात चार अर्धशतकांचा समावेश आहे. २० बॉलिंग करिअरमध्ये त्याने ३५ सामन्यांमध्ये १३ विकेट्स घेतले आहेत.

## अविनाश साबळेची 'सुवर्ण' कामगिरी

**नवी दिल्ली, दि. ३१ प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या बीड जिल्ह्यातील मांडवा गावचा सुपुत्र अविनाश साबळे याने दक्षिण कोरियातील गुमी येथे इतिहास रचला आहे. त्याने आशियाई ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत ३००० मीटर स्टीपलचेस शर्यतीत सुवर्णपदक पटकावून दिले आहे.

या सुवर्णपदाकसह भारताचा ३६ वर्षांचा सुवर्णपदकाचा दुष्काळ संपवला असून, अविनाश हा या स्पर्धेत सुवर्ण जिंकणारा दुसरा भारतीय खेळाडू ठरला आहे. यापूर्वी १९८९ दिना रामने आशियाई चॅम्पियनशिपच्या या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते.अविनाश साबळेने ८ मिनिटे १०.१३ सेकंदात शर्यत पूर्ण करत राष्ट्रीय विक्रमाला पुन्हा एकदा गवसणी घातली. ही त्याची दहावी वेळ आहे, जेव्हा त्याने राष्ट्रीय विक्रम मोडला. अविनाशचा हा विजय केवळ त्याच्या क्रीडा कौशल्याचाच नव्हे, तर त्याच्या




जिद्दीचा आणि मेहनतीचा पुरावा आहे. मांडवा येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या अविनाशने लहानपणापासून अनेक अडचणींचा सामना केला. शाळेत जाण्यासाठी दररोज ६ किलोमीटर धावणे, वीट भट्टीवर काम करणे आणि भारतीय सैन्यात सामील होऊन सियाचीनसारख्या कठीण ठिकाणी सेवा देणे, या सर्व अनुभवांनी त्याला घडवले. त्याच्या या यशाने बीडसह संपूर्ण महाराष्ट्र आणि देशभरात आनंदोत्सव साजरा झाला. गावकऱ्यांनी त्याचे जल्लोषात स्वागत केले, तर सोशल मीडियावर चाहत्यांनी त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला.

## इंग्लंडकडून विंडीजचा २३८ धावांनी पराभव

**नवी दिल्ली, दि. ३१ प्रतिनिधी**

इंग्लंडच्या नवीन मर्यादित षटकांच्या कर्णधारपदी हॅरी ब्रूकचा कार्यकाळ एजबॅस्टन येथे झालेल्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजवर २३८ धावांच्या मोठ्या विजयाने सुरू झाला. इंग्लंडच्या पहिल्या सात फलंदाजांनी ३५ किंवा त्याहून अधिक धावा केल्या. एकदिवसीय सामन्यात सात सलामीवीरांनी ३५ किंवा त्याहून अधिक धावा केल्याची ही पहिलीच वेळ होती. अर्धशतके झळकावणाऱ्या चार खेळाडूंमध्ये ब्रूकचा समावेश होता. इंग्लंडने आठ विकेट्सवर ४०० धावा केल्यानंतर २७ व्या षटकात



वेस्ट इंडिजचा डाव १६२ धावांवर गुंडाळला. मध्यमगती गोलंदाज साकिब महमूदने (३२ धावांत तीन विकेट्स) अचूक मारा केला तर वेगवान गोलंदाज जेमी ओव्हरटनने (२२ धावांत तीन विकेट्स) टेल-एंडर्सना बाद केले.सप्टेंबर २०२३ नंतर इंग्लंडला रविवारी कार्डिफमध्ये विजय मिळवून पहिल्यांदाच एकदिवसीय द्विपक्षीय मालिका जिंकण्याची संधी मिळेल. या मालिकेतील शेवटचा सामना मंगळवारी ओव्हल येथे खेळला जाईल. वेस्ट इंडिजचा कर्णधार शाई होपने अनुकूल परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी इंग्लंडला प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिले, परंतु गोलंदाजांच्या खराब कामगिरीमुळे यजमान संघाने वर्चस्व गाजवले. पहिल्यांदाच डावाची सुरुवात करताना बेन डकेट (६०) आणि जेमी स्मिथ (३७) यांनी सात षटकांत ६४ धावांची भागीदारी करून इंग्लंडला जलद सुरुवात करून दिली.जेकब बेथेकच्या ८२ धावा जो रूटने ५७ तर ब्रूकने ५८ धावांचे योगदान दिले. तथापि, बार्बाडोसमध्ये जन्मलेल्या जेकब बेथेलने ५३ चेंडूंत आठ चौकार आणि पाच षटकारांसह ८२ धावा केल्या तेव्हा संघाचा धावगती वाढली. इंडियन प्रीमियर लीगमधून परतलेल्या बेथेलने विल जॅक्स (२४ चेंडूंत ३९ धावा) सोबत सहाव्या विकेटसाठी ४४ चेंडूंत ९८ धावांची स्फोटक भागीदारी केली. लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजने नियमित अंतराने विकेट गमावल्या. १२ व्या षटकात ६६ धावांत चार विकेट गमावल्यानंतर संघ जवळजवळ सामन्याबाहेर पडला होता. सर्वात कमी ११ व्या स्थानावर फलंदाजीला आलेल्या सिल्सने संघाकडून सर्वाधिक २९ धावा केल्या.

## बाजारात पुन्हा टॅरिफची चिंता

भारतीय शेअर बाजारात शुक्रवारी (दि.३०) मेरिकेच्या टॅरिफची चिंता दिसून आली. परिणामी, सेन्सेक्स- निफ्टी घसरणीसह बंद झाले. सेन्सेक्स १८२ अंकांनी घसरून ८१,४५१ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक ८२ अंकांच्या घसरणीसह २४,७५० वर स्थिरावला.कमकुवत जागतिक संकेत आणि जीडीपी आकडेवारीच्या पार्श्वभूमीवर आज गुंतवणूकदार सावध दिसून आले. मुख्यतः आज आयटी शेअर्समध्ये मोठी घसरण झाली. निफ्टी आयटी १.१ टक्के घसरला.दरम्यान, निफ्टी बँकने आज मजबूत वाढ नोंदवली. सरकारी बँक शेअर्समध्येही खरेदी दिसून आली. तर बीएसई मिडकॅप ०.४ टक्के घसरला. स्मॉलकॅप शेअर्समध्ये सलग सहाव्या दिवशी तेजी कायम राहिली. बीएसई स्मॉलकॅप ०.१७ टक्के वाढून बंद झाला.बाजारातील आजच्या घसरणीमुळे बीएसईवरील सर्व सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल २ लाख कोटींनी कमी होऊन ४४४.१९ लाख कोटी रुपयांपर्यंत खाली आले.बीएसई सेन्सेक्सवरील २४ शेअर्स लाल रंगात बंद झाले. सेन्सेक्सवर टेक महिंद्रा, एचसीएल टेक, एशियन पेंट्स, एनटीपीसी, इन्फोसिस, नेस्ले इंडिया, टाटा स्टील, सन फार्मा, पॉवर ग्रिड हे शेअर्स घसरले. तर इटर्नलचा शेअर्स ४.५ टक्के वाढला. एसबीआय, एचडीएफसी बँक, एलटी, रिलायन्स हे शेअर्सही वाढून बंद झाले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना गुरुवारी वॉशिंग्टनमधील एका फेडरल अपील न्यायालयाने दिलासा देणारा निर्णय दिला.

न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाला आपत्कालीन शक्ती अधिकाराअंतर्गत टॅरिफ (आयात वस्तूंवर शुल्क) आकारणी सुरू ठेवण्यासाठी तात्पुरती परवानगी दिली. या निर्णयानंतर बाजारात काही प्रमाणात टॅरिफची चिंता दिसून आली. विशेषतः त्याचा परिणाम आयटी शेअर्सवर दिसून आला. एचसीएल टेक, टेक महिंद्रा, , टीसीएस हे शेअर्स १ ते २ टक्क्यांपर्यंत घसरले.निफ्टी ऑटो ( ) निर्देशांक जवळपास १ टक्के घसरला. यावर बजाज ऑटोचा शेअर्स ३.१ टक्के घसरून टॉप लूजर ठरला. अशोक लेलँड, एआरएफ, भारत फोर्ज, एम अँड एम हे शेअर्स १ ते २ टक्क्यांपर्यंत घसरले.

# अदानींच्या मुंबई विमानतळाविरोधात इंडिगो, एअर इंडिया एकत्र

**नवी दिल्ली : दि. ३१ प्रतिनिधी**

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील अदानी समूहाकडून चालविल्या जात असलेल्या विमानतळाकडून शुल्कासंबंधी नियमांमध्ये केलेल्या बदलांविरोधात इंडिगो आणि एअर इंडिया या हवाई सेवा दंड थोपटून एकत्रपणे उभ्या राहिल्या आहेत. या विमानसेवांनी या संबंधाने हस्तक्षेपाची विनवणी करणारे निवेदनही सरकारला दिले आहे.

अब्जाधीश गौतम अदानी यांच्या नेतृत्वाखालील समूहाद्वारे व्यवस्थापित होत असलेल्या सात विमानतळांपैकी एक आणि देशातील सर्वात व्यस्त आणि सर्वात मोठे असलेले हे विमानतळ आहे. वाढत्या आर्थिक गरजा आणि विमानसेवांकडून पैसे चुकते करण्यात कुचराईचा धोका लक्षात घेता, काही शुल्क रचनेत बदल अपरिहार्य असल्याचे समूहाचे म्हणणे आहे.सरकारला धाडल्या गेलेल्या आणि 'रॉयटर्स' या वृत्तसंस्थेच्या हाती लागलेल्या गोपनीय पत्रात या बदलाला देशाच्या हवाई ९१ टक्के हिस्सेदारी असलेल्या या दोन विमानसेवांचा तीव्र विरोध दिसून येतो. अदानी विमानतळाने लँडिंग आणि



पार्किंग शुल्कासाठी बँक हमीच्या दीर्घकालीन प्रथेऐवजी, आता अनामत म्हणून बँकेत रोख ठेवही सक्तीची केली आहे. देशातील इतर विमानतळांवरही असेच उपाय योजले जातील आणि हा चुकीचा पायंडा मोठा आर्थिक ताण निर्माण करणारा ठरेल, असे एअर इंडियाने पत्रात म्हटले आहे. आठ महिन्यांपूर्वी ऑक्टोबरमध्ये लागू झालेल्या या बदलाच्या सुरू असलेल्या विरोधाबाबत प्रतिक्रिया देताना, अदानी एअरपोर्ट होल्डिंग्जचे मुख्य कार्यकारी अरुण बन्सल म्हणाले, कोणतीही विमानसेवा सामान्यतः वेळेवर पैसे देत नाही. आम्हाला आमचा रोख प्रवाह विमानसेवांच्या रोख प्रवाहाशी जुळवून घ्यायचा आहे. 'त्यांनी आमच्या चांगुलपणाचा आतापर्यंत फायदा घेतला आहे. खेळत्या भांडवलाच्या समस्या आम्हालाही निर्माण होतात, ज्याचे निवारण गरज पडल्यास अनामत ठेव वापरून करता येते,' अशी पुस्तीही बन्सल यांनी जोडली.

गेल्या वर्षी ५३० लाख प्रवाशांना सेवा देणाऱ्या मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडला आर्थिक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. कंपनीने गेल्या वर्षी ४६.१ कोटी डॉलरच्या महसुलावर, ७.११ कोटी डॉलरचा तोटा नोंदविल्याचे उपलब्ध आकडेवारी दर्शविते.

## वित्तीय तुटीचे ४.८ टक्क्यांचे लक्ष्य साध्य

**नवी दिल्ली : दि. ३१ प्रतिनिधी**

सरलेले आर्थिक वर्ष २०२४-२५ अखेर केंद्राची वित्तीय तूट पूर्ण वार्षिक उद्दिष्टाच्या १००.५ टक्क्यांच्या मर्यादेत राहिल्याचे शुक्रवारी जाहीर केलेल्या आकडेवारीने स्पष्ट केले. सरकारचा खर्च आणि महसुली उत्पन्न यातील तफावतीला वित्तीय तूट म्हटले जाते. देशाचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) कार्यालयाने वित्तीय तुटीची ही आकडेवारी शुक्रवारी जाहीर केली आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या वर्षाच्या सुरुवातीला त्यांच्या अर्थसंकल्पीय घोषणेमध्ये वित्तीय तुटीचे लक्ष्य सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) तुलनेत आधी अंदाजलेल्या ४.९ टक्क्यांवरून ४.८ टक्क्यांपर्यंत कमी केले. केंद्र सरकारकडून भांडवली खर्चात करण्यात आलेली कपात आणि मध्यवर्ती बँकेकडून अपेक्षेपेक्षा अधिक लाभांश मिळाल्याने तूट या अपेक्षित लक्ष्यापर्यंत राखणे शक्य झाले. विद्यमान आर्थिक वर्षासाठी केंद्र सरकारने ४.४ टक्के वित्तीय तुटीचे लक्ष्य निश्चित केले आहे.सरलेल्या आर्थिक वर्षात देशाची वित्तीय तूट जीडीपीच्या तुलनेत ४.८ टक्के पातळीवर राहिली आहे. वित्तीय तूट १५.७७ लाख कोटी रुपयांची असून, ती सुधारित वार्षिक लक्ष्याच्या १००.५ टक्के आहे. तर गेल्या वर्षीची ती उद्दिष्टाच्या ९५.४ टक्क्यांच्या पातळीवर होती.केंद्र सरकारचा एकूण खर्च ४६.५६ लाख कोटी रुपये राहिला, जो आर्थिक वर्षाच्या सुधारित अर्थसंकल्पीय लक्ष्याच्या ९८.७ टक्के अर्थात कमी राहिला आहे. महसुलाच्या बाजूने, एकूण प्राप्ती ३०.३६ लाख कोटी रुपये होती, ज्यामध्ये कर संकलन २४.९९ लाख कोटी रुपये आणि करोतर महसूल ५.३८ लाख कोटी रुपये होता. कर महसूल सुधारित अंदाजाच्या ९७.७ टक्के आहे, तर करोतर महसूल अपेक्षेपेक्षा सरस १०१.२ टक्के असा राहिला.

## वित्तीय क्षेत्रात 'एआय'चा वापर शक्य; रिझर्व्ह बँकेकडून लवकरच नियामक चौकट

**नवी दिल्ली : दि. ३१ प्रतिनिधी**

चालू आर्थिक वर्षात वित्तीय क्षेत्रात कृत्रिम प्रज्ञेच्या (एआय) नैतिक अवलंब सुरू करण्यासाठी लवकरच नियामक चौकट तयार केली जाईल, असे रिझर्व्ह बँकेने ताज्या वार्षिक अहवालात नमूद केले आहे. प्रचंड प्रमाणावर वाढणारे आर्थिक व्यवहार आणि डिजिटल आकडेवारीच्या मोठ्या प्रमाणावरील उपलब्धतेमुळे बँकिंग कार्यक्षमतेला चालना देण्यासाठी रिझर्व्ह बँक प्रयत्नशील आहे. संगणक प्रणालीतील जलद बदलांमुळे एआय आणि मशीन लर्निंगसारख्या (एमएल) तंत्रज्ञान अधिक अद्ययावत झाले आहे.

शिवाय जागतिक आणि देशांतर्गत वित्तीय संस्थांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवला आहे. बदलत्या काळानुसार पावले टाकत वित्तीय




क्षेत्रात एआयच्या वापराला प्रोत्साहन म्हणून रिझर्व्ह बँकेने नियामक चौकट तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.रिझर्व्ह बँक स्वतःच्या कार्यात एआय आणि एमएल-चालित उपायांची अंमलबजावणी करत आहे. यासाठी डिसेंबर २०२४ मध्ये त्यांनी एक बाह्य समिती स्थापन केली आहे, ज्यामध्ये वित्तीय क्षेत्रात एआयच्या सक्षमीकरणासाठी चौकट शिफारस करण्याचे अधिकार असलेल्या तज्ज्ञांचा समावेश आहे. जागतिक सर्वोत्तम पद्धतींनुसार बँकिंग आणि बँकेतर क्षेत्रांच्या नियामक आणि पर्यवेक्षी चौकटीला अधिक मजबूत करून वित्तीय व्यवस्थेचे रक्षण करण्यासाठी त्यांनी अनेक उपाययोजना केल्या आहेत. नियमन केलेल्या संस्थांमध्ये नियमांचे तर्कसंगतीकरण आणि सुसंवाद साधण्यासाठी एकत्रित प्रयत्न केले जाणार आहे. तसेच तक्रार व्यवस्थापन आणि तक्रार निवारण यंत्रणेच्या सुव्यवस्थेसाठी एआयचा वापर केला जाईल, असे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे.

## ▶ थोडक्यात

### मनपातर्फे अहिल्यादेवींना विनम्र अभिवादन

**नागपूर :** नागपूर महानगरपालिकाच्या वतीने लोककल्याणकारी राज्यकर्त्या, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या दालनात आयोजित छोटेखानी समारंभात मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या छायाचित्राला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.
जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, अमोल तपासे, शैलेश जांभूळकर, स्वच्छता विभागाचे लोकेश बासनवार, गजानन जाधव, प्रवीण वानखेडे, प्रमोद गणवीर, अग्निशमन विभागाचे जवान तसेच, अन्य कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

### आशा युनियनतर्फे ५५ वा सीटू स्थापनादिन

**नागपूर :** आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन सीआयटीयू नागपूर जिल्हा यांच्यावतीने मुख्य कार्यालयात सीटूचा ५५ वा स्थापना दिन साजरा करण्यात आला. जिल्हाध्यक्ष राजेंद्र साठे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. कार्यक्रमात सीटू स्थापनेमागील सविस्तर माहिती देण्यात आली. आशा वर्कर व गटप्रवर्तक यांची नेमणूक, कार्य आणि आरोग्य विभागातील महत्त्व यावर मार्गदर्शन करण्यात आले. आशा वर्कर व गटप्रवर्तक यांच्यावर आरोग्य क्षेत्राची मोठी जबाबदारी असून, त्यांना सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन किमान वेतन द्यावे,अशी मागणी करण्यात आली. कार्यक्रमाला प्रीती मेश्राम, लक्ष्मी कोत्तेजवार, माया कावळे, प्रमोद कावळे, प्रतिमा डोंगरे प्रामुख्याने उपस्थित होते.

### पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा ५ जून रोजी

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ५ जून रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. रोजगार मेळावा दीक्षांत सभागृह, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विदयापीठ, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, महाराजबागेजवळ, सिव्हिल लाईन येथे सकाळी १० ते दुपारी ३ दरम्यान होणार आहे. मेळाव्यामध्ये नागपूर येथील स्मार्ट हायजिया लिमिटेड, वैभव एन्टरप्रायजेस, महाचाई लिमिटेड, द युनिर्व्हसल ग्रुप असोसिएट,टाटा स्ट्रीव्ह एक्सटेंशन सेंटर, एलआयसी, टाईम प्रो इव्हेंट अँड एडुटेक, मानशा टूर्स लिमिटेड, इरोस मेटल वर्क लिमिटेड आदी कंपन्यामार्फत २४० पेक्षा जास्त जागांसाठी दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, आयटीआय, पदविका इत्यादी पात्रताधारक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती होणार आहे तसेच, उमेदवारांची प्राथमिक निवड केली जाणार आहे.या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुनंदा बजाज यांनी केले आहे.

# ‘अमृत’मुळे नागपुरात स्वच्छ पाणीपुरवठा

## दररोज ३७० टँकर ट्रिप्समध्ये घट, मनपाला सुमारे ५.५० कोटींची बचत

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**लक्षणीय सुधारणा**

- यापूर्वी होणारा १८० ते १९० टँकर ट्रिप्सचा पाणीपुरवठा पूर्णतः बंद करण्यात आला आहे. अमृत योजनेंतर्गत शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेत लक्षणीय सुधारणा झाली आहे. कमकुवत दाब, दूषित पाणी व टँकर अवलंबनाच्या समस्यांवर नियंत्रण मिळवण्यात मनपाला यश आले असून, यामुळे स्वच्छ, सातत्यपूर्ण आणि दाबयुक्त पाणी नागपूरकरांना मिळत आहे. विशेष म्हणजे उर्वरित भागांतील कामे प्रगतीपथावर आहेत.

**नागपूर, दि, ३१ :** नागपूर महानगरपालिकेच्या अमृत-१, अमृत-१ (अतिरिक्त) व अमृत-२ योजनेंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये नव्या जलवाहिन्यांचे जाळे टाकण्यात येत आहे परिणामी कमी दाबाने व दूषित स्वरूपात होणाऱ्य पाणीपुरवठ्यावर प्रभावी नियंत्रण आणण्यात यश आले आहे. नागरिकांना स्वच्छ, दाबयुक्त व नियमित पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे नवीन भागात दररोज टँकरने होणाऱ्या ३७० ते ३८० ट्रिप्समध्ये मोठी घट झाली असून, सुमारे ५.५० कोटी वार्षिक खर्चाची बचत होत आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात मनपा प्रशासन नागरिकांचा दर्जेदार सोयीसुविधा पुरविण्यावर भर देत आहे. शहरात अमृत योजनेअंतर्गत नव्या जलवाहिन्यांचे जाळे टाकण्यात येत आहे. यात इंदोरा-२ कमांड एरिया क्षेत्रातील ५३ किमी जुनी जलवाहिनी अमृत-१ (अतिरिक्त) योजनेतर्गत बदलण्यात आली आहे. यापूर्वी बुद्धनगर, आशीनगर, हबीब नगर, नईबस्ती, टेका नाका, सिद्धार्थनगर, वैषालीनगर, बाळाभाऊपेठ, ताजनगर या भागांमध्ये दूषित व कमी दाबाने पाणी मिळण्याच्या तक्रारी अधिक होत्या. त्यावर तोडगा काढत आतापर्यंत ३३०० पैकी २६०० नळ कनेक्शन नव्या जलवाहिनीवर स्थलांतरित करण्यात आले असून, १हजार ५० अनधिकृत कनेक्शन अधिकृत करण्यात आले आहेत. सध्या बुद्धनगर, आशीनगर, हबिब नगर, नई बस्ती, देविनगर, बाळाभाऊ पेठ आदी भागातील नवीन जलवाहिनीवरून पाणीपुरवठा सुरू केला आहे. पाणी दाब ५ ते ८ मीटरने वाढला असून या भागात स्वच्छ पाणीपुरवठा केला जात आहे. सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाच्या अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी यांनी यासंदर्भात माहिती दिली. बिनाकी एक्झिस्टिंग कमांड एरियातील २३ किमी जुनी जलवाहिनी अमृत-१ (अतिरिक्त) योजनेतर्गत नव्याने टाकण्यात आली आहे. पंचशील नगर, बाबाबुद्ध नगर, पचकुंवा, हनुमान सोसायटी, महेंद्रनगर, आदर्श नगर, सुजाता नगर आदी भागांमध्ये पाणी पुरवठ्याची समस्या होती सध्या पंचशील नगर, पंचकुवा, हनुमान सोसायटी, बाबाबुद्ध नगर येथे नव्या जलवाहिनीवरून स्वच्छ व दाबयुक्त पाणी मिळत आहे. उर्वरित ठिकाणी कार्य प्रगतीपथावर आहे. नारा एनआयटी व नारी-2 कमांड एरिया क्षेत्रात अमृत-१ अंतर्गत ५० किमी व अमृत-२ अंतर्गत २० किमी जलवाहिनी टाकण्यात आली आहे. याआधी पांजरा, रोहिणी सोसायटी, दुगार्माता नगर, समता नगर, गनेशनगरी, अशोकानगर आदी भागात दररोज १९० ते २०० टँकर ट्रिप्सने पाणीपुरवठा करण्यात येत होता. आता दोन हजार नव्या नळ कनेक्शनमुळे टँकर पुरवठा पूर्णतः थांबवण्यात आलेला आहे.उप्पलवाडी वांजरा कमांड एरिया क्षेत्रात अमृत-१ अंतर्गत २० किमी व अमृत-२ अंतर्गत ३० किमी जलवाहिनी टाकण्यात आली आहे. तर पाहुणे लेआऊट, भिमवाडी, माँ बंबलेश्वरी नगर, रहमत नगर, बिल्लाल नगर आदी भागात २२०० ते २४०० नळ कनेक्शन देण्यात आले आहे.

### CAPTION — झाड कोसळण्याची भीती



**नागपूर:** नागपुरातील प्रशासनाच्या वतीने जवळपास प्रत्येक रस्त्यावर खड्डा खोदलेला आहे. उंटखान्यातील रस्तेही अपवाद नाहीत आता कामे तर करावीच लागणार! पण नुकसानही काही कमी नाही एका संरक्षण भिंतीजवळ खड्डा खोदण्यात आला तो तसाच कायम आहे मात्र, कडुलिंबाची मुळे खड्डयात दिसून येतात सोसाट्याचा वारा आल्यास झाड कोसळण्याची भीती आहे...

# पालकमंत्र्यांनी केली पाणंद रस्त्याची पाहणी

## शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्याची ग्वाही

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**काटोल, दि, ३१ :** शेतकऱ्यांना आपल्या शेतातील उत्पादने वेळेत बाजारपेठेपर्यंत पोहचविता यावीत यासाठी त्यांच्या शेतापासून रस्त्याची नितांत आवश्यकता प्रत्येक भागात असते. ही अडचण दूर व्हावी, या उद्देशाने सर्व तेरा तालुक्यात एकूण ६४९ कामांना मंजूरी दिली असून, यापैकी ४९१ कामांना कार्यारंभ आदेश दिले आहेत. गुणवत्तेचे निकष लक्षात घेऊन कामे पूर्ण करावीत, असे निर्देश महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

काटोल तालुक्यातील नायगाव ते खाणगाव या एक किलोमीटर पाणंद रस्त्याची पालकमंत्री बावनकुळे यांनी स्वतः पाहणी केली. राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याला किमान कच्चा रस्ता देण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असल्याचे सांगितले. यात शेतकरी कोणताही वाद न आणता स्वतः पुढे येत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. सदर योजनेअंतर्गत भिवापूर तालुक्यात ३०, हिंगणा तालुक्यात ३१, कळमेश्वर तालुक्यात २७, कामठी तालुक्यात ५५, काटोल तालुक्यात ५८, कुही तालुक्यात ७३, मौदा तालुक्यात ७७, नागपूर तालुक्यात ४३, नरखेड तालुक्यात ५७, पारशिवनी तालुक्यात २३, रामटेक तालुक्यात ३२, सावनेर तालुक्यात ९२, उमरेड तालुक्यात ५१ अशी पाणंद रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली आहेत.

नरखेड तालुक्यातील भिष्णूर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सुरू असलेल्या शिबिराला भेट देत नागरिकांची विचारपूस केली. उपविभागीय अधिकारी पीयूष चिवंडे, तहसीलदार उमेश खोडके, गटविकास अधिकारी निलेश वानखेडे व इतर अधिकारी उपस्थित होते. यावेळी १६१ नागरिकांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला.

### लोकशाही दिन सोमवारी

**नागपूर, दि, ३१ :** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती सभागृहात २ जून रोजी दुपारी १ वाजता करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने लोकशाही दिनाकरीता नागरिकांकडून २ जून रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत तक्रार/निवेदन अर्ज स्वीकारण्यात येणार आहे. तक्रार अर्ज दाखल केलेल्या नागरिकांना व्यक्तीशः सहभागी होणे आवश्यक आहे. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील तक्रार अर्जावर एक महिन्यात कारवाई न झाल्यास जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तक्रार अर्ज सादर करावा. तालुका लोकशाही दिनातील टोकन क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे. नागपूर महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यास यांच्यामार्फत महानगरपालिका आयुक्त व सभापती यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्रपणे लोकशाही दिनाचे आयोजन त्यांचे कार्यालयात होत असल्यामुळे संबंधित तक्रारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनात न दाखल करता संबंधित कार्यालयात आयोजित होत असलेल्या लोकशाही दिनात सादर करावा.

# मनपांकडून ‘एमएचव्हीए’ अहवाल प्रकाशित

## नागपूर शहरातील भूकंप व पुराचा धोकासंबंधी अभ्यास

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि, ३१ :** महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन विभाग आपत्ती व्यवस्थापन युनिट आणि संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यूएनडीपी) यांच्याद्वारे महाराष्ट्रातील आपत्ती जोखीम व्यवस्थापन प्रणाली सशक्तीकरण उपक्रमाअंतर्गत नागपूर शहरासाठी बहु-धोका जोखीम मूल्यांकन अभ्यास (मल्टी-हॅझर्ड रिस्क व्हल्नरेबिलिटी असेसमेंट) करण्यात आला या अभ्यासकार्याच्या अहवालाचे प्रकाशन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले.

अतिरिक्तआयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी.,अजय चारठाणकर, मुख्य अभियंता मनोज तालेवार, उपायुक्त राजेश भगत,अधीक्षक अभियंता लीना उपाध्ये, परिवहन व्यवस्थापक विनोद जाधव, मुख्य अग्निशमन अधिकारी बी.पी. चंदनखेडे, सतीश रहाटे, यूएनडीपीच्या शहर प्रकल्प समन्वयक आरुषा आनंद आदी उपस्थित होते. मल्टी-हॅझर्ड रिस्क व्हल्नरेबिलिटी असेसमेंट अभ्यासाअंतर्गत नैसर्गिक, हवामानाशी संबंधित व मानवनिर्मित आपत्तींचा शहरातील लोकसंख्या, पायाभूत सुविधा आणि आर्थिक सेवांवर होणाऱ्या परिणामांचा सखोल अभ्यास करण्यात आला.नागपूर शहरातील भूकंप व पुराचा धोका, विविध वॉर्डस्तरीय जोखीम नकाशे, भौतिक मालमत्ता, नागरी सुविधा यांचे असुरक्षितता व संपर्क मूल्यांकन करण्यात आले आहे. त्यानुसार भूकंप व पुरासंबंधी वॉर्ड पातळीवरील धोका नकाशे तयार करण्यात आले शहराच्या भौतिक रचनेची जोखीम आणि संपर्क मूल्यांकन करून त्यानुसार विविध योजना सूचविण्यात आली आहे. या अभ्यासाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून ‘डिजिटल रिस्क ॲटलस’ हे वेब आधारित ‘जीआयएस पोर्टल’तयार करण्यात आले आहे. या पोर्टलद्वारे मनपातील अधिकारी, नियोजनकर्ते,आपत्ती व्यवस्थापन कर्मचारी आणि संबंधित विभागांना धोकाक्षेत्र, असुरक्षित व संपर्कभाग, नकाशे आदींबाबत माहिती मिळवता येणार आहे.

# आदिवासी विकास प्रकल्प योजनांचा लाभ घ्यावा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**काटोल, दि, ३१ :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय नागपूरच्या वतीने केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना २०२४-२५ करीता विविध योजना राबविण्यात येत आहे. चालू आर्थिक वर्षासाठी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यासाठी योजनेतंर्गत विविध योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. संबंधितांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सदर योजनांअंतर्गत अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना काटेरी व जाळीचे तार, ताडपत्री खरेदी, बेरोजगार लाभार्थ्यांना विविध व्यवसाय सुरू करण्यासाठी, आदिवासी (महिला-पुरुष) समुह/गट यांना विटभट्टी लावणे, आदिवासी (महिला-पुरुष) समुह/गट यांना लघुउद्योग/ गृहउद्योग करणे, आटा चक्की/दालमिल/मिरची कांडप/राईसमिल यंत्र खरेदी करणे, कृषी शेततळेधारक शेतकऱ्यांना मत्स्यसंवर्धन करण्यासाठी सामग्री व साहित्य खरेदी करणे, शेतकऱ्यांना तुषार सिंचन खरेदी करणे. आदिवासी बचत गटांना ट्रॅक्टर खरेदी करणे, आदिवासी (महिला-पुरुष) समूह/ गट यांना व्यवसायाकरीता डिजिटल बॅनर/ग्राफिक्स सेटअप साहित्य खरेदी करणे, महिलांना टू-इन-वन शिलाई मशीन खरेदी, ब्युटी पार्लरसाठी ८५ टक्के अनुदानावर अर्थसहाय्य दिले जाणार आहे. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर येथे संपर्क साधावा.

# ४० सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**नागपूर, दि, ३१ :** नागपूर शहराचे आरोग्य टिकवून ठेवत शहराला स्वच्छ ठेवण्यात महत्वाचे कार्य करणाऱ्या घनकचरा विभागातील ४० सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांचा तुळशी रोप, शाल, श्रीफळ आणि गौरव प्रमाणपत्र प्रदान करत सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपायुक्त राजेश भगत, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, स्वच्छता विभागाचे अधीक्षक सुरेश शिवणकर, विभागीय अधिकारी लोकेश बासनवार, अमोल तपासे आदी उपस्थित होते. उपायुक्त राजेश भगत यांनी शहरातील सफाईचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच, सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. महल्ले यांनी सुद्धा सफाई कर्मचाऱ्यांमुळे शहराचे आरोग्य चांगले असल्याची ग्वाही दिली. सुरेश रामकृष्णा गुहे, अरविंद उदाराम सहारे, कुंदन तुकाराम नरहरे, जमना रुपलाल अडबडी, कविता राजू समुद्रे, मीना अनिल पंसारे, मीना दिलीप सावरकर, चंद्रगुप्ता रामाजी इंदुरकर, अशोक लक्ष्मण मेश्राम, हिराबाई छोटा करिहार, सोना हरीलाल तांबे, मीना कैलास कुंडे, आशा राजू बढेल, इंदिरा हरनामसिंग खरे, बब्बू जंगली वाघमारे, महिपाल सुखराम करीहार, सुगन बब्लू गठलवार, प्रेम मोती फातोडे,धर्मेंद्र जमन चव्हाण, रमेश बाबूलाल कतारे, उषा मोहन टाकभवरे, मालती दिलीप समुद्रे, कलदार महादेव मेश्राम, कैलास शंकर हिवाळे, कल्पना महादेव रंगारी, मधुकर श्यामराव इंगळे, छाया राजू महाजन, राजू महादेव डुले, बब्बू चौधरी चमके, विजया दिगांबर निनावे, कृष्णा गोविंदराव खापेकर, काला नरेंद्र चमके, मीना सुरेंद्र डेलीकर, संजय देवराव मोहरले, राणी प्रकाश गोहर, सीता गणेश लंगोटे, नंदा राजेश जांभुळकर, नंदा अमृत डोगरे,कल्पना भिमराव कोचे, छाया जयंत मोटघरे, मृत्युंजय गोपीचंद वंजारी यांचा तुळशी रोप, शाल, श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन अरुण तुर्केल यांनी केले. लोकेश बासनवार यांनी आभार मानले.

# ‘शून्य अपघात: महावितरण व महाराष्ट्र’ आजपासून

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि, ३१ :** ‘शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र’ या संकल्पनासह महावितरण कंपनी २० वा वर्धापनदिन ६ जून रोजी साजरा करत आहे. यानिमित्ताने येत्या १ ते६ जून या कालावधीत राज्यभरात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. १ जून रोजी नागपूर परिमंडलाच्या काटोल रोड येथील विद्युत भवन येथे सकाळी 7 वाजता ‘रन फॉर सेफ्टी’ दौड आयोजित केली आहे. विद्युत भवन ते गड्डीगोदामपर्यंत आयोजित मॅरेथॉनमध्ये महावितरणचे अधिकारी व कर्मचारी ‘विद्युत सुरक्षा’वर जनजागृती करतील. सोबतच महावितरण कार्यालये, रोहित्रांच्या पेट्या आर.एम.यू., डिजिटल बोर्ड, शिडी गाड्या, उपकेंद्रे, तक्रार निवारण केंद्रे, ग्राहक सुविधा केंद्रे आणि निवासी परिसरात विद्युत सुरक्षा पोस्टर्स लावून जनजागृती करतील. उपायांबद्दल शिक्षित लोकांना विजेच्या धोक्यांबद्दल आणि अपघात टाळण्यासाठी घ्यावयाच्या प्रतिबंधात्मक उपायांबद्दल शिक्षित असा या दौडचा हेतू आहे, विजेच्या तारा तुटल्यास काय करावे, घरगुती उपकरणांचा सुरक्षित वापर कसा करावा, शॉर्टसर्किट टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात, वीज अपघात घडल्यास प्रथमोपचार कसे करावेत याबद्दलची माहिती देण्यात येणार आहे. विद्युत सुरक्षेसारख्या गंभीर विषयावर लोकांमध्ये जागृती करून महावितरण संभाव्य अपघात टाळण्यास आणि समाजातील प्रत्येक घटकाची सुरक्षितता सुनिश्चित करण्यास मदत करत आहे.

# राज्यातील हिवताप रुग्णांची संख्या शून्यावर आणणार

## हिवताप निर्मुलनासाठी चार राज्ये एकत्र, प्रतिबंधात्मक उपाययोजना एकत्रितपणे राबविण्याचा निर्णय

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**नागपूर, दि, ३१ :** कीटकजन्य आजार प्रतिबंधात्मक उपाययोजना एकत्रितपणे राबविण्याकरता अर्थात हिवताप निर्मुलनासाठी चार राज्ये एकत्र आली आहेत. महाराष्ट्र, तेलंगणा, छत्तीसगड आणि मध्यप्रदेश या राज्यातील आरोग्य विभागातील कीटकजन्य आजार कार्यक्रमातील अधिकारी आणि विविध संस्थांची एकत्रित सभा नागपुरात पार पडली.

आरोग्य सेवा, कीटकजन्य आजार पुणे सहसंचालक डॉ. बबिता कमलापूरकर, आरोग्य सेवा उपसंचालक (नागपूर) डॉ.शशिकांत शंभरकर, राज्य कीटक शास्त्रज्ञ डॉ. महेंद्र जगताप, पाथचे सहसंचालक डॉ. अमरेश कुमार छत्तीसगड, डॉ.चिन्मय दास मध्यप्रदेश, डॉ.भावना दुबे तेलंगना डॉ. विजयकुमार, सहाय्यक संचालक डॉ. विवेक खतगावकर, डॉ. बंडू, डॉ. रामटेके, डॉ. रेखा भंडारी, डॉ. वैशाली तांबळे लातुर, डॉ. संजय रणवीर कोल्हापूर यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. राज्याच्या सीमेवरील उच्च जोखीम असलेल्या भागात कीटकजन्य आजारांचा प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी समन्वय वाढविणे आणि धोरणे मजबूत करण्याकरीता करण्यात आली होती. २०२७पर्यंत स्थानिकस्तरावर हिवताप मुक्त करून २०३० पर्यंत भारतातून हिवतापाचे रुग्ण शून्य करून निर्मूलन करण्याचे मुख्य लक्ष्य ठेवण्यात आले. डॉ. बबिता कमलापूरकर यांनी महाराष्ट्रातील कीटकजन्य आजार व प्रतिबंधात्मक उपायोजनांविषयी माहिती देऊन आंतरराज्य सभा घेण्यामागील उद्देश स्पष्ट केला. चार राज्यांमधील राज्यांमधील कीटक्जन्य आजारांविषयक समन्वय सुलभ करण्यासाठी उपयुक्त ठरेल आणि प्रभावी नियंत्रण उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी मदत होणार आहे सीमापार समन्वयाबाबत चांगल्या पद्धतीने नियोजन करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

चार राज्यातील जिल्हा हिवताप अधिकारी तसेस हिवताप निर्मूलनात काम करणाऱ्या विविध संस्था यांनी हिवताप निर्मूलनात येणारे अडथळे वर यावर करावयाची कार्यवाही, समन्वयाबाबत सादरीकरण केले. यावेळी काही मार्गदर्शकतत्त्वे निश्चित करण्यात आली राज्यातील इतर राज्यात जनतेच्या स्थलांतरासाठी मागर्दर्शक सूचना कार्यान्वित करणे, स्थलांतरासाठी चाचणी, उपचार आणि ट्रॅकिंगचा वापर करणे, आवश्यकतेनुसार प्रशिक्षण तथा क्षमता बांधणी, राज्य सीमावर्ती भागात जनजागृती, गंभीर कीटकजन्य आजाराचे प्रामुख्याने हिवतापाचे व्यवस्थापन करणे आदींचा समावेश आहे. डॉ. संजय रणवीर सहाय्यक संचालक (कोल्हापूर) यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### उड्डाणपुलावर ‘हिट अँड रन’

**नागपूर, दि, ३१ :** सक्करदरा उड्डाणपुलावर दुचाकीला धडक देऊन पळून गेलेल्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. यातील गंभीर जखमीचा मृत्यू झाला असून, अधिक तपास सुरू आहे. माहितीनुसार, दिघोरी, टेलिफोन नगर, आदिवासी सोसायटी येथील रहिवासी महेश प्रल्हाद मुंडे (२५) ३० मे २०२५ रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास दुचाकीवरून (एमएच ४० बीक्यू ६५०४) सक्करदरा उड्डाणपुलावरून जात होते. प्रकाश मारुती जिभकाटे याने आपल्या टिप्पर गाडीने (एमएच ४० बीएल १९५०) भरधाव वेगाने निष्काळजीपणाने व धोकादायकरित्या महेश मुंडे यांच्या दुचाकीला धडक दिली. या धडकेत महेश गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी मेडिकल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले असता डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी मृतकाच्या वडील प्रल्हाद नामेशराव मुंडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून उपनिरीक्षक प्रवीण कावळे यांनी टिप्पर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.






अजिंक्य भारत

आपलं अकोला

अकोला, रविवार, दि. १ जून २०२५







# बेकायदेशीर बांधकामांवर महापालिकेची चुप्पी

## इमारतीतील पार्किंगच्या जागाही विकल्या

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ : शहरात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर बांधकामे झाली आहेत. काही बड्या विकासकांनी अशी कामे करून शहरासाठी मोठ्या समस्या निर्माण केली आहे. मंजूर नकाशा बाजूला सारत वाट्टेल तसे मजले चढविले आहेत. पार्किंगच्या जागा जुन्या इमारतीतून गायब दिसत आहेत. गत दीड ते दोन वर्षांपासून बहुमजली इमारती उभारण्यात येत आहेत. बहुतांश बांधकामे मंजूर नकाशा नुसार होत नसल्याची परिस्थिती आहे. ही बाब प्रशासनाच्या लक्षात येऊनही महापालिकेकडून काहीही कारवाई होत नसल्याचे दिसून येत आहे.**



### २२० बांधकामे अनधिकृत

गत दोन वर्षांपासून महापालिका इमारतींचे मोजमाप करीत असून, आतापर्यंत २२०० इमारतींचे मोजमाप झाले आहे. यापैकी २२० बांधकामे मंजूर नकाशानुसार बांधण्यात आलेली नाहीत. या बेकायदेशीर बांधकामांना नियमाच्या चौकटीत घेऊन दंडासह शुल्क आकारणी करण्यात येणार आहे.

### येथेही पार्किंगच्या जागेचा वापर

शहरात बहुमजली इमारती (६ ते ७ मजली इमारत) निर्माणाधीन असून, काही इमारती उभ्या झाल्या आहेत. या संदर्भात महापालिकेकडे तक्रार दाखल झाली आहे. शहराच्या हद्दवाढ भागात बहुमजली अपार्टमेंट बांधल्या जात आहेत. बहुतांश विकासकांनी पार्किंगच्या जागा सोडल्या असल्या तरी काही जागेचा बेकायदेशीरपणे वापर करून दुकाने काढली आहेत.

### अनधिकृत इमारतीत नामांकित दालन

बेकायदेशीर इमारतीत नामांकित कंपन्या आपली दुकाने थाटत असल्याची परिस्थिती आहे. बाजार परवाना न काढता व्यवसाय सुरू कसे केले जातात? असा सवाल उपस्थित होत आहे. सदर इमारतीचे बांधकाम अनधिकृत असताना अशी दुकाने सुरू केली जातात. महापालिका कारवाई करत नाही; हा प्रकार अतिशय गंभीर आहे. सर्वसामान्य नागरिकांना कारवाईचा धाक दाखवणाऱ्या प्रशासनाला हे दिसत नाही का?

अकोला शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी व मुख्य बाजारपेठेत व्यापारी संकुले नियम धाब्यावर बसवून बांधल्या गेली आहेत. तळमजल्यातील पार्किंगच्या जागा या इमारतीत कुठेही दिसत नाहीत. काही विकासकांनी नावाला पार्किंगच्या जागा सोडून उर्वरित जागेत दुकाने काढून ती विकली आहेत. शहराच्या मुख्य बाजारपेठेत टिळक रोड, गांधी रोड, नवीन कापड बाजार अशा व्यस्त ठिकाणी विकासकांनी मंजूर नकाशामध्ये दाखवलेल्या पार्किंगच्या जागा गायब केल्या आहेत. या बहुमजली व्यापारी संकुलांमध्ये पार्किंगच्या जागांवर अतिक्रमण करून सर्रासपणे गोडाऊन, दुकाने काढली आहेत. सिव्हिल लाइन रोड, जवाहर नगर रोड, राम नगर, दुर्गा चौक ते जठारपेठ चौक, नेकलेस रोड, गोरक्षण मार्ग, शासकीय दूध डेअरी ते जवाहर नगर चौक या परिसरात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर इमारती उभारण्यात आल्या आहेत. मुख्य रस्त्यांवर हॉस्पिटल, कोचिंग क्लासेस, व्यापारी संकुले यांनी पार्किंगच्या जागा विकल्या आहेत. परिणामी, पार्किंगची मोठी समस्या उद्भवली असून, मुख्य रस्त्यावर वाहने पार्किंग केली जात आहेत. ही बाब प्रशासनाच्या निर्दशनास येऊनही कुठलीही कारवाई केली जात नाही. नव्याने सुरू असलेल्या बांधकामांमध्ये काही विकासकांनी पार्किंगच्या जागा सोडल्या असल्या, तरी बहुमजली इमारतींचे बांधकाम मंजूर नकाशापेक्षा अधिक केले आहे. हे कमी म्हणून की काय या इमारतीमधील फ्लॅट विकले आहेत.

दोन रस्त्यावर असलेल्या इमारतींना नियमानुसार बांधकामात कर्व्ह (राऊंड शेप) सोडणे आवश्यक आहे; परंतु बहुमजली इमारती उभारणाऱ्या विकासाकांनी बहुतांश बांधकामांमध्ये हा नियम धाब्यावर बसविला आहे. मंजूर नकाशामध्ये हा कर्व्ह दिसत असून, प्रत्यक्ष बांधकामात कर्व्ह दिसत नाही. यानंतरही कळस म्हणजे या जागा विकासकांनी विकल्या आहेत. महापालिकेच्यावतीने शहरातील बांधकामे मोजण्यासाठी एजन्सीची नियुक्ती करण्यात आली असून, अद्यापपर्यंत अडीच हजार इमारतींचे मोजमाप करण्यात आले आहे. बहुमजली इमारतींचे बांधकाम सुरू असताना नियम सर्रास पायदळी तुडविले जात असल्याचे महापालिकेला दिसत नाही का, असा सवाल उपस्थित होत आहे.

## शेतीच्या मशागतीला आला वेग...



**संपूर्ण महाराष्ट्रात अवकाळी पावसाने सतत सात दिवस हजेरी लावली होती; मात्र आता काही दिवसांसाठी पावसाने विश्रांती घेतल्याने शेतकऱ्यांना शेतीच्या मशागतीसाठी वेळ मिळाला असून, दहीगाव गावंडे शेतशिवारात शेतकरी ट्रॅक्टरद्वारे शेतीची मशागत करताना दिसत आहे. ( छाया. संजय ताथुरकर )**

# आरोपी काकाला दोन दिवस पोलीस कोठडी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** अकोल्यातील पेन्शनपुरा भागात दारूच्या नशेत पुतण्याची निर्घृण हत्या करणाऱ्या काकाला पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने त्याला २ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. ही घटना शहरात खळबळ उडविणारी ठरली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मृत युवकाचे नाव कुणाल किशोर कमलाकर (३०) असून, आरोपी काका सुनील किशोर कमलाकर (५५) यानेच ही हत्या केली आहे.

ही धक्कादायक घटना २९ मे रोजी उघडकीस आली, जेव्हा पेन्शनपुरा परिसरात दुर्गंधी येऊ लागल्याने नागरिकांनी खदान पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी तपास केला असता, सुनीलच्या घरातच कुणालचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आला.

शवविच्छेदन आणि पंचनाम्यातून स्पष्ट झाले की, कुणालच्या डोक्यावर दगडाने किंवा इतर कठीण वस्तूने प्रहार करून हत्या करण्यात आली होती. प्राथमिक तपासात, ही घटना पाच ते सहा दिवसांपूर्वी घडल्याचे संकेत आहेत.या प्रकरणात सहायक पोलीस निरीक्षक नीलेश करंदीकर व शंकर डाबेराव यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात आला. आरोपी सुनीलला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असता, दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणात हत्या कौटुंबिक वादातून की दारूच्या नशेत घडले, हे पोलिसांनी सुरू केलेल्या पुढील तपासातून स्पष्ट होणार आहे.

# शहरात निघाली तंबाखूमुक्त अकोला जनजागृती रॅली



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१:** ३१ मे जागतिक तंबाखू सेवन विरोधी दिनाच्या अनुषंगाने आज अकोला शहरामध्ये राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, इंडियन मेडिकल असोसिएशन, मुक्ती फाउंडेशन यांच्या विद्यमाने भव्य तंबाखूमुक्त अकोला जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. सदर रॅलीचे उद्घाटन जिल्हाधिकारी अजित कुंभार व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे यांच्या हस्ते करण्यात आले, तसेच जनजागृती रॅलीनंतर जीएमसी ऑडिटोरियम हॉल या ठिकाणी विविध कर्करोग तज्ज्ञ डॉ. प्रसाद, डॉ. बगडिया, डॉ. गौरव मंत्री व मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अमोल केळकर यांचे जनजागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक अकोला जिल्ह्याचे नवीन रुजू झालेले पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या हस्ते करण्यात आले, तसेच मंचावर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.तरंगतुषार वारे, डॉ. करंदीकर, मनपा आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आशिष गिऱ्हे हे उपस्थित होते. सदर दिवसाच्या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन इंडियन मेडिकल असोसिएशनचे प्रेसिडेंट डॉ. संतोष सोमानी, डॉ. प्रदीप अग्रवाल, डॉ. सोनल मोदी ,डॉ.मयूर अग्रवाल, डॉ. गोविंद खंडेलवाल व राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे डॉ. प्रीती कोगदे, धम्मसेन शिरसाट, जानराव अवघड, डॉ. शीतल मस्के यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. निखिल महाजन व मयुरी महाजन यांनी केले.

जागतिक तंबाखूसेवन विरोधी दिनाच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या व्हिडिओ रील स्पर्धा, निबंध स्पर्धा, स्लोगन्स स्पर्धा, चित्रकला स्पर्धेच्या विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले, तसेच तंबाखू नियंत्रण क्षेत्रात जनजागृतीकरिता जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाच्या जिल्हा सल्लागार डॉ. प्रीती कोगदे , धम्मसेन शिरसाट व जानराव अवघड यांना इंडियन मेडिकल असोसिएशनद्वारे सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी, जिल्ह्यातील सर्वच नर्सिंग महाविद्यालयाचे प्रशिक्षणार्थी तसेच मनपा कार्यक्षेत्रातील आशाताई मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पालखी मार्गाची आ. खंडेलवाल आणि मनपा आयुक्तांनी केली पाहणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** श्री संत गजानन महाराजांची पालखी पुढच्या आठवड्यात श्री राजराजेश्वर नगरीत येणार आहे. त्यादृष्टीने शुक्रवारी सकाळी आमदार वसंत खंडेलवाल, मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने, संबंधित अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी या सर्वांनी संयुक्तपणे महानगर हद्दीतील पालखी मार्गाची पाहणी केली. संपूर्ण पालखी मार्गावर भक्तांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देश याप्रसंगी आमदार खंडेलवाल यांनी दिले.

रस्त्याच्या कडेला असणारे अतिक्रमण काढून टाकण्यात यावे, अशा सूचनाही त्यांनी याप्रसंगी केल्या. यावेळी माजी नगरसेवक सतीश ढगे, विलास शेळके, शशी चोपडे, मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने व संबंधित अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

श्रींच्या पालखीचे महानगराच्या हद्दीत आगमन झाल्यानंतर पहिला विश्राम ज्या ठिकाणी आहे अशा जुने शहरातील भिकमचंद खंडेलवाल महाविद्यालयात एक बैठक घेऊन एकूणच व्यवस्थेचा आमदार खंडेलवाल यांनी आढावा घेतला. श्रींचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या दर्शनार्थींची कोणतीही गैरसोय होणार नाही, महानगराच्या हद्दीत असणाऱ्या पालखी मार्गात कोणताही अडथळा राहणार नाही, यांसह विविध बाबींचा आढावा याप्रसंगी घेण्यात आला.



# माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. सुचिता पाटेकर यांची बदली

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. सुचिता पाटेकर यांची पुणे जिल्हा परिषदेत शिक्षणाधिकारी योजना या पदावर बदली करण्यात आली आहे. महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) मधील अधिकाऱ्यांच्या नियतकालीक बदल्या करण्याचे आदेश शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिले आहेत. त्यानुसार राज्यातील २६ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये अकोल्याच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. सुचिता पाटेकर यांची पुणे जिल्हा परिषदेत शिक्षणाधिकारी योजना या पदावर बदली करण्यात आली असून, त्यांच्या बदलीमुळे रिक्त पदावर अद्याप कोणत्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त शनिवार (ता.३१) अकोला शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त जन्मोत्सव समितीच्या वतीने स्वराज्य भवन येथील प्रमिलाताई ओक हॉलमध्ये दुपारी ४ वाजता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यानंतर सायंकाळी ५.३० वाजता शहरातील प्रमुख मार्गावरून शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याचा गौरव करणारे पथनाट्य, पारंपरिक ढोल-ताशांचे पथक, पिवळे ध्वज, जय बजरंग आखाडा-आळंदा यांसह इतर आकर्षणे सहभागी झाली होती. या शोभायात्रेत धनगर समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा अकोला जिल्हा परिषदेचे माजी गटनेचे ज्ञानेश्वर सुलताने, माजी महापौर सुमन गावंडे, माजी समाजकल्याण सभापती बळीराम चिकटे, धनगर समाजाचे ज्येष्ठ नेते काशिराम साबळे, धनगर समाज युवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोपाल कोल्हे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक केशवराव पातोंड, माजी नगरसेविका पुष्पा गुलवाडे, जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष गोपाल गावंडे, जिल्हा परिषद सदस्य प्रमोदिनी कोल्हे, वंचितचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, महासचिव मिलिंद इंगळे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राम गव्हाणकर,गजानन गवई, विकास सदांशिव, दीपक पातोंड, सुरेश दिवनाले, विनोद काळे, नितीन कोगदे, किशोर कोल्हे, मनोज करणकार, अरुण वाघमारे, स्वप्नील साबळे, माणिकराव गुलवाडे, अंबादास नागे, ज्ञानेश्वर कवडकार, विशाल दिवनाले, शंकरराव खराटे, सचिन बचे, अभिषेक नवलकार, विक्की लाखे, रुषीकेश पातोंड, महादेव लहाळे, दिलीप काळे, यशवंत नागे, कैलास बचे, मनोहर बाहे, राजेश सोनाग्रे, विनोद वैदकार, सचिन लाखे, श्रीकांत चिकटे, अनंत खराटे, सुभाष कळम, गोपाल धुले, किशोर भोंगे, शांताराम लोणाग्रे, सुनील पंडित, शंकरराव भदे, विकास पाटील देवकते, बाळासाहेब खराटे, सुनील दिवनाले, वासुदेव पुंडे, योगेश गावंडे, सचिन नागे, संजीव नागे, रामकृष्ण बाजोड, विजय बोरसे, हरिष काळंके, सतीष उभे, राहुल रोकडे, समाधान सोर, नरहरी बोरसे, नीळकंठ पाचपोहे, गणेश चिंचोळकार, शंकर पारेकर, प्रमोद करणकार, किशोर पुंडे आदी पदाधिकारी व समाजबांधव सहभागी झाले होते.



# प्रलोभने देऊन पळविले जाताहेत मनपा शाळांचे विद्यार्थी

## महापालिकेच्या शाळा प्रगती करीत असल्याचा परिणाम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** महापालिकेच्या शाळाही आता चमकू लागल्या आहेत. शिक्षकांच्या पुढाकाराने बहुतांश महापालिकेच्या शाळा विविध स्तरांवर उत्तम कामगिरी करीत आहेत. खासगी शाळांच्या तुलनेत महापालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी सोयी -सुविधा उपलब्ध नसल्या तरी शिक्षणात मात्र महापालिकेच्या शाळा पुढे जात असल्याचे दिसून येत आहे. ऐन शाळा प्रवेशाचे दिवस असताना खासगी शाळेतील शिक्षक सर्वसामान्य पालकांना पैशाचे आमिष दाखवून महापालिका शाळेतील विद्यार्थी पळवीत असल्याचे समोर आले आहे.




### मनपा शाळांची चमकदार कामगिरी

महापालिकेच्या काही शाळा शिक्षणासोबतच इतर ॲक्टिव्हिटीसुद्धा विद्यार्थ्यांकडून करून घेत आहेत. शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी लक्षणीय यश मिळविले असून, शाळा राज्यस्तरावर चमकल्या आहेत. विद्यार्थी संख्या कशी वाढेल, यासाठी काही मुख्याध्यापक व शिक्षक कसोशीने प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे महापालिका शाळा खासगी शाळांच्या तुलनेत सोयी–सुविधा कमी असतानाही स्पर्धा करीत आहेत.

### किल्ला लढवून सुरू आहेत शाळा

महापालिका शाळा नंबर ४ (माता नगर), शाळा नंबर ७, ९ (काळा मारोती, जुने शहर), १२ (नायगाव), १४, १६, १९, २२ (कृषी नगर), २६ या शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी किल्ला लढवून शाळा टिकवून ठेवल्या आहेत. मनपा शाळेतील विद्यार्थी खासगी शाळांमध्ये पळवून नेण्यासाठी पालकांना सायकल देण्याचे तसेच ऑटो लावून देण्याचे प्रलोभने दाखविली जातात.

शिक्षण हा अधिकार असून, त्यापासून कुणालाही हिरावून घेतले जाऊ नये; मात्र शासनाच्या धोरणामुळे या उद्देशाला हरताळ फासली जात आहे. परिणामी, महापालिका शाळांची संख्या घटत चालली आहे. सर्वसामान्यांना शिक्षण देणाऱ्या महापालिकेच्या शाळांची संख्या ३२ वर आली आहे. शासनाच्या धोरणाचा फटका मोठ्या प्रमाणात महापालिका शाळांना बसला असून, वाट्टेल त्याला शाळा देण्याचा शासनाचा निर्णय खासगी शाळांच्या पथ्यावर पडत आहे.

दीड किमीच्या आत दुसऱ्या शाळेला मान्यता मिळणार नाही, हा नियम स्वतःच मोडून शिक्षण विभागाने खिरापत वाटण्या इतपत शाळांना मान्यता दिल्या आहेत. त्यामुळे पालकांना प्रलोभने देऊन महापालिकेच्या शाळातून विद्यार्थी पळविण्याचे प्रकार होत असून, शाळा टिकवून ठेवण्यासाठी शिक्षक वर्ग आजूबाजूचे परिसर पिंजून काढत विद्यार्थी शोधत असल्याचे चित्र आहे. शाळा सुरू होऊनही आपले विद्यार्थी दुसऱ्या शाळेत जाऊ नये, यासाठी शिक्षक वर्ग डोळ्यात तेल घालून काम करीत असल्याचे वास्तव आहे. महापालिकेच्या शाळा बंद होऊ नये म्हणून महापालिका शिक्षणाधिकारी शाहीन सुलताना व शिक्षक वर्ग कसोशीने प्रयत्न करीत आहे. सर्वसामान्यांचा आधार असलेल्या महापालिकेच्या शाळा आणखी विकसित करण्याची गरज आहे.




## थोडक्यात

### जिल्हाधिकारी कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



**खामगाव :** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. नायब तहसीलदार संजय बंगाळे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनीही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड यांचा जिल्हा दौरा

**बुलडाणा :** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड हे रविवारी दि. १ जून २०२५ रोजी मेहकर, जि. बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार यवतमाळ येथून सकाळी १०.३० वाजता शासकीय निवासस्थान मेहकर जि. बुलढाणा येथे आगमन व राखीव. सकाळी ११ वाजता शासकीय निवासस्थान, मेहकर येथून ता. माजलगाव जि. बिडकडे प्रयाण करतील.

### पुरात वाहून गेलेल्या शेतकऱ्याचा मृतदेह मिळाला

**खामगाव :** गेल्या तिन दिवसापूर्वी गावानजिकच्या नाल्याला आलेल्या पुरात दुचाकीसह शेतकरी चुलते पुतणे वाहून गेले होते. यामध्ये पुतण्या बचावला होता. तर काकाचा शोध लागला नव्हता. ३० मे रोजी सदर वृध्द शेतकऱ्याचे (काका) प्रेत घारोड शिवारातील तलावानजीक आढळून आले आहे. सदर प्रेत हिवरखेड पोलिसांनी घटनास्थळी जाऊन ताब्यात घेतले आहे. घारोड येथील धोडूंजी भगवान इंगळे व त्यांचा पुतण्या राहूल इंगळे हे २७ मे रोजी उमरा शिवारातील आपली शेती नांगरटीसाठी गेले होते. नांगरटी आटोपून रात्री आठ वाजता दुचाकीने घरी परत येत असतांना घारोड - अकोली या नाल्याला आलेला पूर पार करतांना हे चुलते पुतणे वाहून गेले होते. परंतु पुतण्या राहूल याला पोहणे असल्यामुळे तो बचावला होता. तर काका धोंडूजी इंगळे यांचा शोध घेणे सुरू असतांना तिन दिवसानंतर ३० मे रोजी त्यांचे प्रेत उपरोक्त ठिकाणी आढळून आले आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १४०० –१९७५ |
| गहू | २२००– २५०० |
| मक्का | १७९५ – १९५० |
| उडीद | ५५०० – ६७०० |
| मूंग | ६५०० – ६७५० |
| तुर | ६०००– ६८५० |
| हरभरा | ४५५० – ५४७५ |
| भुईमुग | ४५०० – ५६०० |
| सोयाबीन | ३१७५ – ४३७५ |
| तीळ | ७८००–४८०० |
| बाजरी | १४५०–१४५० |
| मलाईचना | ५४००–७६०० |

# भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतून मिळवा १०० टक्के अनुदान

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**बुलडाणा , दि.३१**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना शाश्वत शेती आणि आर्थिक उन्नतीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना यांच्या समन्वयातून फळबाग लागवडीला चालना दिली जात आहे.

या योजनांद्वारे शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदान, तांत्रिक मार्गदर्शन, आणि दर्जेदार रोपे उपलब्ध करून दिली जातात. या योजनेचा उद्देश शेतकऱ्यांना पारंपरिक शेतीऐवजी फळबाग लागवडीकडे वळवणे, प्रक्रिया उद्योगांसाठी कच्चा माल उपलब्ध करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हा आहे. चला, या योजनेची सविस्तर माहिती आणि अर्ज प्रक्रिया जाणून घेऊया.

योजनेचा उद्देश आणि वैशिष्ट्ये भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना २०१८-१९ पासून महाराष्ट्रात राबवली जात आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना दीर्घकालीन आर्थिक लाभ मिळवून देणे आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे हा आहे. यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्चात जास्त नफा मिळवता येतो आणि पाण्याचा कार्यक्षम वापरही शक्य होतो. योजनेंतर्गत आंबा, काजू, पेरू, डाळींब, संत्रा, मोसंबी, चिकू, कोकम, आवळा, जांभूळ, नारळ, अंजीर, चिंच, सफरचंद, कागदी लिंबू आणि फणस अशा १६ बारमाही फळपिकांचा समावेश आहे.



१०० टक्के अनुदान: खड्डे खोदणे, रोपे लावणे, पीक संरक्षण, आणि खतांचा खर्च सरकार उचलते. तांत्रिक मार्गदर्शन: शेतकऱ्यांना फळबाग व्यवस्थापन आणि उत्पादनवाढीसाठी प्रशिक्षण दिले जाते. ठिबक सिंचन अनिवार्य: कोकण विभाग वगळता सर्व ठिकाणी ठिबक सिंचन संच बसवणे बंधनकारक आहे. प्रक्रिया उद्योगांना चालना: फळबाग लागवडीमुळे प्रक्रिया उद्योगांसाठी कच्चा माल उपलब्ध होतो, ज्यामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठ मिळते.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना खालील निकष पूर्ण करावे शेतकऱ्याच्या नावे ७/१२ उतारा असणे आवश्यक आहे. संयुक्त खातेदार असल्यास सर्व खातेदारांचे संमतीपत्र किंवा कुळ कायद्याखालील जमिनींसाठी कुळांचे संमतीपत्र आवश्यक आहे. **क्षेत्र मर्यादा:कोकण विभाग:** किमान ०.१० हेक्टर आणि कमाल १० हेक्टर. उर्वरित महाराष्ट्र: किमान 0.२० हेक्टर आणि कमाल ६ हेक्टर. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना प्रथम त्या योजनेचा लाभ घ्यावा लागेल. उर्वरित क्षेत्रासाठी भाऊसाहेब फुंडकर योजनेचा लाभ घेता येईल.

फळझाडांचे जीवित प्रमाण: पहिल्या वर्षी किमान ८० टक्के आणि दुसऱ्या वर्षी ९० टक्के झाडे जिवंत असणे आवश्यक आहे. प्राधान्य: अल्प व अत्याल्प भूधारक, अनुसूचित जाती/जमाती, महिला, आणि दिव्यांग शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाते. लॉटरी पद्धत: लाभार्थ्यांची निवड तालुकानिहाय लॉटरीद्वारे केली जाते.

अनुदानाची रचना

योजनेंतर्गत १०० टक्के अनुदान तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने दिले जाते: पहिल्या वर्षी: ५० टक्के अनुदान. दुसऱ्या वर्षी: ३० टक्के अनुदान. तिसऱ्या वर्षी: २० टक्के अनुदान. हे अनुदान खड्डे खोदणे, रोपे लावणे, ठिबक सिंचन, पीक संरक्षण, आणि नांग्या भरणे यांसारख्या कामांसाठी वापरले जाते. २०२३ पासून योजनेत ठिबक सिंचनाऐवजी सर्व प्रकारच्या खतांसाठी १०० टक्के अनुदान देण्याची तरतूद आहे. अनुदानाची रक्कम थेट आधार-लिंक्ड बँक खात्याात डीबीटीद्वारे जमा केली जाते.

पहिल्या वर्षी फळबागेची नोंद ७/१२ उताऱ्यावर न झाल्यास ५० टक्के अनुदान मिळते, तर दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षीचे अनुदान फळपिकाची नोंद झाल्यावरच मिळते. अर्ज प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रे शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टल वर ऑनलाइन अर्ज करावा लागतो. नोंदणी आणि लॉगिन: महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करून आधार क्रमांकाचे प्रमाणीकरण करावे लागते. ही प्रक्रिया एकदाच करावी लागते.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**लाखनवाडा दि.३१**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात व शांततेत साजरी करण्यात आली राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारका पासून वाजत गाजत व महापुरुषांच्या नामाच्या जयघोषात अहिल्यादेवीच्या पुतळ्याची गावातुन शोभायात्रा काढण्यात आली.

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समिती पदाधिकारी शंकर पारखे, अध्यक्ष संदिप सुळ, उपाध्यक्ष विठ्ठल हटकर, सचिव बबन हटकर, सदस्य अनिल मार्कंड सदस्य रामदास सावळे सदस्य नवनित सोनाळकर, सदस्य गजानन हटकर, सदस्य तसेच धनगर समाज बांधवा तर्फे आयोजीत करण्यात आलेल्या ह्या शोभायात्रेत विविध जाती धर्माचे लोक सहभागी झाले होते शोभायात्रा सुरू झाली असता बसथांबा हनुमान मंदिर ग्रामपंचायत कार्यालय शिवजी चौक व त्याच मार्गाने परत येऊन राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकाच्या प्रांगणात शोभायात्रेचा समारोप करण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालया समोर शोभायात्रा आली असता ग्रामपंचायत तर्फे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे पूजन करून हारार्पण करण्यात आले.

याप्रसंगी सरपंच सुरेखा विलास पांढरे उपसरपंच प्रल्हाद हटकर,शिवाजीराव पाटील,अजिमखान , विलास पांढरे , आबिदखान माजी सरपंच शेख अफरोज विजय रायगावकर संताराम तायडे ग्रामपंचायत कर्मचारी सिध्दार्थ इंगळे रामकृष्ण इंगळे संजय वानखेडे त्रयबक वसतकार इत्यादींनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे पूजन करून हारार्पण केले शोभायात्रा अगदी शांततेत व उत्साहात साजरी करण्यात आली.



लाखनवाडा येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त गोपाल मार्कंड यांनी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले तर प्लॅनेट स्कूल जुनियर कॉलेज तर्फे डॉ सतीश खडसे यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला आपण करून अभिवादन केले. जिल्हा परिषद हायस्कूल लाखनवाडा तर्फे पी एल पांढरे मास ने मॅडम मंगेश मसने सुमित वाकोडे निवृत्ती बोचरे इत्यादी मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प माला अर्पण करून अभिवादन केले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
अंढेरा **दि.३१**

स्थानिक अंढेरा येथील वार्ड क्रमांक २ मधील अहिल्यादेवी होळकर नगरात गावातील सर्व समाजिक महिला व पुरुष मंडळींनी एकत्र येत मोठ्या उत्साहात पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सर्व प्रथम महिला मंडळ यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करण्यात आले. नंतर सर्वांच्या वतीने पुजन करुन भंडारा लावत येळकोट येळकोट जय मल्हार अशा घोषणा देत मोठ्या थाटात व उत्साहात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती मोठ्या उतसाहात साजरी करण्यात आली. यावेळी देवी अहिल्याबाई होळकर ह्या उचित ज्ञानदानासाठी प्रसिद्ध होत्याा. त्यांनी भारतभर अनेक हिंदू मंदिरे, नदी घाट बांधले, एवढेच नाही तर लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखतं, प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्याांनी जीर्णोद्धार केला. माहेश्वर व इंदूर या शहरानां सुंदर बनवले. असे मनोगत यावेळी मा.सरपंच संतोष नागरे यांनी व्यक्त केले. यावेळी भगवान बनसोडे,मोतीराम दधरे, सुभाष सानप सर,बद्री मुंढे, पत्रकार राधेश्याम ढाकणे,गजानन बनसोडे,रावसाहेब देशमुख ,विष्णू बनसोडे,रामेश्वर बनसोडे,बद्री मुंढे,कृष्णा बनसोडे,अनंथा ताठे,संदीप गुंठे,सचिन सानप,रामु राठोड,मदन बनसोडे ,ओम मानवतकर,गणेश वाघ,अमोल वैद्य पत्रकार ज्ञानेश्वर म्हस्के उपस्थित होते.तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मित्र मंडळ व भगवान बाबा मित्र मंडळाचे पदाधिकारी हजर होते.



## पीयूष वानखडे याचे बारावी व जेईई परीक्षेत विक्रमी यश

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**खामगाव दि.३१**

फेब्रुवारी- मार्च २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळातर्फे आयोजित करण्यात आलेल्या व विद्यार्थी जीवनामध्ये अत्यंत महत्वाची मानल्या जाणाऱ्या उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता बारावीचा निकाल अलीकडेच ५ मे २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य मंडळातर्फे जाहीर करण्यात आला आहे. गुंजकर कॉमर्स अँड सायन्स कॉलेज आवार खामगाव येथील पियुष गजानन वानखडे या विद्यार्थ्याने इयत्ता बारावीत विज्ञान शाखेत ८५ टक्के गुण संपादन करून उत्कृष्ट यशाची परंपरा कायम राखली आहे.

त्याबद्दल पियुष चे सर्वत्र अभिनंदन होत आहे. तर दुसऱ्या बाजूला यावर्षी पार पडलेल्या जेईई परीक्षेत सुद्धा पियुष ने ९७.३०% प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले आहे. ह्या यशामुळे अभियांत्रिकी शिक्षणातील त्याचा शैक्षणिक प्रवास आता सोयीचा व सुखकर झाला आहे. या दुहेरी यशामुळे गुंजकर सायन्स कॉलेज खामगाव तर्फे काल पीयूष व त्याच्या परिवाराचा खामगाव येथे जाहीर सत्कार करण्यात आला. पीयूष चे आई वडील सौ. नितल वानखडे व गजानन वानखडे हे पदवीधर शिक्षक असून सातत्यपूर्ण अभ्यास व परिश्रमामुळे हे यश शक्य झाले असल्याचे ते सांगतात. आपल्या या शैक्षणिक यशाचे श्रेय पीयूष ने गुंजकर कॉमर्स अँड सायन्स कॉलेज खामगाव चे प्रेसिडेंट प्रा.रामकृष्ण गुंजकर सर सचिव प्राध्यापिका सौ सुरेखा गुंजकर, शिक्षक वृंद, तथा आई-वडील, आजी आजोबा यांना दिले आहे.




## वीज पडल्याने म्हैस जागीच ठार

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**साखरखेर्डा दि.३१**

साखरखेर्डा आणि परिसरात मान्सून पूर्व अवकाळी पावसाचा कहर सुरूच असून आता हा पाऊस नुकसान पातळीवर पोहोचला आहे .मागील सप्ताहात दररोज मुसळधार पाऊस कोसळत असून ता.२७ रोजी दुपारच्या सुमारास ढगांचा गडगडाट व विजांच्या कडकडाटासह आलेल्या पावसात उमणगाव शिवारात विज कोसळून शेतकऱ्यांची म्हैस जागीच ठार झाली आहे.शेतकऱ्याचे सव्वा लाखाचे नुकसान झाले आहे .

मे हा उन्हाळी मोसमात मोडतो.पावसाळा हा जून ते सप्टेंबर या चार महिन्यांचा ऋतू मानला जातो . परंतु यावर्षी चे हवामान सर्वत्रच बदलेल्या चे दिसून येत असून पावसाळा हा मे महिना पकडून पाच महिन्याचा झाला की काय असे वाटू लागले आहे . साखरखेर्डा परिसर त्याचबरोबर संपूर्ण सिंदखेडराजा तालुक्यामध्ये में मध्येच अवकाळी पावसाचा कहर बघायला मिळत आहे. वादळी वारा पाऊस त्याचबरोबर विजांचा कडकडाट यामुळे जनजीवन विस्कळीत झाली होते. या पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे मशागतीचे कामात अडथळा येत असल्याने शेती मशागतीची कामे रखडली आहेत. अस्मानी संकटाबरोबरच शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे.शेतकरी जोड व्यवसाय म्हणून दूध व्यवसाय करण्यासाठी गाई ,म्हशी आदी दुधाळ जनावरे सुद्धा पाळत असतो .या जनावरांची देखभाल करण्यासाठी शेतकरी मोठा खर्च करीत असतो .परंतु अस्मानी संकटामुळे कधीकधी शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागते . ता.२७ मे रोजी दुपारी २.३० वाजे दरम्यान सिंदखेडराजा तालुक्यातील उमनगाव येथील शेतकरी अरुण रामकृष्ण गायकी यांच्या शेतामध्ये बांधलेल्या म्हशीवर वीज पडल्यामुळे गाभण असलेली म्हैस जागीच ठार झाली.सदर घटनेची माहिती तलाठी आनंद राजपूत यांना मिळताच घटनास्थळी दाखल होऊन घटनेचा पंचनामा केला. म्हैस पाच वर्षाचे होती. या घटनेमुळे शेतकऱ्यावर दुहेरी संकट ओढावले आहे.म्हशीचे अंदाजे किंमत सव्वा लाख रुपये होती.

यावेळी उमनगावचे सरपंच भिमराव खिल्लारे ,अजय साळवे, शेषराव काळे, ज्ञानेश्वर काळे, प्रताप खडसे यांच्यासह इतर शेतकरी उपस्थित होते . त्याामुळे शेतकरी अरुण गायकी यांना शासनाने त्वरित नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे .

## स्वच्छ व सुंदर बसस्थानक सर्वेक्षण अभियान



**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**खामगाव दि.३१**

हिंदू हृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे, स्वच्छ व सुंदर बस स्थानक अभियाना अंतर्गत ३० मे रोजी पुणे प्रादेशिक व्यवस्थापन अधिकारी सौ. ताम्हणकर मॅडम व पुणे प्रादेशिक सांख्यिकी अधिकारीगाढवे सर यांच्या उपस्थितीत गठीत समितीच्या वतीने खामगाव या अ वर्ग बस स्थानकाचे सर्वेक्षण करण्यात आले.

स्थानिक पातळीवरील विभागीय अभियंता नाईक , आगार व्यवस्थापकआकोत सर व स्थानक प्रमुख सौ. तांबटकर व स.वा.नी.सौ. तिजारे मॅडम, तथा लेखाकर.ठाकरे सर यांची उपस्थिती होती. यावेळी सर्वप्रथम बस स्थानकाची संपूर्ण पाहणी करून व्यवस्थापन,स्वच्छता व विविध कामांचा आढावा घेण्यात आला, तसेच ही पाहणी करून बस स्थानकाच्या विविध विभागांचे मूल्यांकन करून, विविध विभागात झालेल्या कामांचा मापदंड, करीत गुण विभागणी करण्यात आली. सदर अभियान स १० ते १२ यादरम्यान राबविण्यात आलेअसून खामगाव बस स्थानकातील संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांना विविध सूचना व संकल्पना देण्यात आल्या, व प्रवाशांना अधिकाधिक सुविधा कशाप्रकारे देण्यात येतील यावर सखोल चर्चा करण्यात आली.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक भेटीला ९६ वर्ष पूर्ण

### अस्पृश्यांसाठी खुली केली होती आठवडी बाजार येथील विहीर; दोन दिवसांचा मुक्काम

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**संग्रामपूर दि.३१**

घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह १९२७ मध्ये केला होता महाड येथील चवदार तळ्याचे पाणी सर्वासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी खुले केले होते. यानंतर दोन वर्षा नंतर २९ मे १९२९ रोजी पातुर्डा नगरिला डॉ बाबासाहेबांचे पदस्पर्श झाले येथील आठवडी बाजार स्थित विहिर सर्वांसाठी खुली करुन इतिहास घडविला होता मध्य प्रांत व वऱ्हाड मध्ये अस्पृष्य परिषदेसाठी आलेले डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृष्यांसाठी विहिर पाणी पिण्यासाठी खुली केली होती परिषदेसाठी आलेले बाबासाहेबांचा मुक्काम दोन दिवस पातुर्डा येथील जि प मुलांच्या शाळेच्या खोलीत होता.

या ऐतिहासिक क्षणाच्या आठवणी आजही ताज्या आहेत पदस्पर्श स्मृती सोहळ्यात हजेरी लावणारे पातुर्डा परिसरातील खेडे गाव सह विदर्भातील अनुयायी विहिर व जि प मुलाच्या शाळेची मुक्काम केलेली खोली या ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन नतमस्तक होतात अभिवादन करतात. यावेळी पातुर्डा नगरिला यात्रेचे स्वरूप येते. साला बाद प्रमाणे यावर्षीही डॉ बाबासाहेब आंबेडकर पदस्पर्श पावनभूमी उत्सव समिती व पातुर्डा ग्रा पं यांच्या संयुक्त विदमाने आयोजीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा ९६ वा पदस्पर्श सोहळा उत्सव मोठ्या थाटात पातुर्डा ग्रामस्थांच्या सहकार्याने साजरा करण्यात आला. बहिष्कृत परिषदचे कार्यकर्ते बकक्षुराम दाभाडे यांची मुलगी कौतिकाबाई च्या विवाहाचे निमंत्रण देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कडे गेले होते लग्नाच्या वेळी अस्पृष्य परिषद घेण्याची गळघातली होती त्यामुळे २९ मे व ३० मे रोजी दोन दिवशीय अस्पृष्य परिषदचे आयोजन करण्यात आले होत. यादरम्यान आठवडी बाजार येथील विहिरी वरून अस्पृष्यांना पिण्याचे पाणी भरण्यास मनाई होती व पाणी दिले जात नव्हते बाबासाहेबांना सदर विहीर दाखविण्यात आली स्वता बाबासाहेबांनी या विहीरीतुन पाणी काढून उपस्थितांना पाणी पाजले होते तेव्हा पासुन हि विहिर खुली करण्यात आली आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत बकक्षीराम दाभाडे यांची कन्या कौतिकाबाई व सखाराम इंगळे यांचा विवाह आदर्श पध्दतीने लावण्यात आला होता पातुर्डा येथे दोन दिवसांच्या मुक्कामाच्या वेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत रायभान इंगळे केशवराव खंडारे , रा पी मटकर , सोनोने , मके , संभाजी जाधव उपस्थित होते सर्व ग्रा पं सदस्य यांच्या हस्ते एतिहासिक विहिर व डॉ बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले उपस्थितांनी बाबासाहेबांच्या पदस्पर्श व भेटीच्या आठवणी जागवल्या यावेळी डॉ बाबा साहेब आंबेडकर पदस्पर्श समिती अध्यक्ष कैलास दाभाडे , रमेश दाभाडे , ग्रा पं सदस्य सिध्दार्थ गाडे , दिनेश वानखडे , निलेश चांडक , गणेश सुबेदार , साजीद शाह , राजेश सातव , वैभव धर्माळ , प्रशांत अढाव ,सदस्या शोभाताई कृष्णराव राहाटे ,छाया संजय दाभाडे , सुमन तायडे , नर्मदा पुंडे , अरुणा अढाव , प्राजक्ता गवई , गोकर्णाबाई शेकोकार , श्रीमती अनुसया किसन बावस्कार, सह पातुर्डा ग्रामस्थळ उपस्थित होते.



अजिंक्य भारत

आपलं बुलडाणा

बुलडाणा, रविवार दि.१ जुन २०२५ www.ajinkyabharat.com



## थोडक्यात

### वाहन परीक्षक अतुलसिंह राजपूत यांना सेवानिवृत्ती निरोप समारंभ



**मलकापूर :** महाराष्ट्र राज्य परिवहन मार्ग महामंडळात मलकापूर आगारातील वाहन परीक्षक अतुलसिंह जयसिंह राजपूत यांनी २७ वर्षे विना अपघात सेवा दिली. आज दि. ३१ मे रोजी ते सेवानिवृत्त झाले. आज शनिवार रोजी मलकापूर आगारात छोटेखानी कार्यक्रमात त्यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सहाय्यक अधीक्षक चोपडे, आव्हाड, सातव, वरिष्ठ लिपिक प्रधान मॅडम,लेखा अधिकारी चौधरी, शिवसिंग राजपूत, जयकुमार राजपूत, इंगळे, प्रमोद अहेर, सतीश पाटील, वाहतूक निरीक्षक समीर देशमुख, विनोद रवनकार, जयसिंग राठोड,विजय पवार,चालक,वाहक व यांत्रिक कर्मचारी उपस्थित होते.

### घराचे कुलूप तोडून ७४ हजाराचा मुद्देमाल लंपास

खामगाव : घराच्या गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन रोख रक्कम व चांदीच्या दोन मुर्त्या तसेच चांदीच्या पाणी पिण्याचे भांडे असा एकूण ७४ हजार रुपयाचा मुद्देमाल चोरुन नेल्याची घटना ३० मे च्या १०.३० ते ७.३० वाजेदरम्यान घडली. ओमकार अरविंद साने (३५) रा. प्लॉट नं.७४/१ सरस्वती नगर पाण्याच्या टाकीजवळ घाटपुरी रोड खामगाव यांनी शिवाजी नगर पोस्टेला तक्रार दिली की कोणीतरी अज्ञात चोरट्याने मी राहात असलेल्या घराच्या गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन बेडरुम मधील गोदरेज लोखंडी कपाट उघडून कपाटामधील रोख रक्कम ४० हजार रुपये तसेच चांदीचे पाणी पिण्याचे भांडे व दोन चांदीच्या मुर्त्या एकूण ७४ हजाराचा मुद्देमाल कोणीतरी चोरुन नेला. शिवाजी नगर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३०५ (अ), ३३१ (३) भान्यास नुसार गुन्हा दाखल केला आहे. तपास पोहेकाँ संदीप टाकसाळ करीत आहे.

### चोरीची रेती घेवून जाणारा ट्रक पकडला

**खामगाव :** ट्रकमध्ये अवैधरित्या रेती चोरुन घेवून जाणाऱ्या ट्रकला शिवाजी नगर पोलिसांनी पकडून चालकाविरुध्द गुन्हा दाखल केला असून ८ हजार रुपये किंमतीची रेती जप्त केली आहे. शिवाजी नगर पोस्टेचे पीएसआय संजय उदासी यांनी तक्रार दिली की आरोपी श्रीकांत दयाराम सावळे ट्रकचालक (३०) रा. मिलींद नगर नागझरी रोड तीन पुतळे शेगाव हा वराडे चौकात ३० मेच्या रात्री १२.३० वाजता त्याच्या ताब्यातील ट्रकमध्ये दोन ब्रास रेती अवैधरित्या किंमत ८ हजार रुपयाचा माल चोरुन घेवून जात असताना मिळून आला. आरोपी श्रीकांत सावळे विरुध्द शिवाजी नगर पोलिसांनी कलम ३०३ (२) भान्यास नुसार गुन्हा दाखल केला. तपास पोहेकाँ संदीप टाकसाळ करीत आहे.

### चोरीच्या दोन दुचाकी जप्त

**शेगाव :** शहर पोस्टच्या डीबी पथकाने तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्या जवळून चोरीस गेलेल्या दोन दुचाकी जप्त केल्या आहेत. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी २९ मे रोजी अकोला व अकोट येथे जाऊन शेख जफर शेख गफार (२६), शेख उमर फुरकान अब्दुल सलाम (२३) व फैजल खान युसुफ खान (२४) तिन्ही रा. अकोला यांना ताब्यात घेऊन त्यांच्या जवळून चोरीच्या दोन मोटरसायकली जप्त केल्या आहेत. यातील अकोला येथून जप्त केलेल्या दुचाकी खामगाव येथील बारादरी भागातून ६ मार्च रोजी चोरीस गेली होती. लक्ष्मण मारुती कांबळे यांची ही दुचाकी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. तर एक विना नंबरची अकोट येथून जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई पोहेकाँ सागर भगत व पोकाँ अंकुश गुरुदेव यांनी केली.

# बियाणे, खते व किटकनाशके खरेदी करताना काळजी घ्यावी

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा , दि. ३१**

शेतीतून अधिकाधिक उत्पादनासाठी निविष्ठांची (बियाणे, खते व किटकनाशके) गुणवत्ता अत्यांत महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांनी निकृष्ट, भेसळयुक्त अथवा अनधिकृत उत्पादनांपासून बचाव करण्यासाठी बियाणे, खते व किटकनाशके खरेदी करताना काळजी घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.



बियाणे, खते व किटकनाशके फक्त अधिकृत विक्रेत्याकडूनच खरेदी करावे. दर्जा व गुणवत्ता हमीसाठी सरकारने मान्यता दिलेल्या विक्रेत्यांकडूनच निविष्ठा खरेदी कराव्यात, खरेदीची पावती घेणे आवश्यक असून विना पावती खरेदी केल्यास तक्रार करण्याचा हक्क नाकारला जाऊ शकतो म्हणून बियाण्याचे पाकिट सिलबंद, लेबलयुक्त व मोहरबंद असावे. पिशवी, टँग आणि पावती पिकाची कापणी होईपर्यंत जपून ठेवावी, बियाणे व किटकनाशके खरेदी करताना त्यांच्या वापरण्याच्या अंतीम मुदतीची खात्री करावी, किंमत व वजनात फसवणूक टाळा, छापील किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री अथवा कमी वजन दिल्यास त्वरित कृषि विभागाशी संपर्क साधावा. शंका आल्यास त्वरित तक्रार नोंदवा. कोणतीही तक्रार असल्यास तालुका कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी किंवा कृषि विभागाच्या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवावी. एच.टी.बी.टी./बीटी-३ चोर बियाण्यांपासून दूर राहा, अनधिकृत बीटी बियाणे खरेदी करू नये. शिफारस केलेल्या तणनाशकांचा वापर मान्यता प्राप्त बियाण्यांसाठीच शिफारस केली असल्यास तणनाशकांचा वापर करावा. भेसळ, बनावट उत्पादने असल्यास तसेच याबाबत अनधिकृत विक्रीबाबत माहिती मिळाल्यास शेतकऱ्यांनी कृषि विभागास तात्काळ कळवावे.

शेतकऱ्यांनी कृषी विभागाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केल्यास उत्पादनात वाढ होऊन आर्थिक नुकसान टाळता येईल. शेतीच्या सुरक्षिततेसाठी आणि शाश्वत शेतीसाठी शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

## अहिल्याबाई होळकर जयंती उत्साहात साजरी

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**शेगाव दि.३१**

समाजहिताच्या कार्याला सर्वोच्च मान देणाऱ्या, स्त्रीशक्तीचा आदर्श ठरलेल्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांची ३०० वी जयंती राज्यभर विविध ठिकाणी मोठ्या श्रद्धेने व उत्साहात साजरी करण्यात आली. त्यांनी आपल्या दूरदृष्टी, कार्यतत्परता आणि न्यायप्रिय नेतृत्वातून केवळ होळकर साम्राज्याचे नव्हे, तर भारतीय इतिहासाचे सुवर्णपाने लिहिली. त्यांचे कार्य आजही लोकहिताच्या मार्गदर्शनास दीपस्तंभ ठरते.

या पार्श्वभूमीवर शेगाव येथील एसटी बस स्थानक येथेही अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्सवात साजरी करण्यात आली. यावेळी शिवसेनेच्या आणि एसटी महामंडळाच्या विविध पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख श्री. रामा पाटील थारकर होते , पवन बरिंगे, आशिष पाटील मिरगे, गोपाल वर्षे, गजानन खंडेराव, मोहन लांजुळकर, महिला आघाडी तालुकाप्रमुख सौ. मयुरी पाटील व रूपाली निळे आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमात एसटी महामंडळातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

त्यामध्ये आगार व्यवस्थापक सौ. शुभांगी पवार मॅडम, वाहतूक निरीक्षक महेश पाटील, तसेच महेश बुरुंगले, अतुल वसत्कार, दीपक चिकटे, नरेंद्र खंडेराव, अमोल राठोड, योगेश मांडोकार, भास्कर गीते, पद्मानंद तराळे, श्रीकृष्ण पाचपोहे, संतोष दिवणाले, अनंत जुमडे, मोहन जुमळे, सुरेश फासे, संदीप सराग, मारुती नागे, अनिल करे, तसेच महिला कर्मचारी सौ. शितल लाखे व सौ. सरिता ढोले यांचा सहभाग उल्लेखनीय होता. तसेच खातखेड ग्रामपंचायत येथे सरपंच सौ. शितल रामा पाटील थारकर यांच्या प्रमुख उपस्थितीतही जयंती साजरी करण्यात आली. अशा प्रेरणादायी व्यक्तिमत्वाच्या स्मृतीदिनी त्यांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हेच खरे त्यांना वाहिलेले अभिवादन ठरेल.

## ग्राम विकास अधिकारी सतत गैरहजर राहत असल्याने नागरिकांना त्रास

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**शेंदुर्जन दि.३१**

येथील ग्रामपंचायतचे ग्राम विकास अधिकारी प्रकाश आढाव हे, ग्रामपंचायतला पंधरा दिवसातून एखादा फेरफटका मारताना दिसतात. हे साहेब दुपारी बारा ते एक वाजेच्या दरम्यान येतात याची माहिती काही संबंधित लोकांनाच असते .त्यामुळे कष्टकरी, कामकरी, व मजूर वर्गांना यांची भेट होत नाही. त्यामुळे मजूर वर्गाला आपली मजुरी बुडून ग्रामविकास अधिकारी प्रकाश आढाव यांची पंधरा-पंधरा दिवस वाट पहावी लागते.

ग्रामविकास अधिकारी हे अंदाजे जवळपास १५ ते २१ दिवसापासून रजेवर होते मात्र त्यांनी चार्ज कोणाकडे न दिल्याने, ग्रामपंचायत मजुरावर उपासमारीची वेळ आली आहे ,तर काही मजुरांना वेळेवर पैसे मिळत नसल्याने कंटाळून घरी राहणे पसंत केले आहे. बऱ्याच मजुरांनी व कर्मचाऱ्यांनी, खो ,दिल्यामुळे ग्रामस्थांना एक एक महिना पाणीपुरवठा होत नाही. गाव जला हनुमान बहार, अशी परिस्थिती ग्रामविकास अधिकारी यांची झालेली आहे. गावामध्ये तीन महिन्या अगोदर कचरा घंटागाडी सुरळीत सुरू होती मात्र तीन महिन्यापासून घंटागाडीच कचऱ्यात उभी आहे एकाच ठिकाणी गाडी उभी राहिल्याने या गाडीचे टायर व ही गाडी निकामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ग्रामपंचायतला टॅक्स भरण्याकरिता आलेल्या महिलाची कुचंबना''येथील काही महिला ग्रामपंचायतचा टॅक्स भरण्याकरता आल्या असताना ग्रामविकास अधिकारी हे हजर राहत नसल्याने तंनी मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी सांगितले ग्रामपंचायतला माझे येणे होत नाही, दयावया करून त्या महिला म्हणाल्या साहेब आम्ही बऱ्याच दिवसाच्या येथे चक्रा मारून राहिलो आहे आमची मजुरी बुडत आहे. त्यांनी उत्तर दिले आमच्या कर्मचाऱ्यांशी भेटून घ्या. याबाबतचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झालेला आहे.

तरी संबंधित अधिकाऱ्याने याची दखल घेऊन ग्रामविकास अधिकारी यांना नियमित हजर राहण्याची ताकद देण्यात यावी अन्यथा ग्रामस्थ उपोषण करण्याच्या मनस्थितीत आहे.

## महाराष्ट्र साहित्य परिषदेचा भा.रा.तांबे पुरस्कार अजीम नवाज राही यांना प्रदान

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**सिंदखेड राजा दि.३१**

महाराष्ट्र साहित्या परिषद पुणे तर्फे मराठी काव्यप्रांतात वस्तुनिष्ठ,प्रयोगशील योगदानाबद्दल दिला जाणारा प्रतिष्ठेचा,मानाचा भा रा तांबे पुरस्कार प्रख्यात मराठी कवी,नामवंत वक्ते,निवेदक अजीम नवाज राही यांना पुणे येथे भव्यदिव्त पुरस्कार सोहळ्यात प्रख्यात हिंदी लेखिका सवितासिंग यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला २६ में सकाळी १० वाजता पुणे शहरातल्या सुसज्ज, प्रशस्त एस एम जोशी सभागृहात संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्या परिषदेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध विचारवंत रावसाहेब कसबे होते,प्रमुख अतिथी म्हणून परिषदेच्या कार्यवाह प्रख्यात कवयत्री अंजली कुळकर्णी, कोषाध्यक्ष मिलींद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार आणि कार्याध्यक्ष विनोद जोशी प्रामुख्याने उपस्थित होते.

भास्कर रामचंद्र तांबे यांनी संस्कृत काव्याचे आणि नाटकांचे चिकित्सक अध्ययन



केले,इंग्रजी कवितांचे वाचनही त्यांचे दांडगे,भा रा तांबे यांची खासियत म्हणजे स्वतः च्या काव्याचे सादरीकरण करता,करता अनेक कवींच्या काव्याची चिकित्सा करत ते श्रोत्यांचा काव्यानंद द्विगुणित करत असत,भा रा तांबे यांचा मराठी भाषाभिमान शब्दातीत होता,त्यांनी कवितेतून सजीव भावभावनांची,वस्तुनिष्ठ जगण्याची अस्सल चित्रे रेखाटली,आपल्या लेखणीने मराठी कवितेला वस्तुनिष्ठ आयाम आणि रसाळ वाणीने श्रोत्यांचा श्रवणाचा आनंद द्विगुणित करणारे कवी,वक्ते,निवेदक अजीम नवाज राही यांना भा रा तांबे पुरस्कार प्रदान करून महाराष्ट्र साहित्य परिषदने अजीम नवाज राही यांच्या आशयघन शब्दयात्रेचा आणि वक्तृत्वाच्या श्रवणीय प्रवासाचा यथायोग्य सन्मान केला आहे, अजीम नवाज राही महाराष्ट्र राज्याच्या लेखणी आणि वाणी या दोन क्षेत्रातील महत्त्वाचं आणि वलयांकित नाव आहे व्यवहाराचा काळा घोडा,कल्लोळातला एकांत, वर्तमानाचा वतनदार, तळमळीचा तळ आणि प्रकाशनास सिद्ध झालेला वळीवाच्या वेळा या पाच सकस वस्तुनिष्ठ,गाजलेल्या कवितासंग्रहांचे ते धनी आहेत, अजीम नवाज राही यांना आजतागायत अमेरिकेतील फाउंडेशन,भारतातील केशव गोरे स्मारक ट्रस्ट मुंबई चा साहित्या प्रांतातील प्रतिष्ठेचा महाराष्ट्र फाउंडेशन साहित्या पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय लेखनाचा कवी केशवसुत पुरस्कार, विदर्भ साहित्य संघाचा शरदचंद्र मुक्तीबोध, नारायण सुर्वे पुरस्कार ,आपटे वाचन मंदिर इचलकरंजीचा इंदिरा संत पुरस्कार,शरद पवार ग्रंथ पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार, लोकमत समूहाचा लोकमत साहित्या पुरस्कार, भि ग रोहमारे पुरस्कार, शिवसेना नवरत पुरस्कार, मराठवाडा साहित्या परिषद पुरस्कार इत्यादी पुरस्कार मिळाले आहेत. इयत्ता १० वी , इयत्ता ११वी व महाराष्ट्राच्या ११ विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात अजीम नवाज राही यांच्या कवितांचा समावेश आहे,

## जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना पाणी कर व घर करात ५० % टक्के सवलत

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**दे.मही दि.३१**

यंदा जिल्हा परिषद शाळांच्या प्रथम शैक्षणिक सत्राला २३ जुनं २०२५ पासून सुरुवात होणार असून यासाठी शिक्षण विभाग सज्ज झाले आहे. गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत गुणवत्ता व दर्जेदार शिक्षण मिळत असले तरी शूटा -बूटाच्या नांदात पालकांचा कल खाजगी शाळाकडे जास्त प्रमाणात दिसून येत आहे. आपल्या गावातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्ता पूर्वक शिक्षण मिळावे व जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या मोठ्याप्रमाणात वाढावी यासाठी सरपंच ज्योत्सनाताई वसूदेव पाटील शिंगणे यांनी इयत्ता पहिली ते चौथी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना एका मालमत्ता करावर ग्रामपंचायत पाणी कर व घर करा मध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणार असल्याचा त्यांनी आज दि. ३० में २०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात सकाळी ११:०० वाजता मासिक सभेच्या मिटिंग मध्ये ठराव पारित करून निर्णय जाहीर केला. सरपंच शिंगणे यांच्या कौतुकास्पद निर्णयाचे सोशलमिडियावर स्वागत होत असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यावर्षी जिल्हा परिषद शिक्षण विभाग अलर्ट मोडवर असून विद्यार्थ्यांच्या पटसंख्या वाढीसाठी विविध उपाय योजना राबवत आहे.दि.१ जुनं ते ७ जुनं या आठवड्यात विद्यार्थ्यांच्या गृहभेटी घेणार असून त्याचबरोबर शाळेच्या पहिल्याच दिवशी प्रवेशोत्सव मोठया प्रमाणात साजरा करण्यात येणार आहे.

## भारतीय रेल्वेचा उपक्रम; ‘छत्रपती शिवाजी महाराज सर्किट’ विशेष ट्रेनचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.३१**

रेल्वे पर्यटन महामंडळाने (आयआरसीटीसी), ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा अनुभव देण्यासाठी ‘छत्रपती शिवाजी महाराज सर्किट’ या एका विशेष ट्रेनची घोषणा केली आहे. युवक, विद्यार्थी, इतिहासप्रेमी व नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

ही यात्रा भारत गौरव टुरिस्ट ट्रेन (भारत गौरव टुरिस्ट ट्रेन) अंतर्गत ९ जून रोजी मुंबई येथून सुरू होत आहे. या ५ दिवसांच्या विशेष टूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत. या सहलीद्वारे महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्व असलेल्या ठिकाणांचा पर्यटकांना अनुभव घेता येणार आहे.

ही केवळ एक यात्रा नसून, आपल्या वैभवशाली परंपरेचा, सांस्कृतिक वारशाचा आणि स्वाभिमानी इतिहासाचा साक्षात अनुभव घेण्याची सुवर्णसंधी आहे. भारतीय रेल्वे विभाग आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी ऐतिहासिक उपक्रमासाठी विविध अंगांनी सुसज्ज तयारी केली आहे. भारत गौरव ट्रेन ज्या-ज्या ठिकाणी पोहोचेल, त्या ठिकाणी असलेल्या पर्यटन स्थळांची सविस्तर माहिती पर्यटकांना देण्यात येणार आहे.

**सहल तपशील :** सहलीचे नाव: छत्रपती शिवाजी महाराज सर्किट शुभारंभ दि. ९ जून २०२५ कालावधी: ५ दिवसांची यात्रा (सकाळी समाप्ती) प्रारंभ व समाप्ती स्थान: छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी), मुंबई प्रवास सुरु व संपण्याचे स्थानकं: दादर, ठाणे यात्रेचा प्रवासमार्ग- मुंबई (सीएसएमटी) रायगड पुणे शिवनेरी भीमाशंकर प्रतापगड कोल्हापूर पन्हाळा मुंबई.

**पॅकेज मध्ये समाविष्ट सेवा:** भारत गौरव ट्रेनने प्रवास (एसएल/३एसी/२एसी/एसी/नॉन-एसी) हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था सर्व ठिकाणी स्थानिक वाहतूक व गाईड ऑनबोर्ड व ऑफबोर्ड शुद्ध शाकाहारी भोजन प्रवास विमा, सर्व प्रवेश शुल्क (किल्ले, मंदिरे, रोपवे, शिवसृष्टी इत्यादी), सुरक्षा व्यवस्था.

**दैनंदिन टूर कार्यक्रम (संक्षिप्त):** पहिला दिवस: मुंबई रायगड पुणे. दुसरा दिवस: पुणे (लाल महाल, शिवसृष्टी, कसबा गणपती). तिसरा दिवस: शिवनेरी भीमाशंकर पुणे. चौथा दिवस: प्रतापगड कोल्हापूर. पाचवा दिवस: कोल्हापूर महालक्ष्मी मंदिर पन्हाळा किल्ला मुंबई. सहावा दिवस: मुंबई (टूर समाप्त).अधिक माहितीसाठी भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाच्या (आयआरसीटीसी) वेबसाईट: अधिकृत संकेतस्थळाला भेट देणे उपयुक्त ठरेल.

## हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबीरात ५० जणांनी केले रक्तदान

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.३१**

आपण केलेल्या रक्तदानामुळे वेळप्रसंगी एखाद्या व्यक्तीचा जीव वाचतो, त्यामुळे जे आंतरीक समाधान मिळते ते जगातील कोणत्याही ऐश्वर्यापेक्षा जास्त मोलाचे असते म्हणून दानात रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे असे प्रतिपादन माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी केले. गुरुवार दि.२९ मे २०२५ रोजी तिथीनुसार ज्येष्ठ शुक्ल तृतीया दिनी हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह यांची ४८५ वी जयंती शक्तीउपासक, समाजभुषण राणा गोकुलसिंहजी सानंदा यांच्या अध्यक्षतेखाली विविध विधायक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. याप्रसंगी नांदुरा



रोडवरील संत तुकाराम महाराज सभागृह येथे जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबीर पार पडले याप्रसंगी बोलतांना त्यांनी उपरोक्त प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाला करणी सेनेचे अध्यक्ष संदिपसिंग राजपुत, माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा, सौ.अलकदेवी सानंदा, विश्वपालसिंह जाधव, मनोज वानखडे, सुरेशसिंह तोमर, विजय काटोले, पंजाबरावदादा देशमुख, डॉ.आर.के.राजपुत, महेंद्रसिंग राठोड, संतोष देशमुख,माजी नगरसेवक किशोरआप्पा भोसले, अशोकबाप्पु देशमुख, कल्याणसिंग तोमर, श्याम गायगोळ, किशोरसिंग राजपुत, रोहित राजपुत, राणा दिग्वीजयसिंह सानंदा, तुषार चंदेल, अन्सार भाई आदींची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा, माजी नगराध्यक्षा सौ.अलकादेवी सानंदा यांच्या हस्ते हिंदसुर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळयाचे पुजन करुन जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. तद्नंतर रक्तदानाच्या विधायक कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.रक्तदान शिबीरामध्ये राणा दिग्वीजयसिंह दिलीपकुमार सानंदा,राणा गौरवकुमार मुकेशकुमार सानंदा, आदित्या राजपुत,रोहित तहसिलदारसिंग राजपुत, प्रमोदसिंग राजपुत, कु.साक्षी किशोरसिंग राजपुत यांच्यासह ५० रक्तदात्यांनी महाराणाजींच्या जयंतीनिमित्त स्वयंस्फुतने रक्तदान केले. कार्यक्रमाला सकल राजपुत समाजाचे पदाधिकारी,कार्यकर्ते, राजपुत समाज बांधव-भगिणीसह नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

### पक्षाची भूमिका जनतेसमोर विषद करा

**वाशिम :** येथील शासकीय विश्रामगृह, येथे वंचित बहुजन आघाडीची बैठक समन्वयक अँड. नतिकोद्दीन खतीब यांच्या उपस्थितीत पार पडली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष किरण गिऱ्हे होत्या. या बैठकीत पक्षाची ध्येय, धोरणे व पक्षाची भूमिका जनसामान्यात अधिक बळकट करण्याबाबत व सामाजिक प्रश्न सोडविण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. भास्कर भोजने, ज्योती इंगळे, पारितोष इंगोले, भारत भगत, डॉ. गजानन हुले, संदीप सावळे, सोनाजी इंगळे, दत्तराव गोटे यांच्यासह इतर हजर होते.

### पुराचा धोका टळणार, जलपातळीत वृद्धी होणार!

**वाशिम :** सिंचनाची अपुरी साधने व भूगर्भातील पाणीपातळी झपाट्याने कमी होत असल्याने त्याचा थेट परिणाम शेती व्यवसायासोबतच पशुपालकांवर होत आहे. याअनुषंगाने मृद व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून यात बदल करण्याच्या दिशेने पावले उचलली जात आहेत. जिल्ह्यात नाला खोलीकरण व रुंदीकरण तसेच गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. त्यामुळे पुराचा धोका टळणार आणि जल क्षमतेत वाढ होणार आहे.

### अभिलेख कक्षातील लिपीक गैरहजर

**वाशिम:** तहसील कार्यालयातील अभिलेख कक्षातील लिपीक वारंवार गैरहजर राहण्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शासकीय काम काजातही याचा परिणाम होऊन खोळंबा निर्माण होत असल्याचा प्रकार घडत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. या संदर्भात विकास वानखेडे व इतर नागरिकांनी तहसिलदारांकडे निवेदनाद्वारे योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. अभिलेख कक्षातील लिपीकांनी नियमितपणे उपस्थित राहून नागरिकांना वेळेत सेवा देणे आवश्यक आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन

**मालेगाव :** थोर देशभक्त स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती मालेगाव नगर पंचायत कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात नगर पंचायत मुख्याधिकारी तथा प्रशासक पंकज सोनोने, अधिक्षक भाउसाहेब गवळी, कर निरीक्षक सुरेश राठोड, माजी बांधकाम सभापती गजानन सारसकर यांसह इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनकार्याचा आणि त्यांच्याद्वारे दिलेल्या स्वातंत्र्य संग्रामातील योगदानाचा गौरव केला गेला. नगर पंचायत कार्यालयात त्यांना अभिवादन करून त्यांच्या आदर्शाचे स्मरण करण्यात आले.

### बोरव्हा पोलीस पाटील व इतर रिक्त पदे भरा!

**मानोरा :** बोरव्हा (धरण) गावातील पोलिस पाटील, ग्रामपंचायत ऑपरेटर व रास्त भाव दुकानदार ही तीनही महत्त्वाची पदे गेल्या काही वर्षांपासून रिक्त असून, ती तत्काळ भरावीत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष जाधव यांनी पालकमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. रिक्त पदे न भरल्यास गावकरी नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. गावातील पोलिस पाटील सेवानिवृत्त होऊन चार वर्षे झाली असून, ग्रामपंचायत ऑपरेटरचे पद देखील रिक्त आहे. तसेच, रास्त भाव दुकानदाराने दोन वर्षापूर्वी राजीनामा दिल्यामुळे हे पदही अद्याप भरले गेलेले नाही. या तिन्ही पदांच्या रिक्ततेमुळे शासनाच्या विविध योजना व दैनंदिन कार्यामध्ये अडथळे निर्माण होत आहेत.

### अनसिंग बसस्थानक परिसरात स्वच्छतेचा अभाव

**अनसिंग :** येथील बसस्थानक परिसरात स्वच्छतेचा अभाव असून, ठिकठिकाणी सांडपाणी, प्लास्टिक कचरा दिसून येतो. त्यामुळे डास, माशा आणि भटक्या कुत्र्यांचा त्रास वाढला असून, संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. स्वच्छतेच्या अभावामुळे प्रवाशांना बसची वाट पाहणे म्हणजे शिक्षेसारखे वाटत आहे. स्थानिक प्रशासन व परिवहन विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

# ‘त्या’ शेतकऱ्यांसाठी १२.६१ कोटीचा ‘जॅकपॉट’

## प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वावर निवड

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. ३१ :** कृषी विभागामार्फत महाडीबीटी पोर्टलवरून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसाठी जिल्ह्यातील ३,१५३ पात्र शेतकऱ्यांची निवड झाली असून, त्यांना एकूण १२.६१ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. यापूर्वी लकी ड्रॉ पद्धतीने लाभार्थ्यांची निवड केली जायची, मात्र यंदा ‘प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य’, यानुसार निवड करण्यात आली आहे.

लाभार्थ्यांची यादी २१ मे रोजी आली असून, निवड झालेल्या महाडीबीटी पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात शेतकऱ्यांना याबाबतचा संदेश त्यांच्या मोबाइलवर पाठविण्यात आलेला आहे. या शेतकऱ्यांनी पुढील १० दिवसांत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी, अन्यथा अर्ज आपोआप बाद मानण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतरच पात्र शेतकऱ्यांना त्वरित पूर्वसंमती दिली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी ही बाब गांभीर्याने घेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

निवड झालेल्या शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर फार्मर आयडी वापरून लॉगिन करावे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करून पूर्तता करावी. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप फार्मर आयडी काढलेला नाही, त्यांनी जवळच्या सीएससी केंद्रात जाऊन तो त्वरित तयार करावा, असे आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके यांनी केले आहे.

### ’स्मार्ट पेरणी स्पर्धा’ ; शेतीचा नवा प्रयोग

**वाशिम :** पारंपरिक शेती पद्धतीतून बाहेर पडत शेतकऱ्यांनी आधुनिक, विज्ञानाधिष्ठित पद्धत अंगीकारावी, त्यांचा खर्च कमी व्हावा आणि निव्वळ उत्पन्नात वाढ व्हावी, यासाठी जिल्हा प्रशासन व कृषी विभागाने ’वत्सगुल्म स्मार्ट पेरणी स्पर्धा खरीप -२०२५’ सुरू केली आहे. चार स्मार्ट शेती पद्धतींपैकी कोणतीही एक पद्धत वापरून शेतकऱ्यांना त्यात सहभागी होता येणार आहे. या स्पर्धेमुळे जिल्ह्यातील शेतीला आधुनिकतेचा नवा चेहरा मिळणार असल्याचे मत जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी व्यक्त केले. ३० मे रोजी राजे वाकाटक सभागृहात पार पडलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शहा, ’आत्मा’च्या प्रकल्प संचालक अनिसा महाबळे, उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके उपस्थित होते. खरीप पेरणीनंतर १५ जुलैपूर्वी क्यूआर कोड स्कॅन करून शेतकऱ्यांनी नोंदणी करायची आहे. विजेत्यांना १५ ऑगस्ट रोजी सन्मानित करण्यात येणार आहे.

## अवघ्या दोन महिन्यात आरोपीला सुनावली शिक्षा!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मालेगाव, दि. ३१ :** येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर शुभम विजय सपकाळ यांच्यावर हल्ला करणाऱ्या देवराव ऊर्फ दत्ता गोविंदा साठे (वय ४५) या आरोपीस मालेगाव न्यायालयाने अवघ्या दोन महिन्यांत दोषी ठरवत एक वर्ष सश्रम कारावास व १ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

ही घटना ४ एप्रिल २०२५ रोजी रात्री एक वाजता घडली होती. पोलिसांनी तत्परतेने गुन्हा दाखल करून २३ एप्रिल रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सहायक सरकारी अभियोक्ता एम. एस. सुपारे यांच्या विनंतीवरून प्रकरण तत्काळ न्यायप्रविष्ट करण्यात आले. पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय माधव पेटकर, पोहेका शिवाजी काळे, पोकाँ गणेश मेटांगळे आदींनी गुन्ह्याचा तपास केला. फास्ट ट्रॅक न्याय प्रक्रियेच्या माध्यमातून २२ मे रोजी निकाल लागला. या निकालामुळे वारंवार सरकारी कर्मचाऱ्यांवर हल्ले करणाऱ्यांना धडा मिळाला आहे.

## कृषी चौपाल मार्केटमधून अडीच लाख लंपास

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**रिसोड, दि. ३१ :** येथील हिंगोली रोड वरील मे.एकनाथ खंडाप्पा कृषी चौपाल या खासगी मार्केटमध्ये गुरुवारी मध्यरात्री दोन चोरट्यांनी प्रवेश करून अडीच लाख रुपयांची रोख रक्कम लंपास केली आहे. चोरीचा संपूर्ण घटनाक्रम सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

रिसोड-हिंगोली रोडवर मे.एकनाथ खंडाप्पा कृषी चौपाल मोठे खासगी मार्केट असून या ठिकाणी दैनंदिन सर्व प्रकारच्या धान्याची ,शेतमालाची मोठी खरेदी केल्या जाते.दररोज या ठिकाणाहून शेकडो क्विंटल धान्य खरेदी करून इतर ठिकाणी पाठविल्या जाते. सहाजिकच या सर्व व्यवहारांचा चुकारा करण्यासाठी हमालांची मजुरी तसेच ट्रक मालकांना लागणारे डिझेलचे पैसे आदी बाबीसाठी लागणारी दोन-तीन लाख रुपये रोख ही शिल्लक ठेवल्या जात असते. याच संधीचा फायदा घेऊन चोरट्यांनी गुरुवारच्या मध्यरात्री मे.एकनाथ खंडाप्पा कृषी चौपाल मार्केटमध्ये पाणपोईच्या मागून झाडावरून आत उतरून कॅश काउंटरच्या ऑफिसमध्ये प्रवेश केला. कार्यालयातील सर्व भागाची झडती घेत कॅश काउंटरमध्ये पेचकस टाकून उघडले.

त्यामधील रोख रक्कम दोन लाख ४७ हजार ७३० रुपये लंपास केले आहे. सदर घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अशातच रिसोड शहरात दिवसागणिक वाढत चाललेल्या छोट्या-मोठ्या चोऱ्यांनी नागरिक चिंतेत आहेत. सततच्या होणाऱ्या चोऱ्यांवर पोलीस प्रशासनाने अंकुश लावावा, अशी मागणी सुज्ञ नागरिकांतून होत आहे. या संदर्भात मे.एकनाथ खंडाप्पा कृषी चौपाल मार्केटचे संचालक किशोर कोठुळे यांनी रिसोड पोलीस स्टेशनला तक्रार दिली असून, पुढील तपास रिसोड पोलीस स्टेशनचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात



**कोंडोली:** येथील ग्राम पंचायत कार्यालयात दि ३१ मे रोजी अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच गजानन राऊत, प्रमुख उपस्थित सुदाम तायडे, सुनील देशमुख, दीपक खडसे, आकाश इंगोले यांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. ग्रामसेवक आर आर शिंदे यांनी संचालन व आभारप्रदर्शन केले.

## अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ३१ :** भारतातील माळव्याच्या तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुनश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती दिनांक ३१ मे रोजी मानोरा येथील पंचायत समितीच्या आवारात दुपारी १२ वाजता उत्साहात साजरी करण्यात आली.

राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समिती,तालुका धनगर समाज संघटना,मल्हार युवा सेना यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलिस निरीक्षक प्रवीण शिंदे होते.

प्रमुख अतिथी म्हणून बाजार समितीचे सभापती डॉ.संजय रोठे,राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) राजू गुल्हाने, वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष विनोद राठोड, डॉ.ललित हेडा, अभिजित राठोड, प्रा.सुनिल काळे, विजय अनंतकुमार पाटील, वासुदेवराव खोंड, वासुदेव काजळे तसेच तालुक्यातील अनेक राजकीय पदाधिकारी,नेते उपस्थित होते.

या वेळी मान्यवरांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रावर मनोगत व्यक्त केले. संचालन माणिक डेरे यांनी केले.देवेंद्र कानोडे यांनी आभार मानले.

**राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी १७६७ ते १७९५ या काळात राज्यकारभार केला. त्यांनी नर्मदा नदीच्या तीरी इंदूर च्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर येथे आपली राजधानी हलविली.त्यांचा प्रशासकीय कामात हातखंडा होता.त्यांच्या समतेच्या विचाराने आपण गेलो पाहिजे.समाजात बंधुभाव निर्माण केला पाहिजे. असे प्रतिपादन ठाणेदार प्रवीण शिंदे यांनी केले.**

## भाव गौरव यात्रा टुरिस्ट ट्रेन मुंबईपासून

**वाशिम :** रेल्वे मंत्रालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या तेजस्वी पराक्रमाला वंदन करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्किट या विशेष पर्यटक वतुर्ळाकार यात्रेची घोषणा करण्यात आली आहे. या अंतर्गत, भाव गौरव यात्रा टुरिस्ट ट्रेन या नावाने एक आगळीवेगळी पर्यटन रेल्वे सुरू करण्यात येत आहे. या यात्रेची पहिली ट्रेन ९ जून २०२५ रोजी मुंबई स्थानकावरून रवाना होणार आहे. या विशेष प्रवासामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या किल्ल्यांना भेट दिली जाणार आहे, तसेच या मार्गावर येणाऱ्या धार्मिक व सांस्कृतिक स्थळांचाही समावेश आहे. हा उपक्रम केवळ एक पर्यटन मोहीम नसून, आपल्या इतिहासाचे जतन आणि युवा पिढीत अभिमान निर्माण करण्याचा एक प्रेरणादायी प्रयत्न आहे.

## पालखी सोहळ्याचे स्वागत चिखलमय रस्त्यावर करणार काय?



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**शिरपूर गावातील मुख्य रस्त्याची दयनीय अवस्था**

**शिरपूर जैन, दि. ३१ :** येथील राजमाता जिजाऊ चौक (रिसोड नाका) ते बस स्टँडपर्यंतचा मुख्य रस्ता सध्या अक्षरशः खड्ड्यांनी भरलेला असून, त्या रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. लवकरच संत गजानन महाराज पालखीचे आगमन होणार आहे. हा सोहळा गावासाठी अत्यंत श्रद्धेचा आणि गौरवाचा क्षण असतो व श्रींची पालखी ही जानगीर बाबा संस्थानवर रात्रीच्या वेळी मुक्कामी असते. मात्र, अशा खडतर रस्त्यावरून पालखी मार्गक्रमण करणे हे संतांच्या अनुयायांसाठी तसेच पालखी समितीसाठी मोठे आव्हान ठरणार आहे.

वाशिम जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळखले जाणारे शिरपूर गाव सध्या विकासाच्या दृष्टीने अंधारात अडकलेले दिसते आहे. स्थानिक प्रशासन आणि संबंधित विभाग या बाबीकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

शिरपूर गावात लवकरच संत गजानन महाराज यांच्या पालखीचे आगमन होणार असून, त्या पार्श्वभूमीवर गावात धार्मिक आणि सामाजिक उल्हासाचे वातावरण असते. मात्र, सध्याच्या रस्त्याच्या दयनीय अवस्थेमुळे गावकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. रस्त्यावर चालणे अवघड झाले असून, वाहनधारकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीच्या मागणीकडे प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही. अनेकदा ग्रामस्थांनी रस्त्याच्या दुरवस्थेबाबत तक्रारी करूनही, कुठल्याही प्रकारचे डांबरीकरण किंवा खड्डे बुजवण्याचे काम झालेले नाही. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, ’विकासाचे गोडवे गाणारे लोकप्रतिनिधी आणि अधिकारी व गावातील श्रेय घेऊ राजकारणी प्रत्यक्षात गावातील मूलभूत सुविधा सुधारणे याकडे दुर्लक्ष करीत आहेत. यामुळे आम्हाला शरमेने मान खाली घालावी लागते. या पार्श्वभूमिवर ग्रामस्थांनी शासन आणि संबंधित विभागाकडे तातडीने लक्ष घालून रस्ता दुरुस्तीचे काम सुरू करावे. शिरपूरसारख्या प्रतिष्ठित आणि ऐतिहासिक गावाची अशी अवस्था होणे ही खरोखरच दुर्दैवी बाब असून, प्रशासनाने तातडीने पावले उचलून नागरिकांचा विश्वास परत मिळवावा, हीच सगळ्यांची अपेक्षा आहे.

## तंबाखू विरोधी दिनानिमित्त जनजागृती






दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३१ :** जागतिक तंबाखू विरोधीसेवन दिनानिमित्त येथील श्री बाकलीवाल विद्यालयात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत जनजागृतीपर पोस्टर स्पर्धेचे आयोजन ३१ मे रोजी करण्यात आले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांच्या मार्गदर्शनाखाली व एनसीसी अधिकारी अमोल काळे यांच्या नेतृत्वात झालेल्या या उपक्रमात विद्यालयातील ४५ एनसीसी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाचा आकर्षणाचा मुखवटा उतरवुया या संकल्पनेवर आधारित पोस्टर्सच्या माध्यमातून तंबाखूविरोधी संदेश दिला. त्यांनी तंबाखू व निकोटीन उत्पादनामागील उद्योगांच्या क्लृप्त्या उघड करत तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी प्रभावी जनजागृती केली. यावेळी जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ. पांढारकर यांनी सांगितले की, तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिराती आकर्षक पद्धतीने सोशल मीडिया, शालेय साहित्य व खाद्यपदार्थांच्या माध्यमातून होत असून युवकांना यातून दूर ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आवश्यक आहेत. तंबाखू नियंत्रण विभागाचे राम सरकटे व रामकृष्ण धाडवे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांनी आयुष्यभर तंबाखू आणि तत्सम व्यसनांपासून दूर राहण्याचा संकल्प केला. स्पर्धेमध्ये नम्रता इंगळे हिने प्रथम क्रमांक, रजत कुटे याने द्वितीय क्रमांक आणि विघ्नेश वानखेडे याने तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना लवकरच बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या उपक्रमाचे बाकलीवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अड. सुरेंद्रकुमार बाकलीवाल, शाळेचे मुख्याध्यापक बबनराव बिल्लारी, उपमुख्याध्यापक दंभीवाल, पर्यवेक्षक भोंडे आणि एनसीसी अधिकारी अमोल काळे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

अजिंक्य भारत

# आपला जिल्हा

अकोला । रविवार, दि. १ जून २०२५



## थोडक्यात

### अहिल्याबाई होळकर यांचा जयंती कार्यक्रम उत्साहात



**मूर्तिजापूर :** मराठा साम्राज्याची राणी व समाजसुधारक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त आज आमदार हरीश पिंपळे यांच्या निवासस्थानी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी त्यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या कार्यक्रमात आमदार हरिभाऊ पिंपळे, दिलीप तिहिले, राहुल गुल्हाने, विकास चपटे, नरेंद्र ठोकळ, कमलाकर गावंडे, नंदू राऊत, हर्षल साबळे, सुधीर दुबे, सुभाष सरोदे, योगेश आगाशे, प्रवीण लोहपुरे, अभय पांडे, दिग्विजय गाडेकर, पंकज सावळे, लखन स्थानिक नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अहिल्याबाईंच्या समाजसेवेची, न्यायप्रियतेची आणि शौर्याची आठवण करून देत वक्त्यांनी त्यांचे जीवनचरित्र आणि योगदानावर प्रकाश टाकला. कार्यक्रमात महिलांसाठी विशेष कार्यशाळा, विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. शहरभर अहिल्याबाई होळकर यांचा जयजयकार होत होता. कार्यक्रमाच्या शेवटी अहिल्याबाईंच्या आदर्शांनी प्रेरित होऊन सामाजिक कामात योगदान देण्याची शपथ घेतली गेली.

### सिरसो परिसरात अवकाळी पावसाचा बळीराजाला फटका



**मूर्तिजापूर :** महसूल मंडळात बागायतदार गाव म्हणून ओळख असलेले सिरसो सर्वदूर सुपरिचित आहे; परंतु ऐन उन्हाळ्यात मे महिन्यात दुसऱ्या पंधरवड्यात झालेल्या बेमोसमी पावसाने दाणादाण उडविली.'अवकाळी' जणु काही 'बळी' घ्यायला आली. अशाप्रकारे बरसत आहे. या पावसामुळे मुख्य लिंबू सोबत वांगे, कोथिंबीर, कोबी, मुख्य म्हणजे उन्हाळी तीळ पार भुईसपाट झाले आहे. तीळ पीक पूर्णपणे काळे पडत सडून गेले आहे.

*शेतकऱ्यांनी भरउन्हातान्हात पाणी देऊन रखवाली करून 'जोमात' आणलेला तीळ डोळ्यासमोर अस्मानी ने 'कोमात' गेला. काळाकुट्ट झाला, सडला व भाजीपाला खराब झाला. आता मायबाप सरकारने प्रशासन बांधावर पाठवून पंचनामे करावे.*

**- प्रवीण डाहाके,** शेतकरी तथा सामाजिक कार्यकर्ते सिरसो,

*माझ्या शेतात दोन एकर तीळ पेरलेला आहे. ऐन सोंगणी व काढणीच्या वेळी पाण्याने धिंगाणा केला. या पिकावर माझे बी-बियाणे खते अवलंबून होते.*

**- गोर्वधन वरोकार,** शेतकरी सिरसो.

## निधन वार्ता

### मनिषा पुंडकर



**तेल्हारा :** कोठा येथील श्रीराम अहेरकर यांची मुलगी तथा सचिन अहेरकर यांची बहीण व पुंडा ता. आकोट येथील जीवनराव पुंडकर यांच्या पत्नी मनिषा जीवनराव पुंडकर यांचे २९ मे रोजी वयाच्या ३५ व्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या मागे सासू, पती, मुलगी असा आप्त

## परिसरातील बहुतांश गावांमध्ये दररोज होते वीज खंडित

# सावरा सबस्टेशनचा भोंगळ कारभार

### आसेगाव बाजार ग्रामपंचायतच्यावतीने स्टेशनचे कनिष्ठ अभियंता यांना निवेदन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. ३१ : तालुक्यातील सावरा येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी विभाग अकोट अंतर्गत सावरा हे सबस्टेशन आहे. या सबस्टेशनला पंधरा गावे जोडल्या गेली आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून दररोज पाच तास वीज पुरवठा खंडित होत आहे. या प्रकारामुळे परिसरातील सर्व गावे त्रस्त झाली आहेत.**



वीज चालू बंद करण्यामुळे अनेक लोकांच्या घरातीन लाईट, पंखे, फ्रीज बंद पडल्याने अर्थिक नुकसान झाले आहे. सतत वीज पुरवठा खंडित होणे, किरकोळ कारणांमुळे संपूर्ण परिसरातील दहा गावांचा पुरवठा खंडित ठेवणे ही अतिशय चुकीची बाब आहे. परिसरातील अनेक गावातील नागरिकांना वीजपुरवठा खंडित करणे संदर्भात त्रास होऊ नये म्हणून ग्रामपंचायत आसेगाव बाजार येथील सरपंच नीलेश नारे व नागरिकांनी सावरा येथील कनिष्ठ अभियंता यांना वीज पुरवठा सतत खंडित होऊ नये म्हणून निवेदन सादर करण्यात आले आहे. सावरा येथील कनिष्ठ अभियंता यांनी वीजपुरवठा खंडित होणार नाही, असे आश्वासन देऊन निवेदन घेऊन आलेल्या नागरिकांची समजूत काढली व निवेदन स्वीकारले. याप्रसंगी सरपंच नीलेश नारे, राजेंद्र रोकडे, नावेद अशकन, विशाल नारे, विनोद लाहोरे, सुधारम राख, गजानन चेडे, रोहित नागे, शैलेश नारे, बबलू नागे, हर्षल नारे, अमोल पवार, आकाश पुंडकर, अक्षय नारे, हर्षल गवई, अभिमन्यू धांडे, गजानन शिवणकर, निखिल रोकडे, अंकुश राजवैद्य यांचेसहित गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या अनेक दिवसांपासून दररोज आमच्या गावातील वीज पुरवठा खंडित होतो. वीज चालू-बंद या प्रकारामुळे परिसरातील अनेक लोकांच्या घरातील पंखे, फ्रीज, लाईट बंद पडले आहेत. लोकांचे आर्थिक नुकसान झाले. म्हणून आज कनिष्ठ अभियंता यांना सतत वीज पुरवठा खंडित होऊ नये म्हणून निवेदन दिले. सततचा होणारा खंडित वीजपुरवठा नियमितपणे चालू न केल्यास आसेगाव बाजार येथील गावकऱ्यांच्यावतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.

**- नीलेश नारे,** सरपंच,आसेगाव बाजार.

सावरा सबस्टेशन अंतर्गत पंधरा गावे जोडली गेली आहेत. सद्यस्थितीत ट्री कटिंगचे काम चालू असल्याने गावांना होणारा वीज पुरवठा कुठलाही अपघात होऊ नये म्हणून काही तासांपुरता खंडित केल्या जातो. आज ट्री कटिंगचे काम पूर्ण झाल्याने उद्यापासून कुठल्याही ठोस कारणाशिवाय वीजपुरवठा खंडित होणार नाही.

**- नीलेश आडे,** कनिष्ठ अभियंता, सब स्टेशन, सावरा.

## अकोट नगर परिषदेमध्ये सेवापूर्ती सत्कार सोहळा

### अकोट नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक सैफुद्दीन खतिब यांना निरोप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. ३१ :** अकोट नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक सैफुद्दीन खतीब यांचा सेवापूर्ती सोहळा ३० मे २०२५ रोजी,अकोट नगर परिषद कर्मचारी / संवर्ग कर्मचारी संघटना अकोटच्या वतीने नगरपालिकेच्या सभागृहामध्ये नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. नरेंद्र बेंबरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडला.

३० मे २०२५ रोजी नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक सैफुद्दीन खतिब यांचा प्रदीर्घ सेवेचा कार्यकाळ संपल्याने ते सेवानिवृत्त झाले आहेत. म्हणून त्यांना सेवापूर्ती सोहळ्यात निरोप देण्यात आला.



सैफुद्दीन खतीब यांनी नगर परिषदेच्या विविध पदांवर सेवा दिली. तसेच त्यांनी शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी व अकोट नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक या पदावर ते सेवानिवृत्त झाले आहेत. खतीब यांनी ३२ वर्ष नगरपालिका प्रशासनाला सेवा दिली. अकोट नगरपालिकेमध्ये त्यांनी सातत्याने गौरवास्पद कामगिरी केल्याने, त्यांचा नगर परिषद कर्मचारी संवर्ग कर्मचारी संघटना अकोटच्यावतीने अकोट नगरपालिकेचे कार्यालययीन अधीक्षक सैफुद्दीन खतीब यांचा सेवापूर्ती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला अकोट नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. नरेंद्र बेंबरे, अभिषेक गौतरकर, दिनेश ठेलकर, सुनील तरोळे, अभिषेक काळे, तेजस हगोने यांच्यासह नगर परिषदेचे सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय बेलूरकर यांनी केले तर आभार तेजस हगोने यांनी मानले.

## सुनील अग्रवाल यांची १०० व्या वेळी रक्तदान करून निस्वार्थ बांधीलकी

**मूर्तिजापूर :** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या श्री शताब्दीनिमित्त रुग्णकल्याणासाठी तत्पर सेवेसाठी हजर राहून सर्वश्रेष्ठ रक्तदान करणारे सुनील अग्रवाल यांची १०० व्या वेळी रक्तदान करून समाजाप्रती निस्वार्थ बांधीलकी अंधोरेखित केली आहे.

मूर्तिजापूर येथे आयोजित अहिल्याबाई होळकर यांच्या अभिवादन कार्यक्रमात आमदार हरीश पिंपळे व माजी आमदार हरिदास भदे यांच्या उपस्थितीत उल्लेखनीय सामाजिक कार्य केल्याबद्दल सुनील ब्रिजमोहन अग्रवाल यांनी शंभर वेळा आतापर्यंत रक्तदान करून सर्वश्रेष्ठ दान केलेले आहे म्हणून त्यांचे



आमदार हरीश पिंपळे यांनी कौतुक केले आहे. शंभर वेळा रक्तदानाचा विक्रम ही केवळ संख्या नव्हे तर मानवतेच्या सेवेतील एक प्रेरणादायी उदाहरण आहे, म्हणून जास्तीत जास्त युवकांनी रक्तदान करून श्रेष्ठदान करावे, असे सुद्धा आवाहन आमदार हरीश पिंपळे यांनी केले आहे.

## मिसेस आशिया इंटरनॅशनल-२०२५ स्पर्धेतील पूजा मेश्राम यांचे जल्लोषात स्वागत

**अकोला :** शहराचा अभिमान असलेल्या पूजा मेहरसाम यांनी नुकतेच कुआलालंपूर, मलेशिया येथे झालेल्या माइलस्टोन मिसेस आशिया इंटरनॅशनल २०२५ सौंदर्य स्पर्धेत फर्स्ट रनर-अप होण्याचा बहुमान मिळविला आहे. या विशेष विजयानंतर पूजा यांना (धाडसी सौंदर्यवती) आणि सोशल मीडिया क्वीन हे मानाचे पुरस्कारही प्राप्त झाले. त्यांच्या संपूर्ण प्रवासात त्यांनी (मुलीचे शिक्षण) ही सामाजिक चळवळ स्वतःच्या कामगिरीशी जोडली आणि समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा संदेश दिला. अकोल्यात सन्मानासाठी खास लूक शिवा ॲण्ड नीताज फॅमिली सैलूनचे योगदान स्पर्धेनंतर अकोल्यात परतल्यानंतर, पूजाचे विविध सन्मान



समारंभ आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे शिवा ॲण्ड नीताज फॅमिली सैलूनमध्ये त्यांनी घेतलेली खास मेकओव्हर सेवा.

पूजाने सैलूनमधील सर्व टीमचे मन:पूर्वक आभार मानले आणि त्यांचं कौशल्य, कल्पकता व मैत्रीपूर्ण वागणूक याचं भरभरून कौतुक केलं. ''इतक्या मोठ्या यशानंतर माझ्या मूळगावी परत येणं खूपच भावूक क्षण होता. मी इथे माझं बेस्ट लूक दाखवावं, ही माझी इच्छा होती. शिवा, नीता आणि त्यांच्या टीमने मला प्रचंड सुंदर आणि आत्मविश्वासाने भरलेली फीलिंग दिली. पूजाचा प्रवास हा धैर्य, आत्मविश्वास आणि कर्तृत्वाचा अद्वितीय संगम आहे. त्यांच्या या यशामुळे अकोल्याचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर उजळले असून, शिवा अँड नीताज फॅमिली सैलूनसारख्या स्थानिक प्रतिभेचाही गौरव झाला आहे. पूजाच्या यशाच्या या प्रवासात अभिमानाने, प्रेमाने आणि प्रेरणेने अकोल्यातील प्रत्येक माणूस सहभागी आहे.

## वादळाने कोसळलेले रोहित्र १२ दिवसांपासून पडलेलेच

### पाणीपुरवठा ठप्प; गुरांच्या पाण्याचा प्रश्न कायम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**दानापूर, दि. ३१ :** येथून जवळच असलेल्या बोरखेड शिवारात गत बारा दिवसांपासून जमिनीवर कोसळलेले रोहित्र अद्यापही वीज कंपनीने उभे केले नसल्याने विजेअभावी शेतकऱ्यांची संत्रा बागावर फवारणीची कामे थांबली आहेत.

संग्रामपूर तालुक्यातील सोनाळा वीज उपकेंद्रात बोरखेड गावाजवळ वानखडे यांचे शेताच्या धुऱ्यावर गत सहा महिन्यांपासून पूर्णपणे झुकलेले रोहित्र सरळ करण्यासंदर्भात सोनाळा वीज कार्यालयात वेळोवेळी माहिती शेतकऱ्यांनी दिली; मात्र वीज



अभियंता यांनी दखल घेतली नाही. अखेर १७ मे रोजी जोराचा वारा व अवकाळी पावसामुळे रोहित्र, सिमेंट पोल तुटून जमिनीवर पडले.

सुदैवाने जीवितहानी झाली नाही. आज रोजी शेतात मका, ज्वारी, उन्हाळी भुईमूग उपटणे सुरू असल्याने मजुरांना व गुरांना मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता आहे. वीज वितरणचे वरिष्ठ अधिकारी यांनी याकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

माझ्या तीन एकर संत्राबागेत अत्यंत महत्त्वाची फवारणी विजेअभावी रखडली. वीज कार्यालयाने पडलेले रोहित्र उभे करण्यात यावे.

**- वामन मिसाळ,** संत्रा उत्पादक शेतकरी दानापूर.

रोहित्र उभे करण्याचे काम कंत्राटदाराला दिले असून, दोन खांब उभे करण्यात आले.त्वरित वीज पुरवठा सुरू होईल.

**- पूजा आखरे,** लाइनमन, बोरखेड.

## वाडेगावात रेतीची अवैध वाहतूक जोमात सुरूच

### शासनाच्या लाखो रुपये महसूलला चुना

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वाडेगाव, दि. ३१ :** बाळापूर तालुक्यातील वाडेगाव येथे अवैध रेतीची चोरटी वाहतूक जोरात सुरू आहे. रेतीमाफियांच्या या दबंगगिरीकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने त्यांचे मनसुबे वाढले असून, ते कुणालाही जुमानत नसल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, अवैध रेतीची वाहतूक करणारे वाहने सुसाट धावत असल्याने या वाहनांमुळे अपघातांची शक्यता बळावली आहे.

बाळापूर तालुक्यातील वाडेगाव, तामसी, चिंचोली गणु, पिंपळगाव या रेतीघाटांवरून अनेक दिवसांपासून रेतीचा उपसा करून अवैध रेतीची वाहतूक सुरू आहे; मात्र रेतीमाफियांच्या या प्रकाराकडे तालुका प्रशासनाचे साफ दुर्लक्ष होत असल्यामुळे रेती माफियांकडून रेतीची खुलेआम अवैध वाहतूक केली जात असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, त्यामुळे यात काहीतरी मिलीभगत असल्याचा संशय नागरिक व्यक्त करीत आहेत.

रेतीची ही अवैध वाहतूक तामसी पिंपळगाव येथून वाडेगावात होत असल्याने या रस्त्यावरून रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर चालक कुणाची पर्वा न करता भरधाव वेगात गावातून ट्रक्टर चालवित असल्याने अपघातांची शक्यता नाकारता येत नाही. या रस्त्यावरुन शेतकरी शेतमजूर तसेच क्लासेसच्या विद्यार्थ्यांची नेहमी वर्दळ असते. यामध्ये या रस्त्यावरून अवैध रेतीची वाहतूक करणारे ट्रॅक्टर अत्यंत वेगाने धावत असल्यामुळे या रस्त्याने अपघात होण्याची शक्यता बळावली असल्यामुळे या रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्या शेतकरी ,शेतमजुरांसह विद्यार्थ्यांच्या जीवास धोका निर्माण झाला आहे.

त्यामुळे तालुका प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ट्रकचालक व मालकांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून जोर धरत आहे.

### शासनाचा लाखो रुपयांचा महसूल पाण्यात

वाडेगाव परिसरातील रेती घाटावरून रेतीचे उत्खनन करून मोठ्या प्रमाणात अवैध वाहतूक सुरू असून, याकडे महसूल यंत्रणेचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. अवैध रेती वाहतुकीची माहिती तालुक्यातील संबंधित विभागाला देऊनसुद्धा संबंधित विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे.

## दानापूर येथील घरकुल लाभार्थ्यांची अवस्था बिकट

### अतिक्रमणामध्ये ३० ते ४० वर्षापासून वास्तव्यास असलेले दानापूर येथील नागरिकांचे घरकुल नियमानुकूल होणार का?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**दानापूर, दि. ३१ : तेल्हारा तालुक्यातील क्रमांक दोनची मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दानापूर येथील बरेच घरकुल लाभार्थी कित्येक वर्षापासून अतिक्रमणामध्ये राहत असून, त्यांची नावे ही रमाई आवास, प्रपत्र ब, प्रपत्र ड, पंतप्रधान आवास योजनेमध्ये घरकुल यादीमध्ये समाविष्ट आहेत.**

मात्र लाभार्थी अतिक्रमणामध्ये राहत असल्याने हे लाभार्थी घरकुल लाभ मिळण्यापासून वंचित आहेत. या अगोदर दानापूरमधील जवळपास ८० घरकुल लाभार्थीना ई-क्लास जागेमध्ये २८/१२/२०२१ रोजी प्रदत्व समितीच्या माध्यमातून घरकुल नियमानुकूल करण्यात आले आहे.



हे घरकुलचे फाईल साईटवर अपलोड करताना एवढेच घरकुल नियमानुकूल झाले व साईट बंद पडली, त्यामुळे १०० ते १५० लाभार्थी घरकुल लाभापासून वंचित राहिले आहेत. तरी राहिलेल्या घरकुल लाभार्थ्यांना तहसीलदार तेल्हारा व जिल्हा अधिकारी अकोला, यांच्या माध्यमातून आपल्या प्रयत्नातून लाभ मिळेल का? असा आशावादी सूर नागरिक करीत आहेत.

प्रदत्व समितीच्या माध्यमातून ८० लाभार्थी यांचे घरकुल नियमानुकूल करण्यात आले व उर्वरित १०० ते १५० लाभार्थी अजूनपर्यंत घरकुलाच्या लाभापासून वंचित आहेत. त्या लाभार्थ्यांना लाभ मिळावा, याकरिता जिल्हाधिकारी अकोला, तहसीलदार तेल्हारा, मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. अकोला यांना निवेदन देण्यात आलेले आहे. ग्रामपंचायत कार्यालय दानापूर यांनी दिलेल्या निवेदनावर लक्ष केंद्रित करावे व घरकुल लाभार्थी यांना घरकुल नियमानुकूल करण्याचा मार्ग मोकळा होईल.

**- सपना वाकोडे,** ग्रा.पं.सरपंच, दानापूर.

अजिंक्य भारत

आपलं अमरावती

रविवार, दि. १ जून २०२५

# शिक्षकेत्तर पदभरती रद्दचा फटका!

## संस्थाचालकांचे आर्थिक सेटिंग बिघडणार!

अजिंक्य भारत । सुधीर केने

**अमरावती, दि. ३१ :** राज्यातील शिक्षकेतर कर्मचारी पद भरतीला तूर्तास शालेय शिक्षण विभागाने पूर्णविराम दिल्यामुळे संस्थाचालकांचे आर्थिक सेटिंग बिघडणार आहे .गत महिन्यात पदभरतीला मान्यता दिल्यामुळे शेकडो उमेदवारांची सेटिंग लावण्यात आली होते .परंतु ऐनवेळी शासनाने निर्णय बदलल्याने संस्थाचालक आर्थिक अडचणीत सापडण्याची शक्यता आहे.

शालेय शिक्षण विभागाने राज्यातील शिक्षकेतर कर्मचारी पदभरतीसाठी ४ एप्रिल २०२५ रोजी मान्यता दिली होती .काही अटी व शर्तींच्या अधीन राहून संस्थाचालकांना अनुकंपा नियुक्ती सह शंभर टक्के पदभरतीस मान्यता दिली होती. गेल्या अनेक वर्षांपासून राज्यात पदभरती बंद होती त्यामुळे संस्थाचालकांसमोर अडचणी निर्माण झाल्या होत्या .शाळांमध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता होती. पदभरतीची मान्यता दिल्यामुळे संस्थाचालकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले होते .अनेकांनी पदभरतीची प्रक्रिया सुरू केली होती .विशेष म्हणजे पदभरती करताना अनेकांच्या आर्थिक सेटिंग लावण्यात आल्या होत्या .काही संस्थांमध्ये विनाअनुदानित तत्त्वावर तात्पुरत्या मानधनावर ज्या कर्मचाऱ्यांना नियुक्त केले गेले होते त्याच कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी त्यांच्याकडून सेटिंग करण्यात




आली होती. परंतु ऐनवेळी शासनाचा निर्णय बदलल्याने आता संस्थाचालकांसमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे.

शाळांमध्ये कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक , मुख्य लिपिक, पूर्ण वेळ ग्रंथपाल,प्रयोगशाळा सहाय्यक अशा विविध पदांसाठी शासनाने मान्यता दिली होती. अनेक उमेदवार संस्थाचालकांच्या संपर्कात आधीपासूनच होते आता मान्यताच मिळाल्याने त्यांच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला होता त्यासाठी व्यवहार झाल्याची चर्चा आहे.

शिक्षकांची भरती पवित्र पोर्टल मार्फत होत असल्यामुळे संस्थाचालकांचा उत्पन्नाचा मार्ग बंद झाला होता.

आता मात्र शिक्षकेतर कर्मचारी पदभरतीला मान्यता मिळाल्याने त्यांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या .परंतु या आशेचा किरण दिसण्याआधीच ती आशा मावळली. तूर्तास शिक्षकेतर कर्मचारी पदभरतीला शिक्षण विभागाने पूर्णविराम दिला आहे .आधी अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन करा त्यानंतरच कर्मचारी पदभरतीचा निर्णय घेऊ असे २८ मे २०२५ रोजी झालेल्या बैठकीत ठरविण्याचा आले यामुळे संस्थाचालकांमध्ये कमालीची अस्वस्थता निर्माण झाली आहे.

### अर्जाच्या माध्यमातून लाखोंची कमाई

शाळांमध्ये शिक्षकेत्तर कर्मचारी पदभरतीला मान्यता मिळाल्यानंतर संस्थाचालकांनी त्यासाठी अर्ज विक्री सुरू केली होती. पाच पदासाठी पदभरती असल्याने अनेक उमेदवारांनी एक नव्हे तर दोन ते तीन पदांसाठी अर्ज भरले. प्रती अर्ज ५०० ते ८०० पर्यंत फी आकारण्यात आली होती. त्यामुळे एका पदासाठी हजारो अर्ज संस्थाचालकांकडे प्राप्त झाले आहेत या माध्यमातून संस्था चालकांनी लाखोंची कमाई करून घेतली आहे. त्याचा भुर्दंड मात्र सामान्य उमेदवारांना सहन करावा लागला आहे.

## थोडक्यात

### कुख्यात गुंडाची चाकूने भोसकून निर्घृण हत्या



मृतक

**अमरावती :** अल्पवयीन असताना गुन्हेगारी क्षेत्रात असलेल्या एका २० वर्षिय कुख्यात गुंडाची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. ही घटना नांदगाव पेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सिद्धांत बार समोर घडली. सुरज उर्फ चावक्या दिवाकर सावते, २० रा. शेगाव हा सिद्धांत बार समोर रक्ताच्या थारोड्यात पडला होता. अज्ञात इसमाने त्याच्यावर चाकूने वार केले. सदर घटनेची माहिती नांदगाव पेठ पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच पोलिस घटनास्थळावर पोहचले रक्तबंबाळ अवस्थेत सुरज उर्फ सावत्या याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी मृत घोषित केले. गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणारा सुरज त्याच्यावर अनेक पोलिस ठाण्यात गंभीर प्रकारचे गुन्हे दाखल आहे. अल्पवयीन असतानाच तो गुन्हेगारीत सक्रीय झाला होता. सुरज याच्या अंगावर चाकूचे अनेक वार होते. त्यामुळे तो गंभीर जखमी झाला होता. पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात इसमाविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. नांदगाव पेठ व क्राईम ब्रांचचे पथक घटनास्थळी पोहचले असून पोलिस हत्या करणाऱ्यांचा शोध घेत आहेत.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य हे सेवा, समर्पण–बबलू देशमुख



**अमरावती :** पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त एक प्रेरणादायी अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून खासदार बळवंतराव वानखडे हे उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष बबलुभाऊ देशमुख, हरिभाऊ मोहोड, मुकद्दर खा पठाण, प्रदीपराव देशमुख, प्रविणभाऊ मनोहर, समाधानराव दहातोंडे, बिट्टूभाऊ मंगरोळे, भागवतराव खांडे, नंदुभाऊ यादव, शेखर दाभणे आणि इतर मान्यवर पदाधिकारी यांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमात बोलताना काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलुभाऊ देशमुख यांनी सांगितले, ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य हे सेवा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण आहे. त्यांनी स्त्रियांसाठी आणि समाजातील वंचित घटकांसाठी जे कार्य केले, ते आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या प्रशासन कौशल्याने आणि धर्मकार्याच्या योगदानामुळे भारतात अनेक ठिकाणी सामाजिक स्थिरता निर्माण झाली.''या प्रसंगी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावर आधारित माहितीपट, भाषणे आणि अभिवादनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यांनी बांधलेली मंदिरे, धर्मशाळा, घाट व सामाजिक उपक्रमांची माहिती देत देशमुख यांनी त्यांच्या कार्याचा उजाळा दिला. ''आजच्या पिढीने अहिल्याबाईंच्या कार्यातून प्रेरणा घेत समाजसेवेसाठी पुढे यावे,'' असे आवाहनही बबलुभाऊ देशमुख यांनी उपस्थितांना केले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून आदरणीय अहिल्यादेवींच्या जयंतीला सामाजिक अभिवादन केले.

# जिल्ह्यात दोन कर्जबाजारी शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले

## नांदगाव पेठ व मोर्शी तालुक्यातील खोपडा येथील घटना

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती, दि. ३१ :** जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून कर्जबाजारी शेतकऱ्यांचे आत्महत्येचे सत्र थांबता थांबेना. जिल्ह्यातील नांदगाव पेठ व मोर्शी तालुक्यातील खोपडा येथील कर्जबाजारी शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपविली. शेतकऱ्याच्या आत्महत्येमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. शासनाने यावर तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी जिल्ह्यातील तमाम शेतकऱ्यांनी केली आहे.

कर्जाच्या ओझ्याने त्रस्त झालेल्या एका शेतकऱ्याने शेतात गळफास लावून आत्महत्या केल्याची दु:खद घटना शुक्रवारी सकाळी साडे अकरा वाजताच्या सुमारास उघडकीस आली. नरेंद्र उर्फ बापूराव सदावर्ते (वय ४५ वर्षे) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. घटनेची हकीकत अशी की, नरेंद्र सदावर्ते हे फुलांची विक्रमी शेती करणारे शेतकरी म्हणून प्रसिद्ध होते. काही वर्षांपूर्वी त्यांनी शेवती रोड वर असलेले स्वत:चे शेत विकले आणि मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून धडपडत होते. त्यांनी त्या पैश्यातून घर बांधले आणि काही पैसे मुलींच्या शिक्षणासाठी राखून ठेवले होते. अश्यातच पूर्वीची त्यांची असलेली शेती मक्तेदारीने घेऊन त्यामध्ये पुन्हा त्यांनी फुलशेती फुलविली होती मात्र सतत येणारी नापिकी आणि जवळ असलेला पैसे निघून गेल्याने त्यांनी शेतीसाठी नातेवाईकांकडून तसेच बँकेकडून कर्ज घेतले होते. परंतु यावर्षी सुद्धा पाहिजे तसा भाव शेतमालाला मिळाला नसल्याने अनेक दिवसांपासून ते विवंचनेत होते. घटनेच्या दिवशी सकाळी त्यांनी सर्व मित्रांची भेट घेतली आणि हसत खेळत सर्वांशी बोलून ते शेतात गेले आणि कसलाही विचार न करता त्यांनी शेतात असलेल्या खोलीच्या खांबाला दोरी बांधून गळफास घेतला. सकाळी साडे अकरा वाजताच्या सुमारास आजूबाजूला असलेल्या शेतकऱ्यांना हे दृश्य दिसल्यानंतर त्यांनी तातडीने ही बाब कुटुंबियांना व पोलिसांना कळविली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवाल.उत्तरीय तपासणी नंतर दुपारी स्थानिक मोक्षधाम मध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार पार पडले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुली असून मोठी मुलगी उच्च शिक्षण घेत आहे. घटनेने अनेकांना धक्का बसला परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### खा. वानखडे, ठाकूर रुग्णालयात

घटनेची माहिती मिळताच खा. बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात धाव घेत.मृतकाच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.संबंधित अधिकाऱ्यांशी बोलून मृतकाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याची विंनती यावेळी करण्यात आली.यावेळी त्यांनी या दुर्दैवी घटनेबाबत हळहळ देखील व्यक्त केली.



**मोर्शी :** तालुक्यातील खोपडा या गावातील एका युवकाने कर्जापायी राहत्या घरी फाशी घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केल्या जात आहे. शुभम गजानन चौधरी वय २४ रा. खोपडा असे मृत युवकाचे नाव असून दि २९ ला त्याचे घरचे लग्नाला गेले होते. घरी कोणी नसल्याचे पाहून त्याने गळफास लावून आत्महत्या केली. सायंकाळी नातलग घरी आल्या नंतर हा प्रकार उघडकीस आला. सतत तीन वर्षापासून शेतात पीक होत नसल्यामुळे बँकेचे कर्ज परत करू शकत नाही त्यामुळे तो सतत चिंतेत रहात होता शेती पूरक व्यवसाय म्हणून तो दुधाचा व्यवसाय सुद्धा करीत होता परंतु दुधाला भाव नसल्यामुळे तो गाडीची किस्त सुद्धा भरू शकत नव्हता त्यामुळे फायनान्स कंपनी तर्फे त्याला वारंवार फोन येत असे असे समजते. या सर्व त्रासाला कंटाळून अखेर त्यांने फाशी घेतली.तो घरातील एकुलता एक कमावता मुलगा होता.




# आंतर जिल्हा टोळीतील दोन आरोपी अटक

## फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई, ३ लाख ५३ हजारांचा मुद्देमाल जप्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती दि. ३१ :** घरफोड्या, दुचाकी चोरी करणाऱ्या दोन आंतरजिल्हा टोळीतील कुख्यात आरोपीला फ्रेजरपुरा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपीकडून मोबाईल, सोन्या चांदिचे दागिने असा एकूण ३ लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून फ्रेजरपुरा, नागपुरी गेट, अकोट व दर्यापूर या पोलिस ठाण्याच्या हद्दीतल चोऱ्या केल्या आहेत.

फ्रेजरपुरा पोलिसांचे पथक पोलिस ठाण्याच्या हद्दीत रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती घेत होते. त्या दरम्यान चोरीच्या गुह्यातील आरोपी परिसरात फिरत असल्याची माहिती मिळत होती. त्यावरून पोलिसांनी सीसीटीव्ही



फुटेज तपासून घरफोडीतील व दुचाकी चोरीतील आरोपी अमन किशोर राऊत, १९, रा. मांडवा झोपडपट्टी गाडगेनगर, प्रथमेश संजय चऱ्हाटे, १९ रा. महेंद्र कॉलनी यांना ताब्यात घेतले. फिर्यादी संतोष रामभाऊ माकोडे, ४२, रा. चांगापूर हे अमरावती येथे राहत असून खाजगी नोकरी निमित्त कामानिमित्त येणेजाणे करीत होते. त्यांनी त्यांची दुचाकी क्रमांक एम एच २७ झेड ८५७५ ही २९ मे रोजी सायंकाळी मित्राकडे ठेवली होती व कल्याणनगर चौकातील बौद्धविहार येथे गेले. काम आटोपून आल्यावर त्यांना दुचाकी दिसली नाही. त्या दुचाकीने चोरटे फिरत असल्याची माहिती मिळाली होती. पोलिसांनी दोन्ही आरोपींना दुचाकीसह ताब्यात घेतले. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांनी फ्रेजरपुरा हद्दीतून दुचाकी नागपुरी गेट हद्दीतून सोन्या चादीचे दागिने, अकोट येथून सोन्या चांदीचे दागिने व दर्यापूर हद्दीतून दुचाकी चोरून नेली होती. पोलिसांनी दुचाकी व चोरून नेलेले दागिने असा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त सागर पाटील, कैलाश फुंडकर यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक निलेश गावंडे, राहुल महाजन, योगेश श्रीवास, हरिष बुंदेले, शशिकांत गवई, हरिष चौधरी, जयेश परिवाले, दिनेश नेमाडे, उमेश कुलपात यांनी केली आहे.

# विद्यापीठात पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती दि. ३१ :** पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले.यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन डॉ. श्रीकांत पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, डॉ. दादाराव चव्हाण, सहा. कुलसचिव श्री अनिल मेश्राम, डॉ. दुर्गे तसेच विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारी उपस्थित होते.









अजिंक्य भारत

# अमरावती जिल्हा

रविवार, दि. १ जून २०२५



## थोडक्यात

### एटीएममधून पैसे चोरणारा आरोपी अटक



**अमरावती :** प्राण्याच्या केसापासून ब्रश बनविण्याचा उद्योग असल्याने फिर्यादी हे बाहेरगावी केस विकत घेण्यासाठी जात होते. प्राण्यचच्या केसाचा माल पसंत न पडल्याने ते अमरावतीला परत आले. जयस्तंभ जवळ थांबले असता अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातील एटीएम चोरून बँकेतील २ लाख ९१ हजार रुपये काढून घेतले या बाबत राजापेठ पोलिसात तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी तपास करून आरोपीला भूसावळ तालुक्यातील वरणगाव येथून ताब्यात घेतले आहे. फिर्यादी यांचा प्राण्यांच्या केसापासून ब्रश बनविण्याचा व्यवसाय आहे. त्यामुळे ते व्यवसायासाठी ब्रशासाठी लागणारे केस जमा करण्यासाठी बाहेरगावी जात होते. परंतु फिर्यादी यांची ओळख आरोपी सोबत झाली असून आरोपी नितीन एकनाथ गुळनकर, ३६ रा. वैधूकवाडा, अजयनगर वरणगाव ता. भूसावळ जि. जळगाव, याच्या घरी दोघेही मिळून आले. आरोपी हा पोलिसाना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्याला पोलिसांनी सिताफीने पकडले परंतु या आधी त्याने फिर्यादीचे एटीएम कार्ड चोरून त्यांच्या बँक खात्यातील २ लाख ९१ हजार काढून घेतले होते. पोलिसांनी त्याला भूसावळ तालुक्यातून ताब्यात घेतले असता त्याने चोरी केल्याची कबुली दिली. तसेच त्याच्या जवळ चोरलेले एटीएम मिळून आले. पोलिसांनी त्याच्याकून चोरून नेलेले एटीएम व पैसे जप्त केले आहे. ही कारवाई राजापेठ पोलिस ठाण्याचे ठाणेदार पुनीत कुलट, मिलिंद हिवरे, पंकज गाठे, सुरज मेश्राम, पांडुरंग दुरवंत यांनी केली आहे.

### शेवटच्या श्वासापर्यंत धम्मकार्य करनार-भन्ते संघपाल



**पूर्णानगर :** मी माझ संपूर्ण जीवन अनाथ, बेवारस लोकांच्या सेवेत घालवत असून गेल्या अनेक वर्षापासून तसेच कोरोना काळात अनेक लोकांना जीवनदान दिले आहे.ही शक्ती मला तथागत भगवान बुद्धाच्या तत्वद्यानातुन मिळाल्यामुळे मी आखरी श्वासापर्यंत तथागतांच धम्मकार्य करेल कारण यातूनच मला जीवन जगण्याची व इतरांचे जीवन जगवन्याची प्रेरणा मिळाली असल्याचे प्रतिपादन डॉ. भन्ते संघपाल जिवक यांनी तळणी पूर्णा येथील भगवान बुद्धाचा मूतच्या अनावरण प्रसंगी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच अभिजित इंगळे तर प्रमुख अतिथी म्हणून पोलीस पाटील स.अल्काताई इंगळे, सागर गजभिये, महेंद्र लांजेवार, प्रताप गोंडाणे, रमण पाटील सतीश गोंडाणे मीनाताई इंगळे रावसाहेब वानखडे, अनंतराव वैद्य, रामेश्वर भोजने, सोमनाथ उमेकर, तेजस जवंजाळ, दीप खैरकर, नरेश सोनवणे, गैरव इंगळे, तंटामुक्ती अध्यक्ष शरद वानखडे उपस्थित होते. सर्वप्रथम भगवान बुद्धाच्या मूर्तिचे अनावरण तथागत टीव्ही चॅनलचे संचालक अरुणभाऊ वानखडे यांच्या हस्ते करण्यात आले नंतर भन्ते सुमंगल महाथेरो, भन्ते पटीशन, भन्ते सुमनवत्तो यांनी उपस्थितीना त्रिशरण पंचशील घेऊन धम्मदेशना दिली. नंतर मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून लोकस्वातंत्र्य पत्रकार संघांचे अमरावती जिल्हा उपाध्यक्ष संजय सरवटकर यांचा त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद हिवराळे गुरुजी, प्रास्तविक डॉ. संघपाल जिवक यांनी तर आभारप्रदर्शन प्रताप गोंडाणे यांनी केले.

### प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्क रुग्ण शिबीर



**अंजनगाव बारी :** प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनगाव बारी येथे अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातर्फे कर्करोग तपासणी करिता आली. त्यावेळेस प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनगाव बारी व अंतर्गत येणाऱ्या आरोग्य केंद्रातून संशयीत कर्करोगाचे रुग्ण तपासणी करता आले. केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रिकुंजय केचे, डॉ. विजय सोनपरोते तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी व आशा उपस्थित होत्या. या शिबीरात ३५ रूग्णांची कॅन्सर तपासणी करण्यात आले.१८ रूग्णांना स्त्रीरोगतज्ञ नेले.१७ रूग्णांचे स्क्रीनिंग सर्जरीन केले. तर ७ रूग्णांना रेफर करण्यात आले.

### हजारो रुग्णांनी घेतला शिबिराचा लाभ

**मोर्शी :** आशा चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे आतापर्यंत जवळपास २० हजार रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात येऊन ७००० रुग्णांची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली असून वयोवृद्धांना सुद्धा दृष्टी मिळावी व त्यांना सुद्धा जग पाहण्याची संधी प्राप्त व्हावी हा सामाजिक उद्देश समोर ठेवून आशा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून कित्येक वर्षापासून हा उपक्रम राबविल्या जात असल्याचे मत मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार तथा आशा चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष चंदूभाऊ उर्फ उमेश यावलकर यांनी भारतीय जनता पार्टी,महात्मा आय बँक अँड आय हॉस्पिटल नागपूर तथा आशा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नेत्र तपासणी शिबिराप्रसंगी व्यक्त केले.या शिबिराचे आयोजन दि.२५ मे रोजी राममंदिर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आमदार चंदूभाऊ यावलकर यांनी भूषविले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण राऊत, भाजपाचे शहराध्यक्ष दीपक नेवारे, सुनीता कोहळे,अनिता लांजेवार,पत्रकार अजय पाटील,संजय गारपवार उपस्थित होते.

# शहरातील मुख्य रस्त्याने घेतला मोकळा श्वास; बॅनर हटले

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मोर्शी, दि. ३१ :** शहराच्या मुख्य रस्त्यावरच शहर विद्रुपीकरणात भर घालणारे राजकीय शुभेच्छांचे, कार्यक्रमांचे तसेच वाढदिवसाचे बॅनर वृत्त येताच काढण्यात आले. शहराच्या मुख्य रस्त्यावर त्याच बरोबर धार्मिक स्थळावर सुद्धा मोठ्या प्रमाणात बॅनर लावण्यात आले होते त्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत होते तसेच वाहतुकीला सुद्धा अडथडा निर्माण होत होता याबाबतचे वृत्त प्रकाशीत होताच शहरातील बॅनर काढण्याची मोहीम नगर परिषदेच्या वतीने काढण्यात आली आहे. दि.२७ ला सकाळी स्वच्छता विभागाकडून ही मोहीम सुरू झाल्याने शहरातील मुख्य रस्त्याने मोकळा श्वास घेतल्याचे दिसून आले आहे.

स्थानिक नप प्रशासनाकडून होर्डिंग लावल्यावर कोणतीही कार्यवाही केल्या जात नसल्याने शहराच्या विविध भागात वाढदिवसाचे व शिकवणी वर्गाचे बॅनर मोठ्या प्रमाणात झळकले होते. रस्त्यावर च हे होर्डिंग लावण्यात येत असल्याने शहराचे विद्रुपीकरणं झाले होते.

रस्ता दुभाजकावर अनेक बॅनर लावल्या जात असल्याने वाहन चालविताना त्याकडे लक्ष जात होते पर्यायाने अपघात होण्याची शक्यता बळावली होती. अनेकदा मोठी पोस्टर लागल्यास व त्यावर अनेक

फोटो असल्यास ते पाहण्यासाठी नागरीक रस्त्यावरच थांबत होती पर्यायाने वाहतुकीला अडथडा निर्माण होत होता.

अनेकदा वादळ तसेच वाऱ्यामुळे रस्त्यावर लावलेल्या फ्लेक्स उडत होत्या त्यामुळे सुद्धा अपघात होण्याची शक्यता वाढली होती.

जयस्तंभ चौक तसेच तेथे असलेल्या मंदिरावर सुद्धा फ्लेक्स लावल्या जात असल्याने

मोर्शी शहर हे या बॅनरबाजीमुळे गुदमरुन गेले होते. मोर्शी नगरपालिकेच्या माध्यमातून देखील या अनाधिकृत बॅनर पोस्टरवर कोणत्याही स्वरुपाची कारवाई केली जात नव्हती. मुख्य रस्त्यांवरील विद्युत खांबांवरही फलक लावले जातात. अशा प्रकारचे बॅनर लावण्यामध्ये राजकीय पक्षांचे कार्यकर्ते व स्वयं घोषित समाजसेवक आघाडीवर असल्याचे दिसून येते. अशा प्रकारांना आळा बसावा यासाठी नगर पालिकेने शहरातील काही ठिकाणे निश्चित करून त्याठिकाणी बॅनर लावण्यासाठी परवानगी घेण्याची योजना सुरू करणे आवश्यक आहे.



# पीपल्स कला मंचच्या चिमुकल्यांनी केले पक्षी व जंगल निरीक्षण

## दहा दिवस नाट्य अभिनय व व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती, दि. ३१ :** पीपल्स कला मंच व गटसाधन केंद्र गर्ल्स हायस्कूल अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दहा दिवसापासून नाट्य अभिनय व्यक्तिमत्व विकास शिबिर शिबिर गर्ल्स हायस्कूल अमरावती येथे सुरू असून या शिबिरातील चिमुकल्यांनी जंगलाचा व पशु पक्षांचा अभ्यास करण्यासाठी एक दिवस जंगल भ्रमण केले व पशुपक्षी जंगलाच निरीक्षण करून अभ्यास केला. अमरावती लगतच्या छत्री तलाव परिसरातील जंगलामध्ये विद्यार्थ्यांनी जंगल भ्रमण केले यामध्ये विविध पक्षांची ओळख जंगलातील विविध झाडांची ओळख यावेळेस विद्यार्थ्यांना करून देण्यात आली यावेळी वाईल्ड लाईफ अवेरनेस रिसर्च अँड रेस्क्यू सोसायटीचे अध्यक्ष निलेश कंचनपुरे, पक्षी मित्र प्रशांत निकम,मंगेश उल्हे,यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गेल्या दहा दिवसापासून हे शिबिर सुरू असून यामध्ये नाटक, गीत गायन, डान्स, योगा, झुंबा,स्टेज डेरिंग, भाषण कौशल्य, विविध विषयावरील तज्ञांनी यावेळी चिमुकल्यांना मार्गदर्शन केले या दहा दिवसात मोबाईल पासून हे चिमुकले लांब राहून त्यांनी त्यांच्या अंगात असलेल्या सुप्त गुणांना वाव दिला. यावेळी गेली दहा दिवस अमरावती गट साधन केंद्राचे विषय तज्ञ, पीपल्स कला मंचाचे अध्यक्ष विवेक राऊत संस्थापक अध्यक्ष सिद्धार्थ भोजने पिपस कला मंचाचे संचालक मनीष हटवार, गर्ल्स हायस्कूल चे मुख्याध्यापक तथा गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे गटसाधन केंद्राचे टसमन्वयक मंगेश उल्हे, वैशाली वऱ्हाडे,अमर घटरे,सुधांशू भोजने, सुवर्णा उल्हे,रिया पंजावाणी, संतोष सुरकर, पियुष पाटील,पल्लवी पात्रीकर, निलेश मोहकर, श्रावणी विजय दवाळे, उज्वल पंडेकर,दीपाली हटवार यांनी दहा दिवस शिव्यातील शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# शहर व जिल्ह्यासाठी नवीन ५० ई-बसेस मंजूर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३१ :** जिल्ह्यातील प्रवाशांना माननिय मुख्यमंत्री यांच्या सहकार्याने आ.रवि राणा यांनी दिली ई-बसची विशेष भेट

अमरावती अमरावती शहराचा दिवसेंदिवस व्याप वाढत असुन अनेक क्षेत्रामध्ये अमरावती शहरे प्रगतीच्या मार्गावर असल्याचे दिसुन येत आहे. त्याअनुषंगाने मेट्रो पॉलिटीन शहराकरिता ई-बस सेवा अनिवार्य असल्याचे केंद्र शासन पुरस्कृत पी.एम ई-बस योजनेअंतर्गत आ.रवि राणा यांनी शासनाकडे विशेष पाठपुरावा केला तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केलेल्या विशेष सहकार्याने अमरावती शहराकरिता ५० पी.एम ई-बसेस मंजुर झाल्या असुन बस डेपो करिता तसेच चार्जिंग स्टेशनसाठी कोंडेश्वर मार्गालगत २.३८ हे.आर एवढी जागा मंजुर सुद्धा झाली आहे. तसेच ई-बस साठी जागा मंजुर झाल्याचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन सुद्धा प्राप्त झाले आहे. लवकरच वर्षाच्या अखेरीस ई-बसेसची सेवा अमरावती शहरातील नागरिकांना उपलब्ध होणार असल्याचे आ.रवि राणा यांनी सांगितले. तसेच पी.एम ई-बस सेवेसाठी लागणाऱ्या पायाभुत सुविधांकरिता केंद्रशासनाकडुन ५ कोटी रुपयांचा निधी सुद्धा मंजुर झाल्याचे यावेळी आ.रवि राणा यांनी सांगितले. आ.रवि राणा यांनी केलेल्या अथक प्रयत्नाने अमरावतीकरांना ई-बस सेवेचा लाभ मिळणार असुन याबद्दल अमरावती शहर वासियांनी आ.रवि राणा यांचे आभार व्यक्त केले.

# अवकाळी पावसाने चांदूरबाजारमधील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या डोळ्यात आणले पाणी

## संभाजी ब्रिगेडच्या मागणीने तात्काळ पंचनामे करण्याबाबत तहसीलदार यांनी दिले आदेश

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**चांदूरबाजार, दि. ३१ :** अवकाळी पावसाने चांदूरबाजार तालुक्यातील कांदा व इतर पिकांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून ब्राम्हणवाडा थडी, ब्राम्हणवाडा पाठक, माधान , विश्रोळी तसेच आसेगाव परिसरातील शेतकऱ्याचे शेता मध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी घुसले असून कांदा या पिकाचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसानीचे तत्काळ पंचनामा करून शासनाने त्वरित मदत करावी या बाबत संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष डॉ. श्री. तुषार देशमुख यांच्या नेतृत्वात नायब तहसीलदार सोनारकर साहेब यांना निवेदन देण्यात आले व मा. तहसीलदार शेळके साहेब यांच्याशी भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधून झालेल्या परिस्थिती माहिती देण्यात आली आणि तात्काळ मा. तहसीलदार यांनी संभाजी ब्रिगेड चा निवेदनाची दखल घेऊन तत्काळ पंचनामे करण्या बाबत आदेशित केले. अवकाळी पावसाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांन चे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून डोळ्यामध्ये पाणी आणले. चांदूरबाजार मध्ये ओला दुष्काळ सारखी परिस्थिती निर्माण झाली शासनाने तत्काळ दखल घेऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी या बाबत संभाजी ब्रिगेड चा वतीने मागणी करण्यात आली आहे. यावेळी पत्रकार बादल डकरे उपस्थित होते.

# आ.रवि राणा यांनी घेतली शांतता कमिटीची बैठक

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अमरावती, दि. ३१ :** शहरातील कायदा व सुव्यवस्था मजबुत करण्यासाठी अवैध धंदे, दारु, इत्यादी बंद करुन ड्रग्स विकणाऱ्यां गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याकरिता व वचक बसविण्यासंदर्भात तडीपार करुन मोका लावण्यासंदर्भात आ.रवि राणा यांनी दिल्या सुचना शांतता कमिटीच्या बैठकीमध्ये आ.रवि राणा यांनी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन केले स्वागत तसेच धडाकेबाज व कर्तव्यदक्ष पोलीस आयुक्त अमरावतीला मिळाल्याचे नवनियुक्त पोलीसाचे आ.रवि राणा यांनी केले कौतुक शांतता कमिटीच्या वतीने आ.रवि राणा यांनी नवीन पोलीस आयुक्तांवर दिली अमरावती मध्ये शांततामय वातावरण निर्माण करण्याची जबाबदारीन अमरावती नुकताच अमरावती शहराचे तत्कालीन पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांचा अमरावती येथील कार्यकाळ संपुन झाल्यानंतर त्यांच्या जागेवर अमरावती शहराचे नवनियुक्त पोलीस आयुक्त अरविंद चावरिया हे रुजु झाले असुन बडनेरा विधानसभा मतदार संघाचे आ.रवि राणा यांनी पोलीस आयुक्त कार्यालयात जाऊन अरविंद चावरिया यांची सदिच्छा भेट घेतली तसेच पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत शुभेच्छा सुद्धा दिल्या. त्याचप्रमाणे अमरावती शहरातील कायदेव्यवस्था मजबुत करण्याकरिता शांतता कमिटीची बैठक सुद्धा घेतली या बैठकीमध्ये अमरावती शहरामध्ये जे अवैध धंदे सुरु आहे. ते पुर्णपणे बंद करुन विकण्यात येणारी दारु, डक्स. गुन्हेगारांवर वचक ठेवण्याकरिता त्यांना तडीपार करण्यात यावे व गुन्हेगारांवर मोका सुद्धा लावावा जेणकरुन अमरावतीमध्ये गुन्हे घडणार नाही याबाबत सुचना केल्या. नवनियुक्त पोलीस आयुक्तांचे कौतुक सुद्धा केले तसेच शांतता कमिटीच्या वतीने नवीन पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांचा शाल व श्रीफळ देऊन आ.रवि राणा यांनी सत्कार सुद्धा केला. यावेळी शहराध्यक्ष संजय हिंगासपुरे, जिल्हाध्यक्ष अजय देशमुख, गणेश मारोटकर गणेशदास गायकवाड, विलास वाडेकर,दिनेश सेठीया,अनुप अग्रवाल, अजय जैयस्वाल, किशोर पिवाल, विशाल तरडेजा, गजानन नांदुरकर, विजय जयस्वाल,सचिन भेंडे, सुरज मिश्रा,सत्येंद्रसिंग लोटे, महेश किल्लेकर, आशिष गावंडे, रितिक सिंग,भूषण पाटणे, महेंद्र कुंडलायक, करण डेडवाल,मिलिंद कहाळे, गौरव सेठीया, शशिकांत ननावरे, शुभम साबळे, सागर नीबरते शुभम उंबरकर आदि उपस्थित होते.

# राज्यपालांच्या हस्ते जिल्हा परिषदेला २० लाखांचा पुरस्कार

## मुंबई येथे सीईओ संजीता महापात्र यांनी धनादेश स्वीकारला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अमरावती, दि. ३१ :** पंचायत राज अभियानात उत्कृष्ठ काम केल्याबद्दल येथील जिल्हा परिषदेला २० लाख रुपयांचा यशवंत चव्हाण पंचायत राज पुरस्कार प्राप्त झाला आहे. जिल्हा परिषदेच्या सीईओ संजीता महापात्र व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुंबई येथे आयोजित एका कार्यक्रमात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. दरम्यान, या रकमेतून विकासात्मक कामाला गती द्यायची असली तरी नेमके कोणते काम करायचे, हे येत्या काही दिवसांत निश्चित केले जाणार आहे. हा पुरस्कार सन २०२३-२४ साली झालेल्या उत्कृष्ट कामकाजासाठी देण्यात आला आहे. तो राज्यस्तरीय असून सर्व जिल्ह्यांच्या कामगिरीवर मात करीत राज्यात दुसरे स्थान प्राप्त केल्यामुळे मिळाला आहे. वितरणावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, याच विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम तसेच ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डबले उपस्थित होते. मुंबईच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये सकाळी साडे १० वाजता हा कार्यक्रम सुरू झाला.

अमरावती जिल्हा परिषदेने उत्कृष्ट कार्य केले आहे. दम्मान, या पुरस्कारामुळे जिल्हा परिषदेचे सर्व कर्मचारी आनंदले असून त्यांनी यापूर्वीच सीईओंचा सत्कारही केला आहे. जिल्हा परिषद ही जिल्ह्याचा एकूणच विकास नियंत्रीत करणारी यंत्रणा आहे. यंत्रणेच्या माध्यमातूनच प्रत्येक तालुक्याच्या सर्वांगीण विकासाची आखणी केली जाते. सन २०२३-२४ साली ही दोन्ही कामे अगदी चोखपणे करण्यात आल्याने शासनाने हा पुरस्कार दिला आहे. सन २०२३-२४ मध्ये जिल्हा परिषदेने आरोग्य, शिक्षण, कृषी, पशुसंवर्धन, समाज कल्याण, बांधकाम अशा सर्वच विभागात उत्कृष्टतेची मोहोर उमटविली. याशिवाय डीआरडीएच्या माध्यमातून घरकुलांची कामेही मोठ्या प्रमाणात पुढे नेली. या सर्व कामगिरीची दखल शासनाने घेतली असून त्यासाठीच हा पुरस्कार देण्यात आला आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या (डीआरडीएआ प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस सहायक आयुक्त (विकास) तुकाराम टेकाळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. पुरुषोतम सोळक आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हाधिकारी अविश्वांत पंडा यांना विशेष निमंत्रण हा पुरस्कार सन २०१३-२४ यावर्षी झालेल्या सर्वकष विकास कामांसाठी देण्यात आला आहे. त्यावेळी अविश्यांत पंडा हे जिल्ला परिषदेचे सीइओ तर तुकाराम टेकाळे उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. सध्या पंडा हे गडचिरोलीचे जिल्हाधिकारी आणि टेकाळे से सहायक आयुक्त आहेत. त्यामुळे या दोन्ही दोन्ही अधिकाऱ्यांनादेखीत्व अधिकाऱ्यांनादेखी सदर कार्यक्रमासाठी विशेषत्वाने निमंत्रित करण्यात आले होते.

## घटना-घडामोडी



### चोरीतील दहा मोबाईल मालकांना सुपूर्द

**उमरखेड :** उमरखेड पोलिसांनी केंद्र सरकारच्या 'सीईआयआर' पोर्टलचा प्रभावी वापर करत, परिसरातून चोरीला गेलेले व विविध कारणांनी गहाळ झालेले एकूण १० मौल्यवान मोबाईल फोन शोधून काढले आहेत. हे हस्तगत केलेले मोबाईल नुकतेच त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला असून, पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे. अनेक नागरिकांच्या मोबाईल गहाळ किंवा चोरीला गेल्याच्या तक्रारी उमरखेड पोलीस ठाण्यात सातत्याने प्राप्त झाल्या होत्या. यापैकीच पोफाळी येथील कुणाल सदाशिव ढोरे (वय ३८) यांनी २७ मे रोजी स्टेट बँक समोरून आपला मोबाईल गहाळ झाल्याची तक्रार दिली होती. या सर्व तक्रारींची गंभीर दखल घेत, पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डिबी प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे, पोलीस शिपाई संघशील टेंभरे, निवृत्ती आणि घुसे यांच्या विशेष पथकाने केंद्र शासनाच्या 'सीईआयआर' पोर्टलवर तक्रारी नोंदवून सदर मोबाईल ब्लॉक केले व नंतर ते यशस्वीरित्या ट्रेस करून हस्तगत केले. ही महत्त्वपूर्ण कारवाई यवतमाळ पोलीस अधीक्षक डॉ. कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पार पडली.



### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात

**बाभूळगाव :** बाभूळगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती शनिवारी, ३१ मे रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. शहरातील धनगर समाज बांधवांच्या वतीने स्थानिक गादे चौक येथे या निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या तेजस्वी प्रतिमेचे भक्तिभावाने पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर आणि समाजाभिमुख, दूरदृष्टीच्या सामाजिक सुधारणांवर सेवानिवृत्त शिक्षक सुभाष मोटके यांनी विस्तृत, अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला. यावेळी शहरातील सर्व जातीधर्मातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पुण्यश्लोक अहिल्यादेवींना विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी समाजातील ज्येष्ठ कार्यकर्ते मधुकर निवल, संजय शिरपूरकर, विजय पोफारे यांच्यासह निलय पोफारे, चेतन पोफारे, रविकांत पुनसे, गौरव लोहकरे, ज्ञानदिप बनसोड, प्रतीक निवल, मयुर राऊत, शेखर बोथरा, संकेत मोटके, गितेश नक्षणे, नयन चिकराम, अक्षय जांभुरे, अमोल घाटोळ, अक्षय शेळके, अमरदीप साखरकर, सुभाष बोदे, अभिषेक मोटके, अव्यान पोफारे आणि अन्य अनेक प्रतिष्ठित मान्यवर आवर्जून उपस्थित होते.

### हिरकणी कक्ष महिलांसाठी दिलासादायक

**आर्णी :** येथील तहसील कार्यालयात तहसीलदार वेशाख वाहुरवाघ यांनी रुजू झाल्यापासून विविध लोककल्याणकारी निर्णय व सामाजिक उपक्रम राबवत आपल्या कर्तव्यदक्षतेचा परिचय दिला आहे. त्यांनी नुकताच महिलांसाठी 'हिरकणी कक्ष' सुरू केल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यासोबतच, तहसीलदार कक्ष व नायब तहसीलदार कक्षांचे सुशोभीकरण करून, परिसर स्वच्छतेतून शासकीय कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांसाठी प्रसन्न वातावरण निर्माण केले आहे. यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही उत्साह वाढला आहे. त्यांच्या या कार्याचे विविध सामाजिक संघटना व कार्यकर्त्यांकडून स्वागत होत असून, त्यांच्या कामाची प्रशंसा केली जात आहे.

### दिग्रसमध्ये समर बॅडमिंटन कॅम्प सुरू

**दिग्रस :** दिग्रस येथे ६ ते १४ वयोगटातील मुला-मुलींसाठी आयोजित १५ दिवसीय समर बॅडमिंटन कॅम्पला उत्साही सुरुवात झाली. यात बॅडमिंटन प्रशिक्षणासह चित्रकला, 'एक खेळाडू-एक रोप' वृक्षारोपण, पत्रलेखन, बक्षीस वितरण असे विविध सर्जनशील उपक्रमही राबविले जातील. येथील दिनबाई विद्यालयाच्या प्रशस्त क्रीडा सभागृहात डॉ. एपीजे अब्दुल कलाम स्पोर्ट्स अकॅडमीद्वारा हे शिबिर यशस्वीपणे आयोजित करण्यात आले आहे. 'खेळ आणि सर्जनशीलतेचा सुंदर मिलाफ साधून बालकांचा शारीरिक, मानसिक, असा सर्वांगीण विकास साधणे हाच या कॅम्पमागील मुख्य उद्देश आहे,' असे मुख्य आयोजक आसिफ काजी यांनी सांगितले. शिबिराचा औपचारिक उद्घाटन सोहळा लवकरच होणार असून, त्यासाठी स्थानिक नामांकित खेळाडू, क्रीडा शिक्षक, क्रीडाप्रेमी नागरिक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या कॅम्पमध्ये सहभागी होण्यासाठी अजूनही नावनोंदणी मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यामुळे, इच्छुक विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर आपल्या पालकांमार्फत संपर्क साधावा आणि या अनोख्या अनुभवाचा भाग बनून आपले क्रीडा कौशल्य निश्चितपणे वृद्धिंगत करावे, असे आवाहन डॉ. एपीजे अब्दुल कलाम क्रीडा अकादमीचे फारुक चव्हाण, अजीम शेख, सादिक गारवे, आशिष अगलदरे, साक्षी जाधव यांनी केले आहे.

# 70 कोटींची विकासकामे पूर्ण करा

## पालकमंत्री संजय राठोड : सिंचन प्रकल्पांची पूर्ण क्षमता वापरा, डेहणी प्रकल्प मार्गी लावण्याचे निर्देश

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ३१ :** पालकमंत्री संजय राठोड यांनी शहरातील ७० कोटींची प्रलंबित विकासकामे व जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांचा आढावा घेतला. डेहणी प्रकल्पासह सर्व कामे तातडीने पूर्ण करून, सिंचनाची पूर्ण क्षमता वापरण्याचे निर्देश त्यांनी आज प्रशासनाला दिले.



यवतमाळ नगरपरिषद क्षेत्रात सुरू असलेली विविध प्रकारची, सुमारे ७० कोटी रुपयांची विकासकामे, विशेषतः सिमेंट रस्त्यांची कामे, ज्या ठिकाणी अडचणींमुळे रखडली आहेत, त्या अडचणींची तात्काळ सोडवणूक करून ती युद्धपातळीवर पूर्ण करावीत, असे सक्त निर्देश पालकमंत्री संजय राठोड यांनी आज दिले. महसूल भवन येथे आयोजित एका उच्चस्तरीय बैठकीत पालकमंत्र्यांनी यवतमाळ शहरातील प्रलंबित विकासकामे, रस्त्यांची स्थिती आणि जिल्ह्यातील सिंचन सुविधांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी माजी राज्यमंत्री मदन येरावार, जिल्हाधिकारी विकास मीना, यवतमाळ सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता योगेश सोनवणे, उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे, यवतमाळ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी क्यातमवार यांच्यासह जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, जलसंधारण विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शहरात अनेक ठिकाणी केंद्र शासनाच्या केंद्रीय मार्ग निधीतून सिमेंट रस्त्यांची कामे सुरू असून, काही ठिकाणी ती संथगतीने सुरू असल्याची बाब निदर्शनास आणण्यात आली. या कामांमधील अडथळे दूर करण्यासाठी नगर परिषद, बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि नगर रचना विभागाने संयुक्त पाहणी करून तातडीने मार्ग काढावा, अशा सूचना पालकमंत्र्यांनी केल्या. अमृत योजना, नगरोत्थान योजनेंतर्गत पूर्ण झालेली, सुरू असलेली व अद्याप सुरू न झालेली कामे यांचाही त्यांनी आढावा घेतला. यवतमाळ जिल्ह्यातील सर्व सिंचन प्रकल्पांद्वारे निर्माण झालेली सिंचन क्षमता आणि प्रत्यक्षात होत असलेले सिंचन यातील तफावत दूर करण्यावर त्यांनी भर दिला. पाणी वापर संस्थांची उभारणी, त्यांचे सक्षमीकरण आणि जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले. डेहणी उपसा सिंचन प्रकल्पाची कामे तातडीने पूर्ण करून, त्यातून नियोजित सात हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालीच पाहिजे, असे ते म्हणाले. माजी राज्यमंत्री मदन येरावार यांनीही यावेळी शहरातील विकासकामे व सिंचन सुविधेसंदर्भात काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले, ज्यावर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

### शहराच्या विकासाला मिळणार गती

**यवतमाळ शहरातील सुमारे ७० कोटी रुपयांची विकासकामे, ज्यात सिमेंट रस्त्यांचाही समावेश आहे, ती तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश पालकमंत्री संजय राठोड यांनी दिले. केंद्रीय मार्ग निधीतील कामांमधील अडचणी दूर करण्यासाठी विविध विभागांनी संयुक्त पाहणी करून मार्ग काढावा, तसेच अमृत व नगरोत्थान योजनांची कामेही वेळेत पूर्ण करावीत.**

### सिंचन क्षमता पूर्णपणे वापरा

**जिल्ह्यातील सर्व सिंचन प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता प्रत्यक्षात वापरली जावी, यासाठी आवश्यक कामे पूर्ण करा. डेहणी उपसा सिंचन प्रकल्पातून नियोजित ७ हजार हेक्टर सिंचन झालेच पाहिजे. पाणी वापर संस्था सक्षम करून शेतकऱ्यांना पाणी द्या, असे निर्देश पालकमंत्री राठोड यांनी अधिकाऱ्यांना दिले.**

## आर्णीला अतिक्रमणाचा विळखा ; नागरिक हैराण




**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. ३१ :** शहरातील माहूर चौक, महाळुंगी पॉईंट व बसस्थानक परिसरात अतिक्रमणाचा विळखा घट्ट होत आहे. नगर परिषदेने सूचना देऊनही अतिक्रमण हटवण्याची ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांत तीव्र संताप आहे.

नाल्यांवर, पुलांवर तसेच मुख्य रस्त्यांवर ठेलेवाले, हातगाड्या आणि भाजीपाला विक्रेते सर्रासपणे, बिनधास्तपणे अतिक्रमण करताना दिसत आहेत, ज्यामुळे रस्ते अरुंद झाले आहेत. विशेषतः माहूर चौक ते बसस्थानक या गजबजलेल्या परिसरात सकाळी व सायंकाळी पादचाऱ्यांना चालणेही मुश्किल झाले असून, वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत आहे. नाल्यांवर आणि पुलांवर थेट अतिक्रमण करून व्यवसाय थाटल्याने सार्वजनिक आरोग्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, परिसरात दुर्गंधी पसरत आहे. 'नगर परिषद केवळ नोटीस देऊन आपली जबाबदारी झटकते, प्रत्यक्ष कारवाई मात्र शून्य,' असा संतप्त सूर नागरिकांतून उमटत आहे. काही व्यापाऱ्यांनी तर नगर परिषदेच्या सूचनांना केराची टोपली दाखवत 'जैसे थे' परिस्थिती निर्ढावलेपणाने कायम ठेवली आहे. प्रशासनाने तातडीने कठोर पावले न उचलल्यास भविष्यात अत्यंत गंभीर समस्या अटळ आहेत.

## राजमाता जिजाऊ पतसंस्थेतर्फे गुणवंतांचा सत्कार

### पतसंस्थेची गुणवंतांना प्रोत्साहन देण्याची परंपरा कायम; विविध क्षेत्रांतील कार्याची दखल

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पुसद, दि. ३१ :** येथील राजमाता जिजाऊ नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंतांचा सत्कार समारंभ नुकताच आयोजित करण्यात आला. 'माणुसकीच्या भिंती'चे अध्यक्ष गजाननराव जाधव यांना नुकताच 'कृषीरत्न' पुरस्कार मिळाल्याबद्दल, त्यांचा सत्कार ॲड. रमेश पाटील यांच्याहस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.



यावेळी, गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूरचे अध्यक्ष आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार समाजात रुजविणारे, मातोश्री माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश रावजी धर्माळे यांचा सत्कार पतसंस्थेचे व्यवस्थापक प्रशांत वानखेडे यांनी केला. तसेच, मौजे पारवा बुद्रुक येथील अत्यंत गरीब कुटुंबातील राजू चव्हाण यांची कन्या हर्षदा राजू चव्हाण व पुत्र अमित चव्हाण या दोघांनाही एकाच वेळी पारेषण विद्युत कंपनीमध्ये 'विद्युत सहायक' या पदावर नियुक्ती मिळाल्याबद्दल त्यांचाही गौरव करण्यात आला. हर्षदा चव्हाण हिचा सत्कार पतसंस्थेच्या संचालिका स्मिता धर्माळे यांनी, तर अमित चव्हाण यांचा सत्कार गणेश रावजी धर्माळे यांनी केला. या दोन्ही यशस्वी मुला-मुलींच्या आई-वडिलांचा सत्कार पतसंस्थेचे मुख्य मार्गदर्शक प्रा. महादेव गावंडे यांच्याहस्ते करण्यात आला. पतसंस्थेच्यावतीने नेहमीच विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा सत्कार करण्याची परंपरा आहे. या कार्यक्रमास 'माणुसकीच्या भिंती'चे बहुसंख्य कार्यकर्ते आणि पतसंस्थेचे हितचिंतक उपस्थित होते. उपस्थित सर्व सत्कारमूर्तींचे व उपस्थितांचे आभार आशा ठाकरे यांनी मानले, त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## घाटंजीत 'रन फॉर अहिल्या' मॅरेथॉन

### अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आयोजन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**घाटंजी, दि.३१:** पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्त घाटंजी तालुका व शहर भाजप महिला मोर्चाने 'रन फॉर अहिल्या' महिला मॅरेथॉनचे नुकतेच नगर परिषद शाळा क्रमांक २येथे आयोजन केले. शेकडो महिला व युवतींनी यात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



कार्यक्रमाची सुरुवात राजमाता अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेस पूजन करून झाली. धनगर समाजातील कर्तृत्ववान महिला सुभद्रा तुरारे, रेखा गंडे, सुनीता चिव्हाणे, रूपा घोडे, शालिनी चिव्हाणे यांचा साडी व प्रमाणपत्र देऊन विशेष, हृद्य गौरव करण्यात आला. 'रन फॉर अहिल्या' मॅरेथॉनमध्ये सहभागी प्रत्येकी पहिल्या पाच महिला व युवतींनाही आकर्षक पारितोषिके, साडी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक कार्यकर्त्या प्रिया राजू तोडसाम, साधना माडुरवार, डहाके यांनी अहिल्यादेवींच्या प्रेरणादायी जीवनचरित्रावर प्रबोधनपर, अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी भाजप तालुकाध्यक्ष विजय बैस, शहराध्यक्ष गजानन ढवळे, बाळू खंदारे, महिला मोर्चा सरचिटणीस लता ठाकरे, योगिता पवार, सुषमा खंदारे, विद्या काळे, बंडू तोडसाम, अमित पडवलवार, विनय जाधव, गोलू फुसे, जगदीश रोकडे, बच्चा चिव्हाणे, आश्विन साथगरे, आश्विन घोडे, यश ठाकरे, संदीप भोयर, महेश जाधव, सूरज उले, राजू आडे व अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कवी, साहित्यिक विनय मिरासे यांची विदर्भ अध्यक्षपदी निवड

### साहित्य सांस्कृतिक अकादमी पुणेच्या विदर्भ अध्यक्षपदी वर्णी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.३१:** यवतमाळ येथील प्रसिद्ध कवी, साहित्यिक आणि पुरोगामी विचारवंत विनय मिरासे 'अशांत' यांची साहित्य सांस्कृतिक अकादमी, पुणेच्या विदर्भ अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीचे साहित्य व सामाजिक क्षेत्रातून स्वागत होत आहे.

विनय मिरासे हे महाराष्ट्रातील प्रथितयश लेखक व विचारवंत म्हणून ओळखले जातात. सामाजिक जाणिवा आणि परिवर्तनात्मक विचारांशी संबंधित त्यांच्या आजवर एकूण सोळा साहित्यकृती प्रकाशित झाल्या आहेत. यामध्ये चार काव्यसंग्रह, दोन गझलसंग्रह, एक कथासंग्रह, दोन वैचारिक लेखसंग्रह आणि इतर काही संकीर्ण पुस्तकांचा समावेश आहे. मिरासे केवळ लेखनापुरते मर्यादित न राहता, त्यांनी साहित्य संमेलनांचे आयोजन, साहित्यिकांना विचारपीठ उपलब्ध करून देणे, नवोदित साहित्यिकांना प्रोत्साहन, मार्गदर्शन व संघटित करणे यांसारखी महत्त्वपूर्ण कामेही केली आहेत. ते अंकुर साहित्य संघ, सुजन साहित्य संघ यांसारख्या अनेक साहित्य, संस्कृती व सामाजिक जनजीवनाशी निगडित संस्थांचे कर्तव्यशील पदाधिकारी राहिले आहेत. साहित्य सांस्कृतिक अकादमीतर्फे



यवतमाळ येथे आयोजित पहिल्या राज्यस्तरीय जागर साहित्य संमेलनाचे ते संयोजन सचिव होते. तसेच, अकादमीने आयोजित केलेल्या पदवीधर युवक व स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांसाठीच्या मार्गदर्शन मेळाव्यांचे त्यांनी राज्य समन्वयक म्हणूनही काम पाहिले आहे. त्यांच्या साहित्यिक व सामाजिक कार्याबद्दलल त्यांना अंकुर साहित्यरत्न, विदर्भ रत्न, साहित्यरत्न यांसह अनेक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्याग फाउंडेशन, जागर सेवा मंच आदी संघटनांनीही त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे.

## विकसित कृषी संकल्प अभियानाचा लाभ घ्या!

### पालकमंत्री संजय राठोड : दिग्रस येथे जनजागृती रथाचा शुभारंभ

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि. ३१ :** भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्यावतीने जिल्ह्यात २९ मे ते १२ जून या पंधरा दिवसांच्या कालावधीत 'विकसित कृषी संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाचा शुभारंभ पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २९) दिग्रस येथे जनजागृती रथाला हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या अभियानाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री राठोड यांनी यावेळी केले.




या अभियानांतर्गत कृषी शास्त्रज्ञ थेट गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, नवीन पिकांचे वाण आणि विविध शासकीय योजनांची माहिती देणार आहेत. यावेळी बोलताना पालकमंत्री राठोड म्हणाले की, कृषी विभागाच्या सर्व यंत्रणांनी गावे, वस्त्या, वाड्या येथे जाऊन सर्वसामान्य शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन करावे. त्यांच्या अडचणी समजून घेऊन शास्त्रज्ञांनी त्यावर उपाययोजना सुचवाव्यात. तसेच, चित्ररथाद्वारे कृषी विभागाच्या योजनांची माहिती देऊन शेतकऱ्यांचा सहभाग वाढवावा. हे अभियान जिल्ह्यातील दोनशे गावांमध्ये राबविण्यात येणार असून, चर्चासत्रांद्वारे मार्गदर्शन केले जाईल. यासाठी कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी, दोन्ही कृषी विज्ञान केंद्रांचे शास्त्रज्ञ, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, प्रगतिशील शेतकरी, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. हा उपक्रम कृषी विज्ञान केंद्र, कृषी विभाग, आत्मा, ॲक्शन फॉर फूड प्रॉडक्शन (ॲफ्रो) व इफको यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. शुभारंभप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे, उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल, तहसीलदार मयूर राऊत, कृषी विज्ञान केंद्रांचे प्रमुख शास्त्रज्ञ मयूर ढोले व डॉ. नंदकिशोर हिरवे, कृषी उपसंचालक राहुल चव्हाण, विविध उपविभागीय कृषी अधिकारी व इफको प्रतिनिधी उपस्थित होते.

## दिग्रस येथे आज मुस्लिम सामूहिक विवाह सोहळा

### एकूण १८ जोडपी होणार विवाहबद्ध

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि.३१:** दिग्रस येथे मुस्लीम समाजाचा १९वा वार्षिक सामूहिक विवाह मेळावा रविवार, दि. १ जून रोजी सायंकाळी ७ वाजता स्थानिक अंजुमन उर्दू हायस्कूलच्या भव्य पटांगणावर मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या सोहळ्यात १८ गरजू जोडपी अत्यंत साध्या पद्धतीने विवाहबद्ध होतील.

अंजुमन फिदायाने मुस्तफा समितीमार्फत गेल्या १८वर्षांपासून हा स्तुत्य उपक्रम अविरतपणे राबविण्यात येत आहे. याद्वारे आजपर्यंत शेकडो गरीब, अनाथ, अपंग, निराधार व दारिद्र्य रेषेखालील जोडप्यांचे संसार यशस्वीपणे थाटण्यात आले आहेत. हुंडा, बँडबाजा, फटाके, घोडागाडी असा कोणताही बडेजाव न करता, अत्यंत साध्या पद्धतीने हे सर्व विवाह पार पडतात. विशेष म्हणजे, वधू-वरांकडून शुल्क न घेता, उलट आयोजकांकडून नवदाम्पत्यांना पलंग, गादी, कपाट, कुलर, कपडे, भांडी व इतर संसारोपयोगी वस्तू भेट दिल्या जातात. दोन्हीकडील हजारो पाहुण्यांसाठी मोफत भोजनाचीही व्यवस्था असते. या मंगलमय सोहळ्याला सर्वधर्मीय, सर्वपक्षीय मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून नवविवाहितांना शुभाशीर्वाद देतील. समितीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व मुस्लिम बांधव यशस्वितेसाठी अथक परिश्रम घेत आहेत.

# गँगस्टर 'भिंडा' तीन वर्षांपासून यवतमाळात

## लॉरेन्स बिश्नोई, बिन्नी गुर्जर टोळीचा सदस्य

## स्थानिक गुन्हे शाखेने ठोकल्या बेड्या; यवतमाळ पोलिसांची धाडसी कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.३१:** पंजाब व राजस्थान पोलिसांना वॉन्टेड असलेल्या लॉरेन्स बिश्नोई आणि बिन्नी गुर्जर टोळीतील कुख्यात गुंड भूपेंद्र सिंग उर्फ भिंडा याला यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी (एलसीबी) शनिवारी, दि. ३१ मे रोजी पहाटे पाचदरम्यान अटक केली. विशेष म्हणजे, बिश्नोई व गुर्जर या आंतरराष्ट्रीय टोळीचा सदस्य असलेला गँगस्टर भूपेंद्र सिंग उर्फ भिंडा हा गेल्या तीन वर्षांपासून यवतमाळ शहरात वास्तव्यास होता.

भूपेंद्र सिंग उर्फ भिंडा (वय ३५, रा. ग्राम अहारना खुर्द, पो.स्टे. मेहटीयाना, होशियारपूर, पंजाब) असे त्याचे नाव असून त्याच्यावर राजस्थान व पंजाबमध्ये अनेक गुन्हे दाखल आहेत. तसेच त्याच्यावर राजस्थान पोलिसांचे २५ हजार रुपयांचे बक्षीस होते. खुनाच्या गुन्ह्यात फरार असलेला भिंडा यवतमाळात ओळख लपवून राहत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांनी मिळाली होती. यावरून पोलिसांनी ही धाडसी कारवाई केली आहे. यामध्ये प्रथम भिंडा याने २०२३ साली सदर बाडमेर येथे सुपारी घेऊन एका युवकाचा खून करून राजस्थानमार्गे यवतमाळ गाठले. त्यानंतर त्याने गुरुद्वारा येथे काही दिवस ओळख बदलून वास्तव्य केले. त्यानंतर गुरुद्वारातील भाविकांशी ओळख पटवून मदत मागितली. त्यामुळे पंजाबी बोली भाषेवरून त्याचे गुरुद्वारातील भाविकांशी प्रेमाचे संबंध प्रस्तापित झाले. यातूनच भिंडा याने जाम रोडवरील दांडेकर ले-आऊटमध्ये एका भाड्याच्या घरात आश्रय घेतला. याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संतोष मनवर यांना या टोळीतील दोन सदस्य यवतमाळात असल्याची कुणकूण लागली होती. दरम्यान, पोलिस दोन दिवसांपासून त्याच्या हालचालीवर पाळत ठेवून होती. यानंतर शनिवारी पहाटे घरासभवताल पोलिसांनी घेराव घातला. मात्र, या टोळीतील सदस्य असलेल्या भूपेंद्र सिंह याने पोलिस दिसताच पळ काढण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान, भूपेंद्र सिंग याने चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी हा हल्ला परतवून लावला व सकाळी आठ वाजता त्याची चौकशी केली. भिंडा याने आम्ही दोन सदस्य असल्याची माहिती दिली. मात्र, एक आरोपी पोलिसांना गुंगारा देऊन फरार झाला आहे. भिंडा याने २०२३ साली खुनाच्या घटनेतून फरार झाल्याची माहिती दिली. त्यावरून सकाळी बाडमेर पोलिस अधीक्षक यांच्याशी जिल्हा पोलिस अधीक्षकांनी संपर्क साधला असता बाडमेर (राजस्थान) पोलिसांना मोस्ट वॉन्टेड असलेला भिंडा यवतमाळ पोलिसांच्या ताब्यात असल्याची माहिती दिली. त्यावरून राजस्थान पोलिसांनी थेट दुपारी दोन वाजता यवतमाळ गाठले व त्याच्यावरील कारवाईची संपूर्ण माहिती दिली. राजस्थानमध्ये भिंडा याच्यावर एकूण सात गुन्हे दाखल आहेत. त्यामधील चार गुन्हे हे खुनाचे आहेत. तर, एका प्रकरणात भिंडाला दहा वर्षांचा कारावास झालेला आहे. त्यासोबत असलेल्या दुसऱ्या आरोपीबद्दलही यवतमाळ पोलिसांना बाडमेर पोलिसांनी माहिती दिली. मात्र, तो फरार झाला आहे. राजस्थान व पंजाबमध्ये एकूण १७ गुन्हे गंभीर स्वरूपाचे दाखल असून यामध्ये तीन गुन्ह्यांत शिक्षा झाली आहे. ज्यामध्ये त्रिपुरा येथे बंदी बनविण्यात आले होते. मात्र, तोपंजाब व जालंदर पोलिसांच्या तावडीतून फरार होण्यात यशस्वी झाला. असे असताना पंजाब पोलिस व राजस्थान पोलिस भिंडाच्या शोधात होते. मात्र, यवतमाळ पोलिसांनी यशस्वीरीत्या आरोपीचा शोध घेऊन मोस्ट वॉन्टेड गँगस्टर भूपेंद्र सिंग उर्फ रघू भिंडा यास जेरबंद केले. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता (भापोसे) आणि अपर पोलिस अधीक्षक पियुष जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संतोष मनवर, सफौ योगेश गटलेवार, पोहवा विनोद राठोड, पोहवा नीलेश राठोड, पोशि आकाश सहारे, मपोना ममता देवतळे (सर्व स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ) यांनी केली.

### यवतमाळलाच गुन्हेगारीची पार्श्वभूमी

- यवतमाळात गुन्हा घडला की येथील गुन्हेगार नागपूर, अमरावती किंवा पुणेचा आश्रय घेतात. अलीकडच्या काळात शहरात लॉरेन्स बिश्नोई स्टाइल गुन्हेगारांमध्ये क्रेझ आहे. त्यातच बिश्नोई व गुर्जर गँगचा गँगस्टर यवतमाळात तीन वर्षे वास्तव्यास असल्याने त्याचे कुणाशी काय संबंध आलेत, येथील गुन्हेगारी जगताशी त्याचा काही संबंध काला आहे का, याद्दष्टीनेही पोलिस तपास करीत आहेत.

### दारूच्या नशेत सहकारी बरळला अन् 'भिंडा' आला रडारवर

1. माहूर-तुळजापूर मार्गावरील एका राजस्थानी धाब्यावर भिंडा नामक संशयिताच्या एका सहकाऱ्याने दारूच्या नशेत केलेल्या एका महत्त्वपूर्ण वक्तव्यामुळे पोलिस यंत्रणा सतर्क झाली. सहायक पोलिस निरीक्षक संतोष मनवर यांच्या खबऱ्याने ही बाब उघडकीस आणल्यानंतर, पोलिसांनी भिंडावर गुप्त पाळत ठेवण्यास सुरुवात केली.
2. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भिंडा आणि त्याचा एक सहकारी 'त्या' धाब्यावर काम करत होते. त्याचवेळी सहायक पोलिस निरीक्षक संतोष मनवर यांचा एक गुप्त खबरीही त्या धाब्यावर गेला होता. खबऱ्याने भिंडाच्या सहकाऱ्याला दारूचे आमिष दाखवून त्याला भरपूर दारू पाजली, ज्यामुळे तो पूर्णपणे नशेच्या आहारी जाऊन काहीतरी बडबड करू लागला. याच नशेत असताना त्याने, 'हम रईस है, फिर भी यहाँ काम करना पडता हैं,' असे मोठे, अर्थपूर्ण वक्तव्य केले. पोलिसांनी या अनपेक्षित माहितीचा महत्त्वाचा धागा पकडून तत्काळ भिंडावर बारकाईने नजर ठेवण्यास सुरुवात केली. प्राथमिक तपासात भिंडा हा मूळचा पंजाबचा असल्याची ठोस माहिती समोर आली. त्याचे मुस्कान नावाच्या मुलीशी प्रेमविवाह झाला असून त्याला एक चार वर्षांची मुलगी देखील आहे. पोलिसांनी त्याच्या हालचाली, संपर्क आणि संभाव्य गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबत अधिक सखोल माहिती घेतली असता तो येथील दांडेकर नगरमध्ये भाड्याने राहत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर याठिकाणी कारवाई करीत त्याला ताब्यात घेण्यात आले.

## थोडक्यात

### बॅगमधील साहित्याची चोरी

**यवतमाळ :** बस स्थानका यवतमाळ येथे बॅगमधुन साहीत्याची चोरी झाल्याची घटना घडली. याप्रकरणीा बॅगमध्ये ॲपल कंपनीचा मोबाईल, टेथस्कोप, इअर पॅड कंपनीचे बुट, दोन जार्चर, चार ए.टी.एम तसेच मार्कसीट डीग्री व इतर कागदपत्रे असलेली बॅग बस स्थानक यवतमाळ येथे बसमध्ये सिटवर टाकली असता अज्ञात आरोपीने बॅगमध्ये असलेले ६५,००० रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना ३० मे रोजी घडली. याप्रकरणी श्रेया विश्वनाथ वानखेडे यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

### पिशवितील रोकड लांबविली

**कळंब :** थैलीतील रोख लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी कॅश भरण्याकरीता बॅक ऑफ बडोदा कळंब येथे गेले असता दोन अनोळखी महिला यांनी फिर्यादीचे पैश्याचे थैलीला चिरे मारून थैलीतील नगदी १,००,००० रूपये चोरून नेले. ही घटना ३० मे रोजी घडली. याप्रकरणी रूतीक प्रमोद जळीत यांच्या तक्रारीवरून दोन अनोळखी महिला विरूध्द गुन्हा नोंद केला.

### दुकानातील ऐवज लंपास

**नेर :** दुकानातील ऐजव लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी दुकानाचे शटरचे कुलुप उघडून दुकानाचे गल्यात ठेवलेले नगदी ६५,००० रूपये चोरून नेले असल्याचा संशय आहे. याप्रकरणी संजय देवीदास राठोड (४०) यांच्या तक्रारीवरून चाबी उर्प संकेत रामदास धोटे विरूध्द गुन्हा नोंद केला.

### तरुणावर हल्ला

**खंडाळा :** इसमावर काठीने हल्ला केल्याची घटना घडली. याप्रकरणी संगणमत करून फिर्यादीसोबत उसणे दिलेले पैसे परत मागण्याच्या कारणावरून वाद करून शिविगाळ केली व जिवे मारण्याची धमकी देवून लाथाबुक्योन तसेच काठीने डोक्यावर, उजव्या हातावर मारून जखमी केले. ही घटना २९ मे रोजी घडली. याप्रकरणी नायाबाराव दत्तराव बेले (३५) यांच्या तक्रारीवरून सुरेश प्रकाश जवादे, नितीन प्रकाश जवादे, प्रकाश प्रभा जवादे विरूध्द गुन्हा नोंद केला.

## CAPTION जयंती उत्सव...



**यवतमाळ :** दारव्हा येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जय मल्हार बहुउद्देशीय संस्था व सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात धनगर बांधवांच्या वेशभूषेत पालकमंत्री संजय राठोड यांनी अभिवादन केले.

# एमडी ड्रग्जसह तरुण पोलिसांच्या जाळ्यात

## ८६ हजारांचा मुद्देमाल जप्त, एलसीबी व वणी पोलिसांची संयुक्त कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वणी, दि. ३१ :** शहरातील जत्रा मैदान परिसरातून स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) यवतमाळ आणि वणी पोलिसांनी संयुक्त कारवाई करत क्षितीज अशोक इंगळे (वय २३, रा. रंगनाथ नगर, वणी) या तरुणाला एमडी (मेफेड्रोन) या अंमली पदार्थांसह ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून दोन ग्रॅम २८० मिलीग्रॅम एम.डी. पावडर, एक मोबाईल फोन आणि एक मोटारसायकल असा एकूण ८६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली होती की, क्षितीज इंगळे हा एम.डी. अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी जत्रा मैदानात येणार आहे. या माहितीच्या आधारावर, पोलिसांनी आवश्यक परवानग्या घेऊन जत्रा मैदान परिसरात सापळा रचला. माहितीनुसार एक तरुण मोटारसायकलवर बसलेला दिसताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव क्षितीज अशोक इंगळे असल्याचे सांगितले. पंचांसमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या जिन्स पॅन्टच्या मागील उजव्या खिशात रुमालामध्ये पांढऱ्या रंगाची पावडर आढळली. त्याने ती एम.डी. अंमली पदार्थ असल्याचे कबूल केले. जप्त केलेल्या पावडरची किंमत प्रतिग्रॅम पाच हजार रुपयांप्रमाणे एकूण अकरा हजार चारशे रुपये इतकी आहे. चौकशीत क्षितीजने हा अंमली पदार्थ नागपूर येथून एका साथीदाराच्या मदतीने आणल्याचे सांगितले. त्याच्याविरुद्ध वणी पोलिस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास वणी पोलिस करत आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियूष जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे, वणी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गोपाल उंबरकर, सपोनि अजयकुमार वाढवे, पोउपनि धनराज हाके, पोउपनि धनंजय रत्नपारखी आणि अंमलदार सुनील खंडागडे, सुधीर पांडे, उल्हास कुरकुटे, सुधीर पिदुरकर, निलेश निमकर, रजनिकांत मडावी, सलमान शेख, नरेश राऊत व निलेश आडे यांनी केली.

# उमरखेड 'आयटीआय'ला हुतात्मा मधुकर चौधरींचे नाव

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि.१३:** गोवा मुक्ती संग्रामात पोर्तुगीज सत्तेविरुद्ध शौर्याने लढा देत प्राणांचे बलिदान करणारे उमरखेडचे थोर सुपुत्र हुतात्मा मधुकर चौधरी यांचे नाव येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला (आयटीआय) देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. त्यानुसार संस्थेचे 'हुतात्मा मधुकर चौधरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उमरखेड' असे अधिकृत नामांतर करण्यात आले आहे.

या संस्थेच्या नामांतराचा भव्य, प्रेरणादायी सोहळा येत्या ६ जून २०२५ रोजी सकाळी ठीक १० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार इंजिनिअर किसनराव वानखेडे यांच्या हस्ते होणार असून, भाजप जिल्हा समन्वयक (यवतमाळ) नितीन भुतडा, हुतात्मा मधुकर चौधरी यांचे कुटुंबीय सदस्य आणि इतर अनेक मान्यवर प्रमुख उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या अतुलनीय शौर्य आणि बलिदानाचे चिरंतन प्रतीक म्हणून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी उमरखेड परिसरातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांतील कार्यकर्ते तसेच पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयटीआयचे प्राचार्य डी.पी. पवार आणि समस्त कर्मचारी वृंदांनी केले आहे.

# एमपीएससीची गट 'क' सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा आज

**यवतमाळ, दि.३१:** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे महाराष्ट्र गट-'क' सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा उद्या, रविवार, दि. १ जून रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत घेण्यात येणार आहे. सदर परीक्षा जिल्ह्यातील एकूण २१ उपकेंद्रावर घेण्यात येणार असून एकूण ४ हजार ५४२ इतके उमेदवार ही परीक्षा देणार आहेत. परीक्षा शांततेने व सुरक्षित पार पाडण्याकरिता उपकेंद्राच्या परिसरामध्ये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ जारी करण्यात आले आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी सुदर्शन गायकवाड यांनी कळविले आहे.

# भाजपप्रणित सहकारी पॅनेलचा विजय

## उमरखेड बाजार समितीचा निवडणूक निकाल; काँग्रेस आघाडीला सहा जागांवर समाधान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ३१:** उमरखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी आज, शनिवारी (दि. ३१) मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. एकूण १५८० मतदारांपैकी ९५ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. रात्री आठ वाजता निकाल जाहीर होण्याची प्रक्रिया सुरू होती. त्यात भाजपप्रणीत 'वसंतराव नाईक शेतकरी सहकारी पॅनेलने १२ जागांवर, तर काँग्रेस प्रणीत शेतकरी पॅनेलने सहा जागांवर आघाडी मिळविली होती. त्यामुळे बाजार समितीवर भाजप प्रणीत सहकारी पॅनेल सत्तेजवळ पोहोचल्याचे चित्र जवळपास स्पष्ट झाले.

शेतकऱ्यांची सधन संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या बाजार समितीच्या १८ संचालकपदासाठी ही निवडणूक होत आहे. उमरखेड, मुळावा, साखरा यासह चार प्रमुख मतदान केंद्रांवर मतदारांनी सकाळपासूनच रांगा लावल्या होत्या. सर्वसाधारण गटासाठी सात, महिला राखीवसाठी दोन, इतर मागासवर्गीयांसाठी एक, विमुक्त जातीसाठी एक, आर्थिक दुर्बळ घटकासाठी एक, व्यापारी व आडते मतदारसंघासाठी दोन आणि हमाल-मापाडी-तोलारी गटासाठी एक अशा एकूण १८ जागांसाठी ही निवडणूक झाली. या निवडणुकीला ग्रामपंचायत निवडणुकीचे स्वरूप आले होते, कारण प्रस्थापित राजकीय पक्षांच्या नेतेमंडळींनी आपापले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. भाजपप्रणीत 'वसंतराव नाईक शेतकरी सहकारी पॅनेल'चे नितीन भुतडा, आमदार किसनराव वानखेडे, माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर, सत्यशोधकचे नितीन माहेश्वरी, शिवाजीराव माने यांच्यासह प्रमुख नेते, तर काँग्रेसप्रणित 'शेतकरी सहकारी विकास आघाडी'चे साहेबराव कांबळे, तातू देशमुख, राम पाटील देवसरकर, नंदूशेठ अग्रवाल, दत्ताजी शिंदे यांच्यासह शिवसेना (शिंदे गट) व शिवसेना (उबाठा) गटाचे नेते व कार्यकर्ते दिवसभर मतदारांना मतदान केंद्रापर्यंत आणण्यासाठी पायाला भिंगरी लावून फिरत होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती) निवडणुकांची ही नांदी मानली जात असल्याने, या निवडणुकीतील विजयावर पुढील राजकीय गणिते अवलंबून असल्याचे राजकीय जाणकार मानत आहेत.

# तन्मय दरेकर नौदलात सब-लेफ्टनंट

## यवतमाळच्या युवकाची देशसेवेत झेप; लष्करी सेवेची तिसरी पिढी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.३१:** यवतमाळचा तन्मय प्रवीण दरेकर भारतीय नौदलात सब-लेफ्टनंट (जनरल सर्व्हिसेस) म्हणून निवडला गेला. नुकतीच ३० मे रोजी मेकॅनिकल अभियांत्रिकी पदवीसह नौदलातील नियुक्तीचा आदेशही त्याला प्राप्त झाला. तो ३० जून रोजी इंडियन नेव्हल अकादमी, एझिमाला (केरळ) येथे प्रशिक्षणास रुजू होईल.

तन्मयचे प्राथमिक शिक्षण येथील जवाहरलाल दर्डा इंग्लिश मीडियम स्कूल, पाचवी ते दहावीपर्यंत पोद्दार इंटरनॅशनल स्कूल (यवतमाळ), अकरावी-बारावीपर्यंतचे शिक्षण निराला कॉलेज (नागपूर) आणि विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (पुणे) येथून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमधून त्याने पदवी पूर्ण केली. कालच त्याला पदवी सन्मापूर्वक प्रदान करण्यात आली आणि कालच भारतीय नौदलातील नियुक्ती आदेश प्राप्त झाला. तन्मय हा सैनिकी पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील आहे. त्याच्या कुटुंबातील देशसेवेची ही तिसरी पिढी आहे; आजोबा हनुमंत दरेकर भारतीय सैन्यात (१९७१ भारत-पाक युद्धात सहभाग) होते, तर दोन चुलत बंधू संतोष भगवंत दरेकर निम लष्करी दलात (कारगिल युद्धात सहभाग) आणि मनोज भगवंत दरेकर आर्टिलरीमध्ये कार्यरत होते. घरातील याच लष्करी वातावरणामुळे प्रेरित होऊन तन्मयने कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकरी न स्वीकारता नौदल निवडले. त्याचे वडील प्रवीण हनुमंत दरेकर जिल्हा परिषद शाळेत शिक्षक (राणी अमरावती, ता. बाभूळगाव), आई अरुणा गृहिणी असून, लहान भाऊ निनाद पुण्यात जेईईची तयारी करत आहे. त्याच्या निवडीने यवतमाळच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवल्या गेला आहे.

# ब्राह्मण विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**यवतमाळ, दि. ३१:** अखिल भारतीय ब्राह्मण महासंघांतर्गत युवा ब्राह्मण संघ, यवतमाळद्वारे सलग १५ व्या वर्षी बहुभाषिक ब्राह्मण समाजातील दहावी, बारावी व इतर परीक्षांमधील गुणवंत तसेच कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्र व विविध स्पर्धांमध्ये विशेष यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आणि सैन्यदलातील सेवेच्या संधी या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन रविवार (दि. एक) जून २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता मंजूषा मंगल कार्यालय, बालाजी सोसायटी येथे करण्यात आले आहे. भारतीय वायुसेनेतील सेवानिवृत्त अधिकारी चंद्रशेखर आलेगावकर प्रमुख मार्गदर्शक, तर प्रख्यात सनदी लेखापाल राजेश शुक्ला अध्यक्षस्थानी राहतील.

# यवतमाळच्या शांभवीची राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत बाजी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ३१ :** अखिल भारतीय सांस्कृतिक संघ, पुणे आणि युनेस्कोतर्फे प्रायोजित राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत यवतमाळच्या शांभवी निशांत तायडे हिने कथ्थक नृत्य प्रकारात द्वितीय स्थान पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे.

पुण्यात २१ मे ते १ जून २०२५ दरम्यान पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवनात २१ व्या कला सादरीकरण सांस्कृतिक मंच महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ९ ते १४ वर्षे वयोगटातील देशभरातील कलावंतांमधून शांभवीने आपल्या कलाविष्कारातून हे पारितोषिक मिळविले. तिने यापूर्वीही जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या यशाचे श्रेय तिने नृत्य प्रशिक्षक शीतल बोन्द्रे, वडील ॲड. निशांत तायडे आणि आई प्राजक्ता तायडे यांना दिले आहे. तिच्यावर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.